सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
प्रजासत्ताक दिन
लातूर | सोमवार, २६ जानेवारी २०२६ | वर्ष ३ रे अंक ३२७ | पाने १२ | किंमत रु. ६/- ■ RNI No. MAHMAR/2023/86477 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com


सोलापूर तरुण भारत

### उद्या अंक नाही!

सोमवार दिनांक २६ जानेवारी रोजी गणराज्य दिनानिमित्त तरुण भारत कार्यालयास सुट्टी असल्याने मंगळवार, दिनांक २७ जानेवारी रोजीचा अंक प्रसिध्द होणार नाही. याची वाचक, विक्रेते आणि एजंट, जाहिरातदार यांनी नोंद घ्यावी.

**- व्यवस्थापक**

### विचारपुष्प



या भूमीशिवाय जगात अन्य कोठेही आपण जिवंत राहू शकत नाही. जगात आपल्यासाठी दुसरीकडे कोठेही स्थान नाही. जोपर्यंत अशा प्रकारची सद्भावना आपण लोकात निर्माण करू शकत नाही, तोपर्यंत या मातृभूमीसाठी त्याग, बलिदान, परिश्रमाचा भाव निर्माण होऊ शकत नाही.

**प्रो. राजेंद्रसिंह उपाख्य रज्जूभय्या**
रा. स्व. संघाचे चतुर्थ सरसंघचालक

**भारताचा प्रजासत्ताक दिन चिरायु होवो !**

# धर्मेंद्र यांना मरणोत्तर पद्मविभूषण

## अलका याज्ञिक, पीयूष पांडे, उदय कोटक यांना पद्मभूषण

## विदर्भातील नुवाल, बोथे यांच्यासह राज्यातील ११ जणांना पद्मश्री

◆ **नवी दिल्ली, २५ जानेवारी**

केंद्र सरकारने रविवारी प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला २०२६ या वर्षासाठी १३१ पद्म पुरस्कारांची घोषणा केली. यात महाराष्ट्रातील एकूण १५ जणांना पद्म पुरस्कार जाहीर झाले आहेत. दिवंगत अभिनेते धर्मेंद्र यांना मरणोपरांत पद्मविभूषण पुरस्कार जाहीर झाला. धर्मेंद्र यांच्यासह एकूण पाच जणांना पद्मविभूषण पुरस्कार जाहीर झाले. यातील दोन मरणोत्तर आहेत. नागपूरचे उद्योजक सत्यनारायण नुवाल, जनार्धन बापुराव बोथे यांच्यासह महाराष्ट्रातील ११ जणांना पद्मश्री पुरस्कार जाहीर झाला.

महाराष्ट्रातील तीन जणांना पद्मभूषण पुरस्कार जाहीर झाला आहे. यात गायिका अलका याज्ञिक यांना कला क्षेत्रातील, पीयूष पांडे यांना कला क्षेत्रातील मरणोत्तर आणि उदय कोटक यांना उद्योगासाठी पद्मभूषण पुरस्कार जाहीर करण्यात आला.

या व्यतिरिक्त महाराष्ट्रातील ११ जणांना पद्मश्री पुरस्कार जाहीर झाला. यात अर्मिडा फर्नांडिस (मेडिसिन), अशोक खाडे (उद्योग), भिकल्या लाडक्या (कला), जनार्धन बापुराव बोथे (सामाजिक कार्य), जुझेर वासी (विज्ञान व अभियांत्रिकी), माधव रंगनाथन (कला), रघुवीर खेडकर (कला), रोहित शर्मा (क्रीडा), सतीश शाह (मरणोत्तर) (कला), सत्यनारायण नुवाल (उद्योग), श्रीरंग लाड (कृषी) यांचा समावेश आहे.

आज सायंकाळी जाहीर झालेल्या पद्म पुरस्कारांत महाराष्ट्राचे माजी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी, झारखंडचे माजी मुख्यमंत्री दिवंगत नेते शिबू सोरेन आणि गायिका अलका याज्ञिक यांच्यासह एकूण १३ व्यक्तींची पद्मभूषणसाठी निवड करण्यात आली आहे.

दुसरीकडे क्रिकेटपटू रोहित शर्मा, अभिनेता आर. माधवन, पॅरा-ॲथलीट प्रवीणकुमार, महिला क्रिकेटपटू हरमनप्रीत कौर आणि हॉकीपटू सविता पूनिया यांच्यासह ११३ व्यक्तींची पद्मश्री पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. ◀(वृत्तसंस्था)



धर्मेंद्र | सत्यनारायण नुवाल | जनार्दन बोथे

### राष्ट्रसंताच्या कार्याचा गौरव : बोथे गुरूजी

केंद्र सरकारने मला जाहीर केलेला पद्मश्री पुरस्कार हा राष्ट्रसंताच्या कार्याचा गौरव आहे. त्यांचे विचार समाजातल्या सर्व घटकांपर्यंत पोहोचविण्याचे माझे कार्य असेच शेवटच्या श्वासापर्यंत सुरू राहील. या कार्यासाठी माझ्या सहकाऱ्यांची साथ मला मिळाली. आमच्या सर्वांच्या कार्याची दखल म्हणजे हा पुरस्कार आहे, अशी भावना जनार्दन बोथे गुरूजी यांनी तभाशी बोलताना व्यक्त केली. ■

### पद्म विजेत्यांत १९ महिला

पद्म पुरस्कार विजेत्यांपैकी १९ महिलांचा समावेश आहे. त्यापैकी सहा परदेशी श्रेणीतील आहेत. १६ व्यक्तींना हा पुरस्कार मरणोत्तर जाहीर झाला, असी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. ■

> सोलर इंडस्ट्रीज इंडिया लिमिटेडचे संस्थापक-अध्यक्ष सत्यनारायणजी नुवाल यांना पद्मश्री पुरस्कार जाहीर होणे ही अतिशय आनंदाची आणि प्रतिष्ठेची बाब आहे. या प्रतिष्ठित पुरस्कारासाठी त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन! समस्त नागपूरकरांसाठी हा गौरवास्पद क्षण आहे. इंडस्ट्रीज क्षेत्राबरोबरच नुवाल यांचे सामाजिक क्षेत्रातील योगदानही उल्लेखनीय आहे. त्यांच्या पुढील वाटचालीसाठी त्यांना मन:पूर्वक शुभेच्छा.
>
> **नितीन गडकरी**, केंद्रीय मंत्री



अलका याज्ञिक | उदय कोटक | पीयूष पांडे




अर्मिडा फर्नांडिज | अशोक खाडे | भिकल्या ढिंडा



जुझेर वासी | आर. माधवन | रघुवीर खेडकर



सतीश शाह | श्रीरंग लाड



सोलापूर : प्रजासत्ताक दिनानिमित्त सोलापूर महापालिकेच्या आवारातील कौन्सिल हॉल आणि इंद्रभुवन इमारतीवर केलेली मनोहारी विद्युत रोषणाई.









सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### इंडिगोने १६ विमानतळांवर ७१७ फ्लाईट स्लॉट्स सोडले

**नवी दिल्ली :** देशातील सर्वात मोठ्या इंडिगो एअरलाइनने भारतातील विविध देशांतर्गत विमानतळांवर आपले ७१७ स्लॉट सरेंडर केले आहेत. नागरिक विमानन महासंचालनालयाच्या त्या निर्णयानंतर हे पाऊल उचलण्यात आले आहे, ज्यात ऑपरेशनल अडचणी आणि हिवाळ्यात धुक्यामुळे होणारा विलंब लक्षात घेऊन इंडिगोच्या हिवाळ्यातील वेळापत्रकात कपात करण्यात आली होती. इंडिगोने एकूण १६ विमानतळांवर आपले स्लॉट सोडले आहेत. यामध्ये मुंबई विमानतळावर सर्वाधिक २३६ स्लॉट कमी झाले आहेत. त्यानंतर दिल्लीचा क्रमांक लागतो, जिथे १५० स्लॉट सरेंडर करण्यात आले आहेत.

### व्हॉट्सअ‍ॅपवर पुन्हा गोपनीयता भंगप्रकरणी आरोप

**सॅन फ्रान्सिस्को :** जगातील सर्वात लोकप्रिय मेसेजिंग अ‍ॅप व्हॉट्सअ‍ॅपची मूळ कंपनी मेटा पुन्हा एकदा गोपनीयतेच्या आरोपांच्या घेऱ्यात आहे. सॅन फ्रान्सिस्को येथील फेडरल कोर्टात दाखल केलेल्या नवीन खटल्यात दावा करण्यात आला आहे की, कंपनी वापरकर्त्यांच्या त्या चॅट्सनाही पाहू शकते, ज्यांना ती एंड-टू-एंड एनक्रिप्टेड असल्याचे सांगून पूर्णपणे सुरक्षित असल्याचा दावा करते. ऑस्ट्रेलिया, ब्राझील, भारत, मेक्सिको आणि दक्षिण आफ्रिकेतील वापरकर्त्यांच्या एका गटाने हा क्लास-अ‍ॅक्शन खटला दाखल केला आहे.

# आदिवासी-हिंदू वेगळे नाहीत : सरसंघचालक

**रांची, २५ जानेवारी**

आदिवासी समाज आणि हिंदू समाज वेगळे नाहीत. हिंदू हे कोणत्याही विशिष्ट पूजा पद्धतीचे नाव नाही, तर जीवन जगण्याची एक पद्धती आहे; ज्यात विविधता असूनही एकतेचा भाव अंतर्भूत आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी केले.

रांची येथील डीबडीह येथे जनजाती संवाद कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाला झारखंडमधील विविध जिल्ह्यांतून आलेले ३२ जनजातींचे प्रतिनिधी, बुद्धिजीवी, सामाजिक कार्यकर्त्यांसह अनेक नागरिकांची उपस्थिती होती.




सरसंघचालक म्हणाले, हजारो वर्षांपासून भारताची सभ्यता जंगल, शेती आणि निसर्गाच्या सोबतीने सामंजस्याने वाटचाल करते आहे. वेद आणि उपनिषदांचे मूळही याच जीवन पद्धतीशी जोडलेले आहे.

आपली पृथ्वी माता सर्व भाषा, संस्कृती आणि समुदायांचे पालन करणारी आहे. त्यामुळे या विविधतेचा सन्मान करणे ही आपली परंपरा आहे. धर्माचे मूळ सत्य, सेवा, परोपकार आणि संयमात आहे. समाज जेव्हा भोग आणि स्वार्थात गुंतून पडला तेव्हा परस्पर मतभेद वाढले आणि बाह्य आक्रमणकारींनी त्याचा गैरफायदा घेतला. म्हणून समाजात फूट पडता कामा नये. जर समाजात फूट पडली तर तो कमकुवत होतो आणि एकजूट राहिला तर कोणतीही ताकद त्याचे नुकसान करू शकत नाही. संघाने समाजाला कधीही तोडले नाही; उलट समाजाला जोडण्याचेच काम केले आहे.

आदिवासी समुदायाच्या शिक्षण, रोजगार आणि सांस्कृतिक रक्षणावर भर देताना सरसंघचालक म्हणाले की, लहान मुलांना सुरुवातीपासूनच आपली संस्कृती, परंपरा आणि गौरवाचे शिक्षण द्यायला हवे. असे झाले तर ते भरकटण्याची शक्यता राहणार नाही आणि काही क्षणांसाठी भरकटल्यासारखे वाटले तरी आपल्या मूळ स्थानी परत येतील. या समाजाकडे भगवान बिरसा मुंडांसारख्या महापुरुषांचा वारसा आहे. त्यांच्या विचारांशी सर्वांचा परिचय व्हायला हवा.

आदिवासी समुदायाच्या भूमीचे रक्षण, श्रम करणाऱ्यांची प्रतिष्ठा, स्थानिक स्तरावरील रोजगार निर्मिती आणि सामाजिक समरसता ही आज काळाची गरज आहे. धर्मांतरण, जमीन हडपणे, सामाजिक शोषण आणि लोकसंख्येतील बदल अशा आव्हानांचा सामना संघटित होऊनच केला जाऊ शकतो. आदिवासी समाज बांधवांनी आत्मनिर्भर होत आपल्या स्वाभिमानाला जागृत केले पाहिजे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे कोणत्याही बाह्य शक्तींवर विसंबून राहण्याची प्रवृत्ती सोडून द्यावी, असेही सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत म्हणाले. (वृत्तसंस्था)

# सरकारने बदलले टोल टॅक्सचे नियम

### ७० टक्क्यांपर्यंत मिळणार सूट

**नवी दिल्ली, २५ जानेवारी**

सरकारने टोल टॅक्सच्या नियमांत बदल केले असून, त्याअंतर्गत आता ७० टक्क्यांपर्यंत सूट मिळणार आहे. एनएचएआयच्या नवीन नियमानुसार, दोन पदरी राष्ट्रीय महामार्गांच्या रुंदीकरणाचे काम सुरू असताना टोल टॅक्समध्ये ७० टक्के सूट देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. म्हणजेच प्रवाशांना आता केवळ ३० टक्के टोल भरावा लागेल.

रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने राष्ट्रीय महामार्ग शुल्क नियम, २००८ मध्ये महत्त्वाच्या सुधारणा केल्या आहेत. या नवीन नियमानुसार, ज्या दोन पदरी राष्ट्रीय महामार्गांचे चौपदरीकरण किंवा त्यापेक्षा अधिक रुंदीकरण करण्याचे काम सुरू आहे, तिथे वाहनचालकांकडून पूर्ण टोल वसूल केला जाणार नाही. यात ७० टक्क्यांची मोठी कपात करण्यात आली आहे.

### चौपदरी महामार्गावर २५ टक्के सूट

नवीन नियमानुसार, जर एखाद्या चौपदरी महामार्गाचे सहा किंवा आठ पदरी रुंदीकरण होत असेल, तर टोल टॅक्समध्ये २५ टक्के सूट दिली जाईल. म्हणजेच प्रवाशांना ७५ टक्के टोल भरावा लागेल. याशिवाय, टोल रस्त्याचा खर्च पूर्ण वसूल झाल्यानंतर केवळ ४० टक्के टॅक्स घेण्याचा नियम आधीपासूनच लागू आहे.



**सवलतीचे स्वरूप आणि अंमलबजावणी**

सुधारित नियमांनुसार, कामाच्या सुरुवातीच्या तारखेपासून प्रकल्प पूर्ण होईपर्यंत प्रवाशांना टोलच्या केवळ ३० टक्के रक्कम भरावी लागेल. याचाच अर्थ बांधकामादरम्यान प्रवाशांना टोल दरांमध्ये ७० टक्क्यांची थेट सूट मिळेल. विशेष म्हणजे, दरवर्षी टोल दरांमध्ये ७ ते १० टक्क्यांनी वाढ करते. एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले की, ही सुधारणा नवीन वर्षापासून लागू करण्यात आली असून सरकारने यासंदर्भात अधिसूचना जारी केली आहे. हा नियम सध्या सुरू असलेल्या आणि नवीन अशा सर्व प्रकल्पांना लागू होईल जिथे टू-लेन हायवेचे फोर-लेनमध्ये अपग्रेडेशन होत आहे. (वृत्तसंस्था)

# देशातील ९८२ पोलिस कर्मचाऱ्यांना सेवापदके प्रदान

### शौर्य आणि विविध सेवापदकांचा समावेश

**नवी दिल्ली, २५ जानेवारी**

२०२६ च्या प्रजासत्ताक दिनानिमित्त देशातील ९८२ पोलिस, अग्निशमन दल, होमगार्ड, नागरी संरक्षण आणि सुधारणा सेवा कर्मचाऱ्यांना शौर्य आणि विविध सेवा पदके प्रदान करण्यात आली.

या सन्मानांमध्ये १२५ शौर्यपदकांचा समावेश होता, असे केंद्रीय गृह मंत्रालयाने एका निवेदनात म्हटले आहे. सर्वाधिक ४५ शौर्यपदके जम्मू-काश्मीरमधील कारवाई क्षेत्रात तैनात असलेल्या जवानांना देण्यात आली आहेत. त्यानंतर ३१ पदकांसह नक्षलवादी हिंसाचारग्रस्त गडचिरोलीतील पोलिस दल दुसऱ्या क्रमांकावर आहे आणि ईशान्येकडील प्रदेशात तैनात असलेल्या पाच जवानांना ही पदके मिळाली आहेत.

शौर्यपदक विजेत्यांमध्ये अग्निशमन विभागाच्या चार जवानांचा समावेश आहे. जम्मू-काश्मीर पोलिसांना सर्वाधिक ३३ शौर्य पदके मिळाली आहेत. त्यानंतर महाराष्ट्रातील गडचिरोली पोलिसांना ३१ पदके, उत्तरप्रदेश पोलिसांना १८ आणि दिल्ली पोलिसांना १४ पदके मिळाली आहेत.

केंद्रीय सशस्त्र पोलिस दलांमध्ये सीआरपीएफ हे एकमेव पोलिस दल आहे, ज्याला १२ पदकांच्या स्वरूपात शौर्य पुरस्कार मिळाले आहेत. या यादीमध्ये अधिकाऱ्यांसाठी आणि कर्मचाऱ्यांसाठी १०१ राष्ट्रपती विशिष्ट सेवा पदके आणि ७५६ गुणवत्तापूर्ण सेवापकदांचाही समावेश आहे. (वृत्तसंस्था)

### सीबीआय सहसंचालक व्ही. चंद्रशेखर यांचा सन्मान

कोलकाताच्या आर. जी. कार वैद्यकीय महाविद्यालयातील डॉक्टरवरील बलात्कार आणि हत्या प्रकरणाच्या तपासावर देखरेख करणारे सीबीआयचे सहसंचालक व्ही. चंद्रशेखर हे ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त पोलिस पदकांनी सन्मानिक करण्यात आलेल्या केंद्रीय संस्थेच्या ३१ अधिकाऱ्यांपैकी एक आहेत. गुजरात कॅडरचे २००० मधील तुकडीचे आयपीएस अधिकारी चंद्रशेखर यांना प्रजासत्ताक दिनानिमित्त प्रतिष्ठित राष्ट्रपती विशिष्ट सेवा पदकाने सन्मानित करण्यात आल्याचे रविवारी सरकारने जारी केलेल्या यादीतून स्पष्ट झाले.



प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला जम्मू-काश्मिरात सुरक्षा व्यवस्थेत वाढ करण्यात आली आहे. नियंत्रण रेषेवरून दहशतवादी घुसखोरी करू नये यासाठी पुंछ परिसरात पोझिशन घेऊन सज्ज असलेले जवान

# कुटुंबासह विदेशात पलायनाचा इम्रानचा डाव पोलिसांनी उधळला

### मिर्झापूर धर्मांतरणाचा प्रमुख सूत्रधार

**मिर्झापूर, २५ जानेवारी**

उत्तरप्रदेशातील मिर्झापूर जिल्ह्यात महिलांच लैंगिक शोषण, धर्मांतर आणि ब्लॅकमेलिंगमध्ये गुंतलेली एक संघटित टोळी चालवणाऱ्या मुख्य सूत्रधाराला दिल्लीच्या इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर अटक करण्यात आली. तो कुटुंबासह विदेशात पळून जाण्याच्या प्रयत्नात होता.

इम्रान असे आरोपीचे नाव आहे. तो मिर्झापूर येथील रहिवासी आहे. मिर्झापूर जिल्ह्यात त्याची 'केजीएम जिम वन' नावाची जिमची साखळी आहे. तो आपल्या जिमच्या माध्यमातून हे रॅकेट चालवत असे. या वेगेवगळ्या जिमचे संचालन त्याचे नातेवाईक करीत होते, अशी माहिती पोलिसांनी दिली.

तो आपल्या कुटुंबासह इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या टर्मिनल ३ मधून दुबईला पळून जाण्याच्या प्रयत्नात होता. केंद्र सरकारच्या इमिग्रेशन विभागाने त्याला ताब्यात घेऊन दिल्ली पोलिसांकडे सोपवले, असे पोलिस अधिकाऱ्यांनी सांगितले.

इम्रान हा संघटित टोळीचा मुख्य सूत्रधार होता. तो देश सोडून पळून जाण्याचा प्रयत्न करीत असल्याची माहिती आम्हाला मिळाली होती, असे मिर्झापूरचे वरिष्ठ पोलिस अधीक्षक सोमेन बर्मा यांनी पत्रकारांना सांगितले. त्यामुळे त्याच्याविरुद्ध देशातील सर्व विमानतळे आणि बंदरांवर लूकआऊट नोटीस जारी करण्यात आली होती, असे बर्मा यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

### अटक केलेल्यांत पोलिस कर्मचारी

जिमच्या नावाखाली चालवल्या जाणाऱ्या कथित लैंगिक शोषण आणि धर्मांतरण रॅकेटच्या संदर्भात पोलिसांनी आतापर्यंत सहा जणांना अटक केली असून, ही सातवी अटक आहे. अटक करण्यात आलेल्यांमध्ये एका जीआरपी कॉन्स्टेबलचा समावेश आहे. तो भदोही जिल्ह्यात कार्यरत आहे, त्याला निलंबित करण्यात आले आहे. कोतवाली देहात पोलिस ठाण्याच दोन महिलांनी तक्रार दाखल केल्यावर २० जानेवारी रोजी हा प्रकार उघडकीस आला होता.

# बांगलादेशात गिरणी कामगारांचा संपाचा इशारा

### कापड उद्योगात भारताविरोधी धागा पेटला

**ढाका, २५ जानेवारी**

बांगलादेशच्या अर्थव्यवस्थेचा कणा असलेला वस्त्रोद्योग सध्या एका मोठ्या संकटात सापडला आहे. बांगलादेश टेक्सटाईल मिल्स असोसिएशनने १ फेब्रुवारी २०२६ पासून देशातील सर्व सूत गिरण्या अनिश्चित काळासाठी बंद ठेवण्याची घोषणा केली आहे. भारताकडून होणाऱ्या शुल्कमुक्त धागा आयातीमुळे स्थानिक उद्योगांना मोठा तोटा सहन करावा लागत असल्याचा आरोप गिरणी मालकांनी केला आहे.

बांगलादेशमधील तयार कपडे निर्यातदार भारताकडून मोठ्या प्रमाणात शुल्कमुक्त सूत किंवा धागा आयात करतात. भारतीय सुताच्या कमी किमतींमुळे बांगलादेशच्या स्थानिक सूत गिरण्यांना बाजारात टिकणे कठीण झाले आहे. बीटीएमएच्या दाव्यानुसार, सध्या स्थानिक गिरण्यांकडे सुमारे १२,५०० कोटी टका किमतीचा धागा पडून आहे, कारण त्याला खरेदीदार मिळत नाहीयेत.

**स्थानिक गिरण्यांच्या प्रमुख मागण्या**

भारताकडून होणाऱ्या १० ते ३० काउंटच्या सुतावर त्वरित आयात शुल्क लादण्यात यावे. सूत गिरण्यांना मिळणाऱ्या नैसर्गिक वायूचा पुरवठा अखंडित आणि सवलतीच्या दरात करावा. वाढत्या बँक व्याजातून दिलासा मिळावा. (वृत्तसंस्था)

### काय परिणाम होईल?

१ फेब्रुवारीपासून गिरण्या खरोखरच बंद झाल्या, तर बांगलादेशच्या कापड उद्योगातील सुमारे १० लाखांहून अधिक कामगारांच्या रोजगारावर टांगती तलवार येईल. तसेच, बांगलादेशच्या एकूण निर्यातीपैकी ८५ टक्के वाटा असलेल्या तयार कपड्यांच्या पुरवठा साखळीवर याचा मोठा परिणाम होईल.

# अर्ध्या जगावर जलसंकटाचे सावट

### दिल्ली, मुंबई, बंगळुरूत पाण्याची टंचाई | चेन्नई दुष्काळाच्या उंबरठ्यावर



**नवी दिल्ली, २५ जानेवारी**

जगातील अर्धी लोकसंख्या म्हणजेच सुमारे चार अब्ज लोक जलसंकटाचा सामना करत आहेत, असा अहवाल संयुक्त राष्ट्रसंघाने दिला आहे.

अहवालात असा इशारा देण्यात आला आहे की, जगातील १०० सर्वात मोठ्या शहरांपैकी निम्म्या शहरांना गंभीर पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. यामध्ये दिल्ली, बीजिंग, न्यूयॉर्क आणि रिओ यांसारख्या मोठ्या शहरांचा समावेश आहे. अहवालानुसार, ३९ शहरांमध्ये परिस्थिती अत्यंत गंभीर आहे.

अहवालात दिल्ली चौथ्या स्थानावर आहे. कोलकाता नवव्या, मुंबई बाराव्या, बंगळुरू चोविसाव्या आणि चेन्नई एकोणतिसाव्या स्थानावर आहेत. याव्यतिरिक्त, हैदराबाद, अहमदाबाद, सुरत आणि पुणे देखील दीर्घकाळापासून पाणीटंचाईचा सामना करत आहेत. अफगाणिस्तानची राजधानी काबूल हे पहिले आधुनिक शहर बनू शकते जिथे पाणी पूर्णपणे संपेल. मेक्सिको सिटी दरवर्षी सुमारे २० इंच दराने खाली जात आहे. कारण भूगर्भातील पाण्याचा जास्त वापर केला जात आहे. अमेरिकेच्या नैऋत्येकडील राज्यांमध्ये कोलोराडो नदीच्या पाण्यावरून वाद सुरू आहे.

**चार अब्ज लोकांकडे पाणीटंचाई**

अहवालानुसार, नद्या आणि तलाव आटत आहेत, भूगर्भातील पाण्याची पातळी खालावत आहे आणि पाणथळ जागा कोरड्या पडत आहेत. जमीन खचत आहे, सिंकहोल तयार होत आहेत आणि वाळवंट पसरत आहेत. दरवर्षी सुमारे ४ अब्ज लोकांना किमान एक महिना पाणीटंचाईचा सामना करावा लागतो. (वृत्तसंस्था)

### डे झिरोच्या जवळ चेन्नई

तेहरान सलग सहाव्या वर्षी दुष्काळाचा सामना करत आहे आणि डे झिरोच्या अगदी जवळ आहे, म्हणजे असा दिवस जेव्हा नागरिकांसाठी अजिबात पाणी शिल्लक राहणार नाही. केप टाऊन आणि चेन्नई देखील यापूर्वी याच स्थितीच्या जवळ पोहोचले आहेत. युनायटेड नेशन्स युनिव्हर्सिटीच्या इन्स्टिट्यूट फॉर वॉटर, एन्व्हायर्नमेंट अँड हेल्थ डिपार्टमेंटचे संचालक कावेह मदानी यांचे म्हणणे आहे की, एका नवीन आणि मर्यादित वास्तवासह जगायला शिकावे लागेल.

# अमेरिकेत हिवाळी वादळामुळे हजारो उड्डाणे रद्द

**ओक्लाहोमा सिटी, २५ जानेवारी**

अमेरिकेत आलेल्या एका महाभयंकर वादळामुळे शनिवारपासून देशाच्या मोठ्या भागामध्ये हाहाकार माजण्यास सुरुवात झाल्याने, आठवड्याच्या अखेरीस अमेरिकेतून उड्डाण करणारी हजारो विमानांची उड्डाणे रद्द करण्यात आली. या वादळामुळे वीजपुरवठा खंडित झाला असून, धोकादायक बर्फामुळे प्रमुख महामार्गांवर वाहतूक ठप्प झाली आहे.

न्यू मेक्सिकोपासून न्यू इंग्लंडपर्यंत सुमारे १४ कोटी लोक, म्हणजेच अमेरिकेच्या ४० टक्क्यांहून अधिक लोकसंख्या, हिवाळी वादळाच्या इशाऱ्याखाली होती. राष्ट्रीय हवामान सेवेने शनिवार ते सोमवारपर्यंत दक्षिणेकडील रॉकी पर्वतरांगांपासून न्यू इंग्लंडपर्यंत मोठ्या प्रमाणावर जोरदार बर्फवृष्टी, गारपीट व गोठवणाऱ्या पावसाचा अंदाज वर्तवला आहे.


त्यांनी लोकांना अनेक दिवस चालणाऱ्या कडाक्याच्या थंडीसाठी तयार राहण्याचा इशारा दिला आहे. बर्फ व हिवाळी पाऊस वितळायला खूप वेळ लागेल आणि तो लवकर जाणार नाही. त्यामुळे कोणत्याही मदतकार्यात अडथळा येईल, असे राष्ट्रीय हवामान सेवेच्या हवामानशास्त्रज्ञ ॲलिसन सँटोरेली म्हणाल्या. (वृत्तसंस्था)

# तमिळनाडूमध्ये हिंदीसाठी जागा नाही : स्टॅलिन

**चेन्नई, २५ जानेवारी**

तामिळनाडूचे मुख्यमंत्री आणि अध्यक्ष एम.के. स्टालिन यांनी रविवारी तमिळ भाषा शहीद दिनानिमित्त राज्यातील भाषा शहीदांना श्रद्धांजली वाहिली. त्यांनी सांगितले की, येथे हिंदीसाठी कधीही जागा नसेल.

स्टॅलिन म्हणाले, आम्ही हिंदी भाषा लादण्याचा नेहमीच विरोध करू. तमिळ भाषेसाठी आमचे प्रेम कधीही मरणार नाही. जेव्हा जेव्हा हिंदी आमच्यावर लादली गेली, तेव्हा तेव्हा तितक्याच वेगाने तिचा विरोधही करण्यात आला. ज्या शहीदांनी तमिळसाठी आपले मौल्यवान प्राण दिले, त्यांना मी कृतज्ञतापूर्वक आदराने वंदन करतो. भाषा युद्धात आता आणखी कोणाचाही जीव जाणार नाही. तमिळनाडूच्या मुख्यमंत्र्यांनी भाषा हुतात्मा दिनानिमित्त वर हिंदीविरोधी आंदोलनाशी संबंधित इतिहासाचा एक छोटा व्हिडिओ शेअर केला. यात १९६५ मध्ये हिंदीच्या विरोधात झालेल्या संघर्षाशी संबंधित छायाचित्रे आहेत. मुख्यमंत्र्यांनी द्रमुकच्या दिवंगत दिग्गजांचे, सी.एन. अण्णादुराई आणि एम. करुणानिधी यांच्या योगदानाचेही स्मरण केले. (वृत्तसंस्था)



### सराफा

| | |
|---|---|
| सोने (स्टॅण्डर्ड/१० ग्रॅम) | रु. १,५९,६०० |
| चांदी (प्रतिकिलो) | रु. ३,४३,४०० |

### तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| सोलापूर | ३१.७ | १७.० |
| अमरावती | ३१.८ | १४.३ |
| भंडारा | -.- | १४.० |
| बुलडाणा | ३०.० | १६.० |
| चंद्रपूर | ३०.० | १६.२ |
| गडचिरोली | ३०.६ | १३.६ |
| गोंदिया | २९.६ | ११.८ |
| नागपूर | ३०.१ | १२.६ |
| वर्धा | ३०.९ | १३.५ |
| वाशीम | ३१.२ | १३.४ |
| यवतमाळ | २९.८ | १६.० |

# हिरवा साप आपला इतिहास विसरलाय

### नीतेश राणेंचा जलील यांना इशारा

**मुंबई, २५ जानेवारी**



ठाणे महापालिका निवडणुकीतील विजयानंतर एमआयएमच्या नवनिर्वाचित नगरसेविका सहर शेख यांनी केलेल्या मुंब्रा हरा कर देंगे विधानाला पक्षाचे प्रदेशाध्यक्ष इम्तियाज जलील यांनी पाठिंबा दिला. येणाऱ्या काळात संपूर्ण महाराष्ट्र हिरवा करू, असे विधान जलील यांनी केल्याने राज्याच्या राजकारणात ठिणगी पडली आहे. जलील यांच्या या चॅलेंजला भाजपा आमदार आणि राज्याचे मंत्री नीतेश राणे यांनी अत्यंत तिखट आणि जहरी शब्दांत प्रत्युत्तर दिले आहे. महाराष्ट्र हिरवा करू म्हणणाऱ्या हिरव्या सापाला जमिनीत गाडू, असा इशारा नीतेश राणे यांनी इम्तियाज जलील यांना दिला. मुंब्र्यातील एमआयएम नगरसेविका सहर शेख यांनी निवडणुकीनंतर एक वादग्रस्त विधान केले होते. या विधानाचा बचाव करताना माजी खासदार इम्तियाज जलील यांनी, सहर शेख यांचे विधान हे केवळ त्यांचे वैयक्तिक मत नसून पक्षाचे अधिकृत मत आहे, असे सांगत संपूर्ण महाराष्ट्र हिरवा करण्याचा संकल्प बोलून दाखवला होता. जलील यांच्या याच हिरव्या विधानाचा नीतेश राणे यांनी समाचार घेतला आहे. (वृत्तसंस्था)

### औरंगजेबाला याच भूमीत गाडले

नीतेश राणे यांनी इम्तियाज जलील यांचा उल्लेख हिरवा साप असा करत जोरदार प्रहार केला. हा हिरवा साप कदाचित आपला इतिहास विसरला असावा. औरंगजेब आणि टिपू सुलताननेही महाराष्ट्राला हिरवे करण्याचे स्वप्न पाहिले होते. पण त्यांना याच भूमीत गाडून छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराजांनी भगवा फडकवत इतिहास घडवला आहे, अशा शब्दांत राणेंनी जलील यांची कानउघाडणी केली.

# कल्याणमध्ये 'नॉट-रिचेबल' नगरसेवकांचे झळकले पोस्टर

### पोलिसांतही तक्रार दाखल

**कल्याण, २५ जानेवारी**

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत सत्तेच्या चाव्या कुणाकडे जाणार याची चर्चा सुरू असतानाच, नगरसेवकांच्या पळवापळवीच्या संशयाने राजकीय वातावरण तापले आहे. ठाकरे गटाचे ११ उमेदवार निवडणुकीत विजयी झाले आहेत. मात्र, त्यापैकी चार नगरसेवक १६ जानेवारीपासून बेपत्ता असल्याने खळबळ उडाली आहे. या प्रकरणावरून आता ठाकरे गट आक्रमक झाला असून कल्याण पूर्व परिसरात या नगरसेवकांचे 'हरवले आहेत' अशा आशयाचे पोस्टर झळकवण्यात आले आहेत.

महापालिकेत आपला महापौर बसवण्यासाठी सर्वच पक्षांनी कंबर कसली असताना ठाकरे गटाचे चार शिलेदार अचानक गायब झाले आहेत. बेपत्ता झालेल्या नगरसेवकांमध्ये मधुर म्हात्रे, कीर्ती ढोणे, राहुल कोट आणि स्वप्नील केणे यांचा समावेश आहे. या विजयी उमेदवारांशी कोणताही संपर्क होत नसल्याने अखेर ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांनी कोळशेवाडी पोलिस ठाण्यात धाव घेऊन लेखी तक्रार दाखल केली आहे. मात्र, तक्रार देऊनही पोलिस प्रशासन सुस्त असून, नगरसेवकांचा शोध घेण्यास टाळाटाळ केली जात आहे, असा गंभीर आरोप पक्षाच्या स्थानिक नेत्यांनी केला आहे. (वृत्तसंस्था)

# ‘डॉ.’ लिहिणे एमबीबीएस पदवीधरांची मक्तेदारी नाही

**केरळ उच्च न्यायालयाचा निर्वाळा ● फिजिओथेरपिस्ट, ऑक्युपेशनल तज्ज्ञांना मोठा दिलासा**

**◆ तिरुवनन्तपुरम, २५ जानेवारी**

नावामागे ‘डॉ.’ हे बिरूद लावणे केवळ एमबीबीएस किंवा तत्सम पदवीधरांचीच मक्तेदारी नाही. वैद्यक क्षेत्रातील विविध मान्यताप्राप्त उपचार पद्धती आणि अगदी दर्शन शास्त्र, साहित्य अशा कोणत्याही क्षेत्रातील तज्ज्ञ मंडळी डॉक्टरच म्हणवले जातात. या सर्व तज्ज्ञांना ‘डॉ.’ लावण्यापासून कोणीही थांबवू शकत नाही, असा निर्वाळा केरळ उच्च न्यायालयाने दिला आहे.

केरळ उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती व्ही.जी. अरुण यांच्या खंडपीठाने नुकताच फिजिओथेरपी क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांच्या बाजूने निकाल दिला. हे खंडपीठ इंडियन असोसिएशन ऑफ फिजिकल मेडिसिन अँड रिहॅबिलिटेशन (आयएपीएमआर) द्वारे दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी करत होते. फिजिओथेरपिस्टना केवळ तंत्रज्ञ किंवा वैद्यकीय डॉक्टरांचे सहाय्यक म्हणून मर्यादित ठेवण्याची मागणी करणाऱ्या युक्तिवादांना न्यायालयाने पूर्णपणे फेटाळून लावले. यासोबतच, आपल्या निर्णयात स्पष्ट केले की फिजिओथेरपी ही एक वैज्ञानिक आणि पुरावा-आधारित उपचार पद्धती आहे. म्हणून, या क्षेत्रातील तज्ज्ञांना पूर्ण स्वायत्ततेने काम करण्याचा अधिकार आहे. ◂(वृत्तसंस्था)



### नोव्हेंबरमध्ये ‘डॉक्टर’च्या वापरास तात्पुरती बंदी

यापूर्वी नोव्हेंबर २०२५ मध्ये याच न्यायालयाने आपल्या एका अंतरिम आदेशाने फिजिओथेरपिस्टकडून डॉक्टर या शब्दाच्या वापरास तात्पुरती बंदी घातली होती. त्या आदेशामुळे देशभरातील फिजिओथेरपी व्यावसायिकांमध्ये मोठी निराशा होती. मात्र, २३ जानेवारी २०२६ च्या या अंतिम निर्णयाने ती बंदी पूर्णपणे रद्द केली आहे.

# अंतराळवीर शुभांशु शुक्ला यांना ‘अशोक चक्र’

**◆ नवी दिल्ली, २५ जानेवारी**

आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर (आयएसएस) पार पडलेल्या ऐतिहासिक अंतराळ मोहिमेदरम्यान दाखवलेल्या असामान्य धैर्य आणि कर्तव्यनिष्ठेसाठी ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला यांना भारताचा सर्वोच्च शांतताकालीन शौर्य पुरस्कार अशोक चक्र देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. अत्यंत आव्हानात्मक परिस्थितीतही त्यांनी दाखवलेली मानसिक दृढता, नेतृत्वगुण आणि धैर्य यामुळे भारताची मान जागतिक पातळीवर उंचावली आहे.



२५ जून २०२५ रोजी सुरू झालेल्या ॲक्सिओम-४ या अंतराळ मोहिमेचा भाग म्हणून शुभांशू शुक्ला यांनी तीन अन्य आंतरराष्ट्रीय अंतराळवीरांसह आयएसएसकडे यशस्वी झेप घेतली. विंग कमांडर राकेश शर्मा यांच्यानंतर अंतराळात जाणारे ते भारताचे दुसरे अंतराळवीर ठरले, तर आयएसएसवर जाण्याचा मान मिळवणारे पहिले भारतीय म्हणून त्यांची नोंद झाली. सुमारे २० दिवस अंतराळात वास्तव्य करताना त्यांनी ६० पेक्षा अधिक वैज्ञानिक प्रयोग पूर्ण केले.

१४ जुलै २०२५ रोजी ते सुरक्षितपणे पृथ्वीवर परतले. त्यांच्या यशस्वी परतीनंतर देशभरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव झाला. उत्तर प्रदेशातील लखनऊ येथील रहिवासी असलेले शुभांशू शुक्ला यांनी बारावीनंतर राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीमध्ये प्रवेश घेतला. २००६ मध्ये ते भारतीय हवाई दलात दाखल झाले. २०१९ मध्ये गगनयान कार्यक्रमासाठी त्यांची अंतराळवीर म्हणून निवड झाली होती. आज त्यांच्या या ऐतिहासिक कामगिरीमुळे ते देशासाठी प्रेरणास्थान ठरले आहेत. ◂(वृत्तसंस्था)

# तेजस्वी यादव आरजेडीचे नवे कार्यकारी अध्यक्ष

**◆ पाटणा, २५ जानेवारी**

तेजस्वी यादव यांची राष्ट्रीय जनता दलाचे नवे राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्ष म्हणून निवड झाली आहे. पाटणा येथे राजदच्या राष्ट्रीय कार्यकारिणीची एक महत्त्वाची बैठक झाली. लालूप्रसाद यादव, राबडी देवी आणि मीसा भारती यांच्यासह पक्षाचे जवळजवळ सर्व प्रमुख नेते या बैठकीत उपस्थित होते. राजदचे बिहार प्रदेश अध्यक्ष मंगणी लाल मंडल यांनी बैठकीत ही घोषणा केली.

पाटणा येथील एका हॉटेलमध्ये झालेल्या राजदच्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या बैठकीत भोला यादव यांनी हा प्रस्ताव मांडला. लालू प्रसाद यांच्या निर्देशानुसार मांडण्यात आलेल्या या प्रस्तावाला कार्यकारी सदस्यांनी हात वर करून पाठिंबा दिला. लालू प्रसाद यांच्या प्रकृती अस्वास्थ्यामुळे पक्षाने पहिल्यांदाच कार्यवाहक अध्यक्ष निवडला आहे. तेजस्वी यांना अध्यक्षपदाचे सर्व अधिकार देण्यात आले आहेत. एका राजद नेत्याने माध्यमांना सांगितले की, बैठकीत उपस्थित असलेल्या जवळजवळ सर्व नेत्यांनी तेजस्वी यादव यांना जबाबदारी देण्याची मागणी केली. पक्ष नेत्यांनी सांगितले की तेजस्वी यादव हे आता बिहार आणि राजदचे भविष्य आहेत. त्यानंतर, तेजस्वी यादव यांची पक्षाचे नवे कार्यकारी अध्यक्ष म्हणून एकमताने निवड करण्यात आली. लालू प्रसाद यादव यांनी तेजस्वी यादव यांना प्रमाणपत्र दिले. ◂(वृत्तसंस्था)

# दूषित पाण्यामुळे काँग्रेस वॉर्ड अध्यक्षाचा मृत्यू

**इंदूरमध्ये मृतांचा आकडा २८ वर**

**इंदूर, २५ जानेवारी -**

इंदूरमध्ये दूषित पाण्यामुळे २८ वा मृत्यू झाला आहे. भागीरथपुरा येथील रहिवासी, निवृत्त शिक्षक राजाराम बौरासी (७५) यांनी रविवारी उपचारादरम्यान अखेरचा श्वास घेतला. बौरासी काँग्रेसचे वॉर्ड अध्यक्षही होते.

कुटुंबीयांनी सांगितले की, राजाराम बौरासी यांना शुक्रवारी उलट्या आणि जुलाबाची तक्रार होती. प्रकृती बिघडल्याने त्यांना सुरुवातीला स्थानिक डॉक्टरांना दाखवण्यात आले, परंतु आराम मिळाला नाही. त्यानंतर शनिवारी सकाळी त्यांना सरकारी सुपर स्पेशालिटी रुग्णालयात दाखल करण्यात आले, जिथे रविवारी उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

दुसरीकडे, आरोग्य विभागाने सांगितले की- २०१८-१९ च्या अँजिओग्राफी अहवालानुसार, राजाराम बौरासी हृदयविकाराने ग्रस्त होते. त्यांना उच्च रक्तदाब आणि मधुमेहाचाही त्रास होता. उपलब्ध वैद्यकीय कागदपत्रां ध्ये उलट्या-जुलाबाची पुष्टी होत नाही. सध्या, दूषित पाण्यामुळे आजारी असलेले १० लोक सरकारी सुपर स्पेशालिटी रुग्णालयात दाखल आहेत, त्यापैकी ४ आयसीयूध्ये आहेत.



# येळंबला अखंड हरिनाम सप्ताहाचा भव्य सोहळा

**महिला ग्रामसंघाचा उत्स्फूर्त सहभाग**

**वैराग, दि. २५ जानेवारी-**

तालुक्यातील येळंब येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी श्री भगवंताच्या कृपेने आणि समस्त ग्राम स्थांच्या सहकार्याने २५ व्या (रौप्य महोत्सवी) अखंड हरिनाम सप्ताहाचे अत्यंत उत्साहात आयोजन करण्यात आले आहे. १९ जानेवारी पासून सुरू झालेल्या या सप्ताहाची सांगता २५ जानेवारी २०२६ रोजी भव्य महाप्रसादाने झाली. सप्ताहाच्या निमित्ताने गावात मंगलमय वातावरण असून दररोज पहाटे ४ ते ६ काकडा भजन, सकाळी ९ ते १० विष्णू सहस्त्रनाम, १० ते १२ गाथा भजन, दुपारी भोजन व विश्रांती, सायंकाळी ६ ते ७ हरिपाठ, रात्री ९ ते ११ कीर्तन आणि रात्री ११ ते ४ हरिजागर असे भरगच्च कार्यक्रम पार पडले. या धार्मिक सोहळ्याचे विशेष आकर्षण म्हणजे झाशीची राणी महिला ग्रामसंघ, येळंब यांचा सक्रिय सहभाग होता. सप्ताहाची सांगता रविवार, सकाळी ९ ते १२ या वेळेत ह.भ.प. श्री. ज्ञानेश्वर काकडे महाराज (हावरगाव) यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली.गावातील महिलांनी एकत्र येऊन या सप्ताहाच्या नियोजनात मोलाचा वाटा उचलला आहे. यामध्ये कामिनी काळदाते, विद्या पवार, वैशाली पवार, उषा गलांडे, आशा गलांडे, अलका पाटील, शकुंतला बोधले, लता कदम, सुषमा काळदाते, शितल काळदाते, जयश्री मोरे, पल्लवी काळदाते, सविता पाटील, वर्षा पाटील, सुनिता काळदाते. ननोबी शेख, लजिना शेख, सुप्रिया पाटील, अनिता पाटील. यांसह समस्त महिला ग्रामसंघाच्या सदस्यांनी सप्ताहाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले आहेत.

### कीर्तनकारांची मांदियाळी


सप्ताहामध्ये नामवंत कीर्तनकारांची सेवा लाभली आहे. यामध्ये ह.भ.प. श्री. शाडू महाराज आंधळे, ह.भ.प. श्री. दत्ता महाराज आंबेकर, ह.भ.प. श्री. लक्ष्मण लांडे महाराज, ह.भ.प. श्री. गजेंद्र महाराज लिख्खे (खेर्डा), ह.भ.प. श्री. आप्पा महाराज जावळे आणि ह.भ.प. श्री. ज्ञानेश्वर महाराज (येडशी) यांच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते.



# श्री मार्कंडेय मंदिरात महाआरती

**सोलापूर, दि. २५ जानेवारी-**

श्री भावनाऋषी व भद्रावती देवी यांच्या कल्याणोत्सवनिमित्त पश्चिम महाराष्ट्र पद्मशाली संघमच्यावतीने श्री मार्कंडेय मंदिरात महाआरती करण्यात आली. रथसप्तमी दिवशी पश्चिम महाराष्ट्र पद्मशाली संघमच्यावतीने पद्मशाली समाजाचे कुलदैवत भगवान मार्कंडेय महामुनींचे सुपुत्र श्री भावनाऋषी व भद्रावतीदेवी यांच्या कल्याणोत्सव निमित्त सिद्धेश्वर पेठ येथील श्री मार्कंडेय मंदिरातील हा कार्यक्रम घेण्यात आला.या मंदिरातील भावनाऋषी व भद्रावतीदेवीची पूजा व महाआरती श्री मार्कंडेय महामुनींच्या आरतीनंतर पश्चिम महाराष्ट्र पद्मशाली संघाचे अध्यक्ष डॉ. सूर्यप्रकाश कोठे यांच्या हस्ते सपत्निक पूजा करण्यात आली.यावेळी पश्चिम महाराष्ट्र पद्मशाली संघमचे सर्व पदाधिकारी, ज्ञाती संस्थेचे पदाधिकारी, युवक संघटनेचे पदाधिकारी व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## अग्रलेख...

# इस्लामिक नाटो हे षडयंत्रच!

दक्षिण आशियात भारताच्या विरोधात आणखी एक आघाडी उभारण्याचा प्रयत्न तथाकथित उम्माहचे बगलबच्चे करीत आहेत. चीनने फेकलेल्या तुकड्यावर गुजराण करणारा आपला पारंपरिक शत्रू पाकिस्तान पश्चिम आणि दक्षिण आशियातील देशांमध्ये लष्करी शक्ती वाढविण्याचा प्रयत्न करीत आहे. विशेषतः आखाती देशातील त्यातही सुन्नी आणि बरेलवी विचारधारा असलेल्या मुस्लिम देशांना शस्त्रास्त्रांची मदत आणि सैन्य प्रशिक्षण देण्याची धडपड कुख्यात गुप्तचर संस्था आयएसआय आणि पाकिस्तानी लष्कराने चालविली आहे. या घडामोडींमुळे पश्चिम आणि दक्षिण आशियातील शक्ती संतुलन बिघडण्याची चिन्हे असून त्याचा थेट परिणाम भारतावर पडणार आहे. कारण पाकिस्तानची प्रत्येक चाल नवी दिल्लीला लक्ष्य करीत चाललेली असते. या चालीमागे असतो तो अत्यंत घातकी आणि दगाबाज चीन. हा ड्रॅगन म्यानमार, नेपाळ, बांगलादेश, श्रीलंका, पाकिस्तान आदी देशांचा प्याद्यांसारखा वापर करीत भारताला जमीन, आकाश आणि सागरी मार्गाने घेरण्याच्या चाली खेळत असतो. प्रथम कर्जाच्या रूपाने आर्थिक मदत करून चीन छोट्या देशांना आपल्या जाळ्यात अडकवतो आणि बदल्यात त्या देशाची एकतर भूमी ताब्यात घेतो किंवा लष्करी तळ उभारतो. श्रीलंका, म्यानमार, नेपाळ आणि पाकिस्तान या देशांची उदाहरणे आपल्यासमोर आहेत. भारताशी वैर पकडल्याने श्रीलंका तर अक्षरशः भिकेला लागली होती. अखेर भारताने अन्नधान्य, औषधे व आर्थिक मदत केल्याने लंकेची स्थिती काही प्रमाणात ताळ्यावर आली. के. पी. ओली आणि प्रचंड पंतप्रधान असताना नेपाळने चीनच्या चिथावणीने भारताला त्रास देण्याचा प्रयत्न केला; पण या लाल मर्कटांची कुकरीधारी जेन-झेडने अशी काही नशा उतरविली की, त्यांना घरदार सोडून पळून जावे लागले. अजूनही काहींची भारताविरुद्धची खुमखुमी गेलेली नाही. नेपाळ हिंदू देश असल्याने भारतही या देशाने काही आगळीक केली तरी मन मोठे करून त्याकडे सातत्याने दुर्लक्ष करीत आलेला आहे. भारत कुणालाही त्रास देत नाही, हा इतिहास आहे. अगदी प्राचीन काळापासून पाहिले तरी एखाद्या भारतीय राजाने दुसऱ्या देशावर आक्रमण करून नरसंहार केल्याचा अथवा लुटमार केल्याचा इतिहास नाही. उलटपक्षी पश्चिमेकडून अरब, तुर्क आणि मुस्लिमांनी वारंवार भारताला रक्तरंजित केले. नेपाळ-श्रीलंकेच्या पंक्तीत आता बांगलादेश जाऊन बसला आहे. या देशावर भारताचे एवढे उपकार आहेत की ते कधीही फिटणारे नाहीत; ज्यांचे पश्चिमेतील भाईबंद पूर्वेतील म्हणजे आपल्याच मुस्लिम बांधवांना गोळ्या घालून ठार मारत असताना, महिलांवर बलात्कार करीत असताना भारत मदतीला धावून आला आणि बांगलादेश नावाचा नवा देश जन्माला घातला. पण, आज तोच बांगलादेश धर्माच्या नावाखाली भारताला नख लावण्याचा प्रयत्न करतो आहे, धमक्या देतो आहे. अगदी वर्ष-दीड वर्षापूर्वी आशियातील उदयोन्मुख अर्थव्यवस्था म्हणून पुढे आलेला आणि ज्याचा जीडीपी भारताच्याही पुढे होता, असा बांगलादेश आता कंगाल होण्याच्या मार्गावर आहे. शेख हसीनांनी अल्प काळात बांगलादेशमध्ये आर्थिक सुधारणा केल्या. तो देश आता महागाई आणि कर्जाच्या विळख्यात अडकला आहे. भारताच्या कच्च्दया मालावर ढाका, चित्तगाव, सिल्हेट येथील कारखाने चालायचे; ते आता बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. एवढे सारे होऊनही नवी दिल्ली अजूनही तेथील परिस्थिती शांत होण्याच्या प्रतीक्षेत आहे. कारण शेजारच्या घरी आग लागली तर आपल्याला त्याचा झळा सोसाव्या लागतातच. निष्पाप हिंदूच्या हत्या, असंतोष आणि हिंसाचाराने इस्लामिक स्टेटच्या दिशेने निघालेला बांगलादेश अजूनही जळतो आहे आणि या आगीत पाकिस्तान तेल ओतण्याचे काम करीत आहे. अशीच आग आता दक्षिण आशियात लावण्याच्या कामी पाकिस्तान लागला आहे. सौदी अरेबिया आणि तुर्कस्तानला सोबत घेऊन 'इस्लामिक नाटो' नावाचा गट तयार करण्याचा खटाटोप इस्लामाबादने सुरू केला आहे. हा गट थेटपणे भारताविरुद्ध कारवाया करण्याची क्षमता बाळगणार नसला, तरी मध्यपूर्वेत आणि अरब देशांमध्ये भारताच्या हिताला बाधा आणू शकतो. पाकिस्तानच्या संरक्षण साहित्य उत्पादन विभागाचे मंत्री रझा हयात हर्राझ यांनी पाकिस्तान-सौदी अरेबिया-तुर्कस्थान यांच्यातील करार हा मुस्लिमांच्या हिताचे रक्षण करणारा असल्याचे म्हटले आहे. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे संरक्षणासाठी अमेरिकेच्या मदतीवर अवलंबून असलेल्या आखाती देशांना भाड्याचे सैन्य आणि लष्करी साहित्य विकण्याची पाकिस्तानची योजना आहे. एकीकडे अमेरिकेच्या नेतृत्वातील नाटो ही लष्करी संघटना, नव्या काळात, जगातील कोणत्याही देशाचे काहीही वाकडे करू शकली नाही. आता ही तीन देशांची टिनपाट 'इस्लामिक नाटो' कोणते तीर मारणार आहे, असा विचार करून चालणार नाही. कारण हे षडयंत्र आहे. हा त्रिपक्षीय करार करण्यामागे पाकिस्तानचा स्वार्थ दडलेला आहे. चीन आणि पाकिस्तान संयुक्तपणे जेएफ-१७ या लढाऊ विमानांची आणि काही क्षेपणास्त्रांची निर्मिती करतात. चीनमधील चेंगडू या शहरात ही विमाने तयार केली जातात. एकूण निर्मित विमानांपैकी चीनच्या वाट्याला ५८ टक्के तर पाकिस्तानच्या वाट्याला ४२ टक्के विमाने येतात. पाकिस्तानला ही विमाने आणि क्षेपणास्त्रे सौदी, सुदानसह अन्य अरब देशांना विकायची आहेत. यासाठी सुदानसोबत १.५ बिलियन तर सौदीसोबत २ बिलियन डॉलर्सचा संरक्षण करार करण्याचा खटाटोप सुरू आहे. आतापर्यंत नाटो आणि युरोपियन देशांच्या छत्रछायेखाली राहिलेल्या आणि कट्टर इस्लामिक देश म्हणून उदयास येत असलेल्या तुर्कस्थानला आता युरोप आणि आशियात स्वतंत्रपणे वावरायचे आहे. नव्याने आकारास येणारी 'इस्लामिक नाटो' संघटना भविष्यात भारत आणि इस्रायलसाठी डोकेदुखी ठरणारी आहे. पाकिस्तानकडे असलेली अण्वस्त्रे, सौदी अरेबियाची आर्थिक शक्ती आणि तुर्कस्थानकडे असलेले ड्रोन तंत्रज्ञान, ही युती दक्षिण-पश्चिम आशियासह आफ्रिकेतील शक्ती संतुलन बिघडविणारी ठरणार आहे. मे २०२५ मधील 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये सपाटून मार खाल्ल्यानंतर 'इस्लामिक नाटो'बाबत चर्चा सुरू झाली. नोव्हेंबर २०२४ मध्ये आराखडा तयार झाल्यानंतर तिन्ही देशांनी संघटना स्थापन करण्यास सहमती दर्शविली. भारताने चार दिवस चाललेल्या संघर्षात चीन आणि तुर्कस्थानच्या ड्रोन आर्मीचा सत्यानाश केला. अझरबैझान-आर्मेनिया युद्धात तुर्कस्थानच्या ड्रोन्सनी निर्णायक भूमिका निभावली होती. भारतासाठी अशा प्रकारची लढाई हा पहिलाच अनुभव होता. चीनची क्षेपणास्त्रे आणि तुर्कस्थानचे ड्रोन्स यांच्या एकत्रित शक्तीला भारताच्या हवाई संरक्षण यंत्रणेने सीमेवरच रोखले. शेकडो क्षेपणास्त्रे आणि हजारो ड्रोन्स भारताने तयार केलेले अभेद्य हवाई कवच भेदण्यात अपयशी ठरली. २०१४ नंतरचा भारत हा काही वेगळाच आहे. शत्रूच्या आक्रमणाची प्रतीक्षा करीत संरक्षणात्मक भूमिका घेण्याऐवजी घरात घुसून मारण्याची क्षमता आणि शक्ती असलेला हा भारत आहे. उरी, डोकलाम, बालाकोट अन् गलवानच्या मैदानावर तसेच 'ऑपरेशन सिंदूर'च्या माध्यमातून जमीन आणि आकाशात शत्रूला चारीमुंड्या चित करण्याची धमक असलेला हा भारत आहे. शेकडो वर्षांपासून सुरू असलेली आक्रमणे झेलूनही जगात ताठ मानेने उभा असलेला हा देश आज कुणाच्याही धमकीला घाबरणारा नाही. जो देश स्वतःला जगाचा दादा समजतो, त्या अमेरिकेलाही न जुमानता भारत जगाच्या पटलावर आपल्या भूमिका निर्भयपणे मांडतो आहे. गाझाच्या उभारणीसाठी डोनाल्ड ट्रम्प यांनी स्थापन केलेल्या शांतता मंडळाला नवी दिल्लीने अजूनही भीक घातलेली नाही. कारण भारत आजही बहुपक्षीयतेला आणि संयुक्त राष्ट्राच्या श्रेष्ठतेला मानतो. त्यामुळे ट्रम्प यांचे शांतता मंडळ असो की इस्लामिक नाटो असो, भारत अशा तथाकथित शक्ती मंचांना आपले दीर्घकालीन हित आणि जागतिक शांतता लक्षात घेऊनच प्रतिसाद देत असतो. १४० कोटी लोकसंख्या आणि जगातील चौथी लष्करी महासत्ता असलेल्या भारताच्या लष्करी सिद्धतेचा पाया हा आजही सत्य, संयम आणि शांततेवर आधारलेला आहे. प्रथम आक्रमण न करण्याचे तत्त्व भारत पाळत आहे. युद्धांचा हजारो वर्षांचा अनुभव असलेल्या आणि बुद्धाचा देश असलेल्या या विशाल भारताचे इस्लामिक नाटोसारखे मंच काहीच वाकडे करू शकणार नाही. पण षडयंत्र असेल तर सावध राहायलाच हवे!

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**

# दोन देशांचे 'जन्मस्थान' - लाहोर!

आज २६ जानेवारी २६! तारखेचा असा योग आता एका शतकानंतर म्हणजे २१२६ मध्ये येईल. मात्र, ९४ वर्षांपूर्वी २६ जानेवारी १९३० या एका तारखेने २६ जानेवारीचा इतिहास रचला गेला. आणि तोही पाकिस्तानच्या लाहोर शहरात. लाहोरचा इतिहास फार मनोरंजक आहे. भारतीय स्वातंत्र्याचा निर्णायक क्षण- लाहोरने अनुभवला आणि पाकिस्तान निर्मितीचा पायाही लाहोरमध्येच घातला गेला. लाहोर शहर एकप्रकारे दोन्ही देशांचे 'जन्मस्थान' ठरले. लाहोर हे अतिशय सुंदर शहर असल्याचे सांगितले जाते. बहुधा म्हणूनच पंजाबीत एक म्हण आहे, 'जिसनै लहौर नहीं देख्या, कुछ नहीं देख्या!'

**दोन दरवाजे** : नवी दिल्लीतील लाल किल्ल्याचा एक दरवाजा 'लाहौरी दरवाजा' म्हणून ओळखला जातो तर लाहोरमधील एक दरवाजा 'दिल्ली दरवाजा' म्हणून ओळखला जातो. हे दोन्ही दरवाजे मोगल काळात बांधले गेले. दिल्ली आणि लाहोर यांना जोडणारा रस्ताही त्याच काळात बांधला गेला. दिल्ली दरवाजातून निघणारा रस्ता थेट लाहोर दरवाजापर्यंत जात असे, तर लाहोरच्या दिल्ली दरवाजातून निघणारा रस्ता थेट दिल्लीच्या लाहौरी दरवाजापर्यंत जात असे. सायंकाळी अंधार पडला की हे दोन्ही दरवाजे बंद केले जात असत.

**पुष्पहार!** : १९४७ च्या फाळणीनंतर एक उर्दू लेखक सादत हसन मिंटो यांनी एक व्यंगात्मक कथा लिहिली होती, त्या कथेचे शीर्षक होते- 'पुष्पहार'! एका सत्य घटनेवर ही कथा लिहिण्यात आली होती. सर गंगाराम या भारतीय अभियंत्याने १९२१ मध्ये लाहोर शहरात एक रुग्णालय बांधले, सर गंगाराम रुग्णालय. नंतर सर गंगाराम यांचा संगमरवरी पुतळा शहरात उभारण्यात आला. १९४७ च्या फाळणीनंतर सारेच वातावरण बदलले. एका दिवशी एक मोठा जमाव पुतळ्याच्या दिशेने निघाला. अनेकांच्या हातात चपला- जोडे यांच्या माळा होत्या. काहींनी सोबत डांबर घेतले होते. पुतळ्याला चपला- जोड्यांचा 'हार' घालावयाचा आणि नंतर पुतळ्याच्या चेहऱ्यावर डांबर फासावयाचे असा जमावाचा मानस होता. एक इसम हाती चपला-जोड्याची माळ घेऊन पुतळ्याच्या चबुतऱ्यावर चढला. तेवढ्यात पोलिस आले. जमावाला पांगविण्यासाठी पोलिसांनी गोळीबार सुरू केला. त्यात हा इसम जखमी झाला. मग जमाव ओरडू लागला, ''अरे त्याला ताबडतोब गंगाराम रुग्णालयात भरती करा.'' काही क्षणांपूर्वी हाच जमाव गंगाराम यांच्या पुतळ्याची विटंबना करण्यास सरसावला होता, तोच जमाव आता जखमींना गंगाराम रुग्णालयात नेण्यास सांगत होता. फाळणीनंतर लाहोर पाकिस्तानात गेले आणि स्वाभाविकच गंगाराम रुग्णालयही पाकिस्तानात गेले. मग, गंगाराम यांनी नवी दिल्लीत नवे गंगाराम रुग्णालय सुरू केले. विशेष म्हणजे लाहोर व नवी दिल्ली दोन्ही शहरांत आजही गंगाराम रुग्णालय सुरू आहे आणि दोन्ही रुग्णालये अत्याधुनिक म्हणून नावारूपास आली आहेत.



**पूर्ण स्वराज्य** : अशा या लाहोर शहराने भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा एक महत्त्वाचा व निर्णायक टप्पा अनुभवला. २९ डिसेंबर ते १ जानेवारी १९३० रोजी लाहोर शहरात झालेल्या काँग्रेस अधिवेशनात 'पूर्ण स्वराज्य' मिळविण्याचा प्रस्ताव पारित करण्यात आला आणि २६ जानेवारी हा भारताचा स्वातंत्र्य दिन असेल असेही घोषित करण्यात आले. या ठरावात प्रामुख्याने दोन तीन बाबी सांगण्यात आल्या होत्या.

१. ब्रिटिशांच्या गुलामगिरीपासून देशाला मुक्त करणे हे काँग्रेसचे लक्ष्य असेल. २. २६ जानेवारी १९३० हा पहिला स्वातंत्र्यदिन म्हणून साऱ्या देशभर साजरा केला जाईल. ३. अधिवेशन काळात ३१ डिसेंबरच्या मध्यरात्री लाहोरमध्ये रावी नदीच्या किनाऱ्यावर पं. जवाहरलाल नेहरू यांनी भारतीय तिरंगा फडकाविला.

**१० वर्षानंतर...** : लाहोर शहराजवळून वाहणाऱ्या रावीच्या पात्रातून १० वर्षांत बरेच पाणी वाहून गेले. १९४० मध्ये याच लाहोर शहरात २२ ते २४ मार्च या तारखांना मुस्लिम लीगचे अधिवेशन झाले. त्यात स्वतंत्र मुस्लिम देशाचा प्रस्ताव पारित करण्यात आला. या प्रस्तावात नव्या देशासाठी पाकिस्तान या नावाचा उल्लेख नव्हता. पण, यावेळी पारित करण्यात आलेल्या प्रस्तावाला 'पाकिस्तान प्रस्ताव' असे नाव देण्यात आले होते. हा प्रस्ताव भारताच्या फाळणीचा आणि पाकिस्तानच्या स्थापनेचा आधार ठरला.

**ब्रिटिशांची चाल** : १९४७ मध्ये भारताची फाळणी करताना ब्रिटिशांनी पाकिस्तानसाठी १४ ऑगस्ट तर भारतासाठी १५ ऑगस्ट या तारखा निवडल्या. दुसऱ्या महायुद्धाच्या संदर्भात ब्रिटिशांसाठी विशेषत भारताचे व्हाईसराय लॉर्ड माऊंटबॅटन यांच्यासाठी १५ ऑगस्ट ही एक महत्त्वाची तारीख होती. दुसऱ्या महायुद्धात १५ ऑगस्ट १९४५ रोजी जपानने मित्र देशांसमोर शरणागती पत्करली. याने आशियातील महायुद्ध संपले. त्यावेळी लॉर्ड माऊंटबॅटन हे मित्र सैन्याचे दक्षिण पूर्व आशियातील सर्वोच्च सेनापती होते. त्यांच्या मनात की डोक्यात १५ ऑगस्ट ही तारीख घट्ट बसली होती. त्यांनी भारत विभाजनासाठी तीच तारीख निवडली. १५ ऑगस्ट रोजी भारत स्वतंत्र झाल्यानंतर, भारताच्या नव्या सरकारने- नेहरू सरकारने १९३० च्या काँग्रेस प्रस्तावाचा आदर करण्यासाठी २६ जानेवारी हा प्रजासत्ताक दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला तर पाकिस्तानने लाहोर अधिवेशनाच्या स्मृती जागविण्यासाठी २३ मार्च हा 'पाकिस्तान दिवस' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला.

**योगायोग** : एक योगायोग म्हणजे १९३० च्या काँग्रेस अधिवेशनाचे अध्यक्षपद भूषविणारे पं. जवाहरलाल नेहरू भारताचे पहिले पंतप्रधान झाले तर १९४० च्या मुस्लिम लीगच्या अधिवेशनाचे अध्यक्षपद भूषविणारे मोहम्मद अली जिना पाकिस्तानचे पहिले गव्हर्नर जनरल झाले.

**दोघांचेही निधन** : भारतात राष्ट्रपिता मानल्या जाणाऱ्या महात्मा गांधींनी देशाची फाळणी टाळण्याचा प्रयत्न केला. पण, त्यात यश येण्याची शक्यता नाही हे लक्षात आल्यावर त्यांनी फाळणीस होकार दिला. दुसरीकडे जिना यांनी फाळणीचा मुद्दा सोडला नाही. त्यांना पाकिस्तानचे राष्ट्रपिता मानले जाते. महात्मा गांधी व मोहम्मद अली जिना अशा या दोन्ही राष्ट्रपित्यांचे निधन एकाच वर्षात १९४८ मध्ये झाले हा आणखी एक योगायोग.

**प्रजासत्ताक आणि...** : भारत आणि पाकिस्तान यांच्यातील हे काही योगायोग सोडले तर दोन्ही देशांत किती भिन्नता आहे. भारत खऱ्या अर्थाने प्रजासत्ताक राहिला तर पाकिस्तानात सत्ता चालली ती लष्कराची! भारतात कधी लष्करी उठावाची चर्चा झाली नाही. याला एक अपवाद राहिला. १९७१ च्या भारत-पाकिस्तान युद्धात पाकिस्तानचे दोन तुकडे झाले. त्यावेळी जनरल माणेकशा यांना अफाट प्रसिद्धी व लोकप्रियता मिळाली. त्यावेळी जनरल माणेकशा हे इंदिरा गांधी यांचे सरकार उलथविण्याचा प्रयत्न करणार आहेत हे काही काँग्रेस नेत्यांनी इंदिरा गांधींच्या मनावर ठसविले होते. पण, फक्त काही दिवस. नंतर ही सारी चर्चा निराधार असल्याचे स्पष्ट झाले. हा एक अपवाद वगळला तर भारतात लष्कराकडून सत्ता काबीज केली जाण्याची चर्चाही ऐकू आली नाही. दुसरीकडे पाकिस्तानात सरकार कुणाचेही असो, तेथे सत्ता चालते ती फक्त लष्कराची. आज पाकिस्तानातील शाहबाज शरीफ सरकारची अवस्था काय झाली आहे? सारी सत्ता फिल्ड मार्शल मुनीर यांच्या हाती एकवटली आहे. बहुतेक पाकिस्तानी नेते व लष्करी अधिकारी यांनी आपला सारा पैसा स्वीस बँकेत जमा केला आहे. पाकिस्तान कंगाल आहे, पण नेत्यांचा व लष्करी अधिकाऱ्यांच्या पैशाने स्वीस बँका जणू तुडुंब भरल्या आहेत. प्रजासत्ताक भारत आपले 'चांद्रयान' चंद्रावर उतरविण्यात यशस्वी झाला आणि लष्करीसत्ताक पाकिस्तान? पाकिस्तानचा 'चांद' फक्त त्याच्या हिरव्या झेंड्यावर आणि ईदच्या दिवशी आकाशात पाहण्यापुरताच मर्यादित राहिला.

## वेध

**पुंडलिक आंबटकर**

# इस्रोचा क्रांतिकारी प्रवास

सोमवार, २६ जानेवारी रोजी संपूर्ण देशात ७७ वा प्रजासत्ताक दिन हर्षोल्हासात साजरा होत आहे. याच पृष्ठभूमीवर भारतीय अंतराळ संशोधन संस्था अर्थात इस्रोने स्वत:चे अंतराळ स्थानक निर्माणाच्या दिशेने हालचाली वाढविल्या आहे. २०३५ पर्यंत हे उद्दिष्ट गाठायचे असून खाजगी कंपन्यांना या उपक्रमात सहभागी होण्यासाठी आवाहन करण्यात आले आहे. १६ जानेवारी २०२५ रोजी इस्रोने अंतराळात दोन यानांना एकत्र जोडून (स्पेस डॉकिंग) खळबळ उडवून दिली होती. अशी कामगिरी करणारा भारत चौथा देश ठरला. निर्धारित उपक्रमाचा पहिला टप्पा २०२८ मध्ये सुरू होणार आहे. सध्या जगात अमेरिका, रशिया आणि चीन या दृष्टीने आघाडीवर असले, तरी भारताचा हा उपक्रम पूर्णत: स्वत:च्या ताकदीवर राबविला जाणार आहे.

डॉ. विक्रम साराभाई यांनी १५ ऑगस्ट १९६९ मध्ये या अंतराळ संशोधन संस्थेची स्थापना केली. तत्पूर्वी या संस्थेचे नाव 'इनकोस्पार' असे होते. स्वातंत्र्यानंतर सुरुवातीच्या काळात भारताची परिस्थिती सर्वच अंगांनी कमकुवत असल्याने रॉकेटचे भाग सायकलने वाहून न्यावे लागले होते. आता त्याच इस्रोचा डंका संपूर्ण जगात झडत आहे. भारतीय प्रक्षेपण मोहिमांच्या यशाची टक्केवारी ९७ पर्यंत आहे; जी जगात सर्वाधिक आहे. दोन-तीन दुर्घटना सोडल्या तर इस्रोच्या सर्वच मोहिमा पहिल्याच प्रयत्नात यशस्वी झाल्या. पहिल्याच प्रयत्नात मंगळावर यान पाठविणारा भारत जगातील एकमेव देश ठरला आहे. शिवाय एकाच वेळी तब्बल १०४ उपग्रह प्रक्षेपित करून अंतराळात आपल्या निर्धारित कक्षेत स्थापन करण्याची किमया इस्रोने करून दाखविली असून चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर यान उतरविणारा भारत एकमेव देश आहे. भारताचे यान चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर उतरण्यापूर्वी रशियाच्या रॉसकॉसमॉसने घाईघाईत आपले यान पाठविले. परंतु, ते चंद्रावर उतरण्यापूर्वीच जळून खाक झाले. चंद्रावर पाण्याचे नमुने भारतानेच सर्वप्रथम शोधले. भारताच्या या संशोधनामुळे चंद्रावर मानवी वस्ती उभारण्यासाठी वाव मिळाला आहे. मनुष्याला अंतराळात पाठविण्यासाठी गगनयान मोहिमेवर काम सुरू आहे. इस्रोने आजपर्यंत १०० वर मोहिमा यशस्वी करून दाखविल्या आहेत. विशेष म्हणजे, आपल्या मोहिमा खूपच कमी खर्चाच्या पण परिणामकारक असल्याने संपूर्ण जगाचे लक्ष भारताकडे लागले आहे. सध्या अंतराळात दोन स्थानके कार्यरत आहे. त्यापैकी चीनचे स्वतःचे स्वतंत्र स्थानक आहे तर अमेरिका, रशिया, जपान, कॅनडा आणि युरोपियन देशांच्या सहकार्याने आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानक कार्यरत आहे. रशियाकडे पूर्वी स्वत:ची दोन स्थानके होती. परंतु, आता हा देश आयएसएसमध्ये सामील झाला आहे. अमेरिकेकडेसुद्धा स्काय लॅब नावाने स्वत:चे अंतराळ स्थानक होते. प्रारंभी रशिया आणि अमेरिकेमध्ये अंतराळ मोहिमा राबविण्याबाबत स्पर्धा होती. तेव्हा हे दोनच देश आघाडीवर होते. अवकाशात मनुष्य पाठविणारा तेव्हाचा सोव्हिएत संघ अर्थातच आताचा रशिया हा पहिला देश होता. रशियाचा युरी गागरीन सर्वप्रथम अंतराळात गेला. रशिया तेव्हा अमेरिकेपेक्षा आघाडीवर होता. परंतु, नंतर एन १ मून हे रॉकेट अपयशी ठरले आणि रशियाचा अंतराळ उपक्रम कमकुवत होत गेला. त्यामुळे अमेरिकेने चंद्रावर माणसे पाठवून आपले निर्विवाद वर्चस्व स्थापित केले. आता पुन्हा स्पर्धा निर्माण झाली असून, या स्पर्धेत भारत आघाडीवर आहे. वातावरण नसल्याने सूर्याची किरणे चंद्रावर थेट पडतात. त्यामुळे चंद्रावर हिलियम-३ चा साठा प्रचंड प्रमाणात असू शकतो. हिलियम-३ प्राप्त झाल्यास हजारो वर्षांच्या ऊर्जेची सोय होऊ शकते. त्यामुळे अमेरिकेसारखा प्रगत देश चंद्रावर मानवी वस्ती उभारण्यासाठी जोर लावत आहे. आता भारतानेही यात उडी घेतली असून आगामी काळात या क्षेत्रात भारत मोठी क्रांती घडवून आणेल, यात शंका नाही. भारत सध्या आर्थिक संक्रमणाच्या काळातून जात आहे. अर्थव्यवस्था झपाट्याने वाढत असतानाच अंतराळ संशोधनात गगनभरारी घेतली आहे. अमेरिकेसारख्या प्रगत देशांच्या तुलनेत भारत सरकार ठरवूनही इस्रोला पाहिजे तितका निधी देऊ शकत नाही. मात्र, आपल्या संशोधकांनी कमी खर्चाच्या मोहिमा राबवून जगाचे लक्ष वेधून घेतले . २०२५-२६ साठी सरकारने इस्रोला १.६ अब्ज डॉलर्स इतका निधी उपलब्ध करून दिला आहे. इतक्या कमी खर्चात इस्रोला आपल्या मोहिमा राबवाव्या लागणार आहे. दुसरीकडे अमेरिकन सरकार दरवर्षी २५ ते २७ अब्ज डॉलर्स इतका निधी नासाला उपलब्ध करून देते. भारतीय चलनात हा आकडा २ लाख कोटींपेक्षा अधिक होतो. अशाही परिस्थितीत अनेक छोटे-मोठे देश इस्रोवरच अवलंबून असून या माध्यमातून परकीय चलन भारतात येत आहे. भारत सरकार इस्रोच्या बजेटमध्ये दरवर्षी वाढ करीत आहे. गगनयान मोहिमेसाठी सरकारने १९ हजार कोटींपेक्षा अधिकचे बजेट उपलब्ध करून दिले आहे. एकूणच भारताला विश्वगुरू बनविण्याच्या मोहिमेत इस्रोचे मोठे योगदान राहील, यात शंका नाही.

९८८१७१६०२७

## कानोसा

**अमोल पुसदकर**

# प्रजासत्ताक दिनाचे चिंतन

२६ जानेवारी १९५० या दिवशी आपण प्रजासत्ताक राष्ट्र झालो. या दिवशी या देशातील प्रत्येक सामान्य माणसाला त्याचे अधिकार मिळाले. देशातील सर्वाधिक श्रीमंत व्यक्ती व निर्धन व्यक्ती या दोघांनाही कायद्याने, संविधानाने समान दर्जा प्राप्त झाला. ज्यावेळेस भारत स्वतंत्र झाला त्यावेळेला जगामध्ये अनेकानेक देश असे होते की जेथे राज्यतंत्र अस्तित्वात होते. भारततही अनादिकाळापासून राजेशाही नांदत आलेली होती. तरीसुद्धा भारताने लोकशाही स्वीकारली. या लोकशाहीला अधिक बळकट केले गणराज्य दिवसाने. गणराज्य दिवसालासुद्धा ७५ वर्षे पूर्ण झालेली आहेत. आम्ही ज्या दिशेने प्रवास सुरू केला होता त्या दिशेने आम्ही कुठवर पोहोचलो, काय प्राप्त केले याचा विचार करणे गरजेचे आहे.

नुकत्याच महानगर पालिकेच्या निवडणुका झालेल्या आहेत. मतदानाची टक्केवारी ५० इतकी कमी होती. सुशिक्षित आणि चांगले लोक राजकारणाचा स्तर पाहून किंवा स्वत:च्या आळसाने मतदान करायला जात नाहीत. ही किती चिंताजनक परिस्थिती आहे. प्रबुद्ध लोक मतदानाला जात नाहीत. अडाणी अशिक्षित लोक गठ्ठा मतदान करतात. सुशिक्षित लोकांची उदासीनता हे सुदृढ लोकशाहीसाठी, सुदृढ गणतंत्रासाठी चांगले लक्षण नाही. लोकांना अज्ञानात ठेवून इतकी वर्षे ज्यांनी राज्य केले त्याचे जे काही दुष्परिणाम समाजाला आणि राष्ट्राला भोगावे लागले. परंतु अजूनही समाज जागृत व्हायला तयार नाही. सज्जनांची उदासीनता, निष्क्रियता ही दुर्जनांच्या सक्रियतेला प्रोत्साहन देते.

संविधानाने तुम्हाला मतदानाचा अधिकार दिला. भारतातल्या सर्वांत सुशिक्षित माणसाचे मत आणि अशिक्षित माणसाचे मत या दोघांचेही मूल्य संविधानाने सारखे ठरवलेले आहे. त्यामुळे गठ्ठा मतदानाद्वारे तुम्ही योग्य माणसाला हरवू शकता आणि अयोग्य माणसाला जिंकून सुद्धा आणू शकता. ही लोकशाहीची थट्टाच आहे! गुन्हेगार सुद्धा तुरुंगातून निवडून येतात. या समाजाला आपला नेता कुठल्यातरी आरोपात शिक्षा भोगत आहे हे पाहून सुद्धा त्यालाच निवडून देण्याची इच्छा होते. यावरून त्यांच्या मनावर, विचारांवर कशा पद्धतीचे पांघरूण पडलेले आहे हे आपल्या लक्षात येते. प्रजातंत्रासाठी हे घातकच आहे.

एखाद्या भौगोलिक क्षेत्रामध्ये एखादा थोर समाजसेवक जरी राहत असेल तरी तो त्याच्या जातीचे लोक त्या भूभागात राहत नाहीत यामुळे निवडणुकीमध्ये सहज पराभूत होऊ शकतो. कारण आताच्या निवडणुका या जातीवर आधारित आहेत. मतदानाचा अधिकार मला मिळाला पाहिजे यासाठी जनता जागरूक आहे. पण मतदानाच्या कर्तव्याबद्दल मात्र ती उदासीन आहे. अधिकार तेव्हा सिद्ध होतो जेव्हा त्यासाठी कर्तव्यांची किंमत दिली जाते. परंतु समाज आपल्या कर्तव्यांबद्दल उदासीन दिसून येतो. ही काही चांगली परिस्थिती नाही. कुठलाही नवीन कायदा सरकारने केला तर त्यातील पळवाटा समाजातील हुशार लोक शोधून काढतात आणि कायद्याला केराची टोपली दाखविली जाते. आम्हीच आमच्यासाठी तयार केलेल्या कायद्यांना जर केराची टोपली दाखविणार असू तर प्रजातंत्र कसे बळकट होईल? वाहतुकीचे नियम तोडणारा, कायद्याच्या पळवाटा काढणारा, आयकर बुडविणारा स्वत:ला हुशार समजतो आणि कसा बुडविता येतो हेही तो लोकांना मोठ्या उत्साहाने समजावून सांगतो. ही पण परिस्थिती बदलणे आवश्यक आहे.

आरक्षणाच्या नावावर चालणारी आंदोलने समाजातील एकोपा नष्ट करण्यासाठी कारणीभूत ठरतात असा अनुभव आहे. भारतात राहणारा कुठलाही समाज असो त्याने एकोप्याने राहणे, राष्ट्रीय एकात्मता बळकट ठेवणे आवश्यक आहे. त्यासाठी जाती, पंथ, भाषा यावर भांडणे निर्माण होणे प्रजासत्ताकासाठी घातकच आहे. देशाच्या रक्षणासाठी सैन्य, समाजाला न्याय मिळण्यासाठी न्यायव्यवस्था, निवडणूक उत्तम रीतीने पार पाडण्यासाठी निवडणूक आयोग या सर्व व्यवस्था आम्हीच निर्माण केलेल्या आहेत. आपल्या व्यक्तिगत किंवा पक्ष स्वार्थासाठी त्यावर शंका घेणे आणि ती संपूर्ण व्यवस्थाच खराब आहे अशा पद्धतीचा आग्रह धरणे हे प्रजातंत्रासाठी योग्य नाही. प्रत्येक व्यवस्थेमध्ये काही दोष असू शकतात. हे दोष चांगल्या लोकांनी दाखवून दिले पाहिजेत. त्यामध्ये सुधारणेचा आग्रह सुद्धा धरला पाहिजे. पण तो आग्रह सुद्धा लोकशाही मार्गानेच असला पाहिजे. आज आपण पाहतो की, अनेक आंदोलनांमध्ये महामार्ग अवरुद्ध केले जातात. सरकारी आणि खाजगी संपत्तीचे नुकसान आणि जाळपोळ केली जाते. लोकशाही मार्गाने आंदोलन करणे हा तर जनतेचा अधिकारच आहे. परंतु त्यासाठी महामार्ग अवरुद्ध होणार नाहीत, सर्वसामान्य जनतेला त्रास होणार नाही, सरकारी व खाजगी मालमत्तेचे नुकसान होणार नाही याची काळजी करणारा समाजच प्रजातंत्र मजबूत करू शकतो. आज भारत वेगाने प्रगतिपथावर जात आहे. कदाचित विकसित राष्ट्र हे स्वप्न भारताचे साकारही होईल. परंतु जागृत, सक्रिय, कर्तव्यदक्ष समाजाच्या स्वप्नाचे काय? व्यवस्था अनेक बनविता येतील. परंतु व्यवस्थेचा आदर राखणारा समाज निर्माण करणे हे अत्यंत आवश्यक आहे.

एका गावामध्ये रात्रीच्या वेळेस लोकांना रस्त्यावरून ये-जा करण्यासाठी अंधाराचा त्रास होऊ नये म्हणून पथदिवे लावण्यात आले. परंतु लक्षात असे आले की तो दिवा कोणीतरी आपल्या घरी लावण्यासाठी चोरून नेलेला होता. असे अनेक वेळा झाले. तेव्हा ग्रामपंचायतीने त्या मार्गावर पथदिवे लावणे बंद केले. ऑफिसमधील कागद घरी नेणारा समाज, सरकारी गाडीचा दुरुपयोग करणारे अधिकारी, सत्तेचा गैरवापर करणारे राजकीय नेते आणि ''तो थुंकला म्हणून मीही थुंकणार'' अशा मानसिकतेचा समाज ही सर्वच प्रजासत्ताकासमोरील आव्हाने आहेत. प्रजासत्ताक दिन आपल्याला आपल्या अधिकारांबरोबरच कर्तव्यांचे स्मरणही करून देणारा दिवस आहे. या निमित्ताने नागरी कर्तव्यांचे जागरण करणे आवश्यक आहे. गृह संपर्काच्या निमित्ताने घराघरांमध्ये जाऊन सामाजिक सुव्यवस्थेसाठी नागरी कर्तव्यांची चर्चा व्यक्तींशी करणे आवश्यक आहे. वाहतुकीचे नियम पाळणारा समाज, पाणी, वीज, आयकर वेळेवर भरणारा समाज, नदी, नाले, जलाशय यांना प्रदूषणमुक्त ठेवणारा समाज, ''वापरा आणि फेकून द्या'' अशा प्रकारच्या प्लॅस्टिकला नाही म्हणणारा समाज प्रजासत्ताकाचा आधारस्तंभ आहे. देश नदी, नाले, पर्वतांनी मोठा बनत नाही. तर तो त्या देशामध्ये राहणाऱ्या समाजाच्या जीवनामध्ये कोणते जीवनमूल्य आहे यावर मोठा बनत असतो. प्राचीन काळी आपल्या ऋषिमुनींनी, समाज सुधारकांनी आपल्यासमोर मोठे आदर्श निर्माण करून ठेवलेले आहेत. त्या आदर्शांच्या प्रकाशात प्रजातंत्राच्या वाटेवर चालण्याचा संकल्प करणे हे चिंतन प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने आवश्यक आहे.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## वाचक पत्रे

### दावोसच्या परिषदेत महाराष्ट्राचे यश

दावोस परिषदेच्या उद्योग करारासाठी मु'यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली एक शिष्टमंडळ गेले. तेथील परिषदेत पहिल्याच दिवशी सुमारे साडेचौदा लाख कोटींचे करार करण्यात आले. या करारामुळे महाराष्ट्रातील उद्योगांना चालना मिळणार असून सुमारे १५ लाख रोजगार उपलब्ध होणार आहेत. भारतातील उद्योग गुंतवणुकीसाठी महाराष्ट्र 'गेट वे ऑफ इंडिया' असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. हरित ऊर्जा, अन्न प्रकिं या, पोलाद निर्मिती, आयटी क्षेत्र, जहाज बांधणी, अशा विविध क्षेत्रांत ही गुंतवणूक आहे. ही गुंतवणूक प्रामु'याने मुंबई, रत्नागिरी, पालघर, गडचिरोली, अहिल्यानगर या भागात होणार आहे विशेषतः गडचिरोलीसार'या भागात गुंतवणूक होणार असल्यामुळे तेथे विकासाला चालना मिळणार आहे. त्यामुळे तेथील उद्योग वाढण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे जगभरातल्या सर्वच उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधींनी महाराष्ट्रातील गुंतवणुकीला प्राधान्य दिले आहे. आता या पुढील काळ कसोटीचा आहे. येणाऱ्या उद्योगांना आवश्यक सुविधा वेळेवर व दर्जेदार पद्धतीने मिळाल्या पाहिजेत. मु'यमंत्री फडणवीस यांनी याबाबतीत काळजी घेतली जाईल असे सांगितले आहे. एकूणच महाराष्ट्राच्या रोजगार निर्मितीमध्ये या उद्योगांचा मोठा वाटा असणार आहे. महाराष्ट्राचे विकासाचे स्वप्न मु'यमंत्री साकार करत आहेत ही आनंदाची गोष्ट आहे. देशातील प्रथम कं मांकावरचे महाराष्ट्र राज्य विकासाच्या बाबतीत घोडदौड करत आहे.

**शांताराम वाघ**/९८२२९३९२८७

●● ●●

### जबाबदार नागरिक घडले तर राष्ट्र अधिक सक्षम

देश आज ७६ वा प्रजासत्ताक दिन साजरा करत आहे. १९५० मध्ये आपल्या देशाला संविधान प्राप्त झाले आणि भारत खऱ्या अर्थाने प्रजासत्ताक बनला. हा दिवस केवळ उत्सवाचा नसून, राष्ट्रीय कर्तव्यांची आठवण करून देणारा आहे. विशेषत:, राष्ट्रभक्तीची ओळख पुढील पिढीपर्यंत पोहोचवणे ही आजची सर्वांत महत्त्वाची जबाबदारी आहे.

गेल्या वर्षांत भारताने अनेक सुरक्षा आव्हानांना सामोरे जात धैर्य, संयम आणि काटेकोर तयारी दाखवली. यामध्ये ऑपरेशन 'सिंदूर' ही लक्षणीय घटना ठरली. पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर देशाच्या सुरक्षेच्या दृष्टीने केलेल्या या कारवाईत भारतीय सैन्याने अतिशय नेमकेपणा, अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि धैर्य दाखवून दहशतवादी तळांवर प्रभावी प्रहार केला. या मोहिमेने भारताची सुरक्षा धोरणाबाबतची ठाम भूमिका जगासमोर स्पष्ट केली. देशासाठी लढणाऱ्या सैनिकांचे योगदान अनमोल आहे. सीमांचे रक्षण करताना ते देशाचे स्वातंत्र्य, सुरक्षा आणि आपली भविष्यातील पिढी सुरक्षित ठेवण्यासाठी अहोरात्र तत्पर असतात. त्यांचे शौर्य, त्याग आणि निष्ठा हीच राष्ट्रभक्तीची खरी प्रेरणा आहे. राष्ट्रभक्ती केवळ सैन्यापुरती मर्यादित नाही. ती प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. घरातून मिळणारे संस्कार, शाळेतून होणारे शिक्षण, संविधानातील मूल्यांचा आदर आणि समाजात नियमांचे पालन, यामधून ती दृढ होते. येत्या पिढीला देशाचा अभिमान, त्याच्या इतिहासाची जाणीव आणि देशहिताचे भान देणे ही आजच्या काळाची गरज आहे. प्रजासत्ताक दिन आपल्याला एकच संदेश देतो-

''जबाबदार नागरिक घडले, तर राष्ट्र अधिक सक्षम होते.''

**राम देशमुख**/नागपूर

●● ●●

### डोनाल्ड ट्रम्प यांचे वर्तन गल्लीतल्या दादासारखे

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे दावोसला जात असताना त्यांच्या विमानात अचानक बिघाड झाल्याने त्यांना परत फिरवावे लागले. त्यांच्या विमानात तांत्रिक बिघाड झाला पण त्यांनी या बिघाडास इराणला जबाबदार धरले. आपला जीव घेण्यासाठी इराणने आपल्या विमानात बिघाड घडवून असा आरोप करताना असा प्रकार इराणने पुन्हा करण्याचा प्रयत्न केला तर मी इराणचा पूर्ण नायनाट करेन असा सज्जड दम दिला. इराणला दम देण्याआधी त्यांनी ग ीनलॅण्डवरून डेन्मार्कच्या पंतप्रधानांनाही धमकी दिली होती. त्याआधी मला नोबेल पुरस्कार दिला नाही. आता जागतिक शांततेची मला फिकीर नाही असा दम नॉर्वेच्या पंतप्रधानांना दिला. व्हेनेझुएलाच्या राष्ट्राध्यक्षांना तर थेट त्यांच्या देशातून उचलून आणून अमेरिकेच्या तुरुंगात डांबले. अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांचे हे वर्तन त्यांच्या पदाला शोभणारे नाही. जगातील सर्वांत मोठी लोकशाही असलेल्या देशाचे आपण राष्ट्राध्यक्ष आहोत याचे भान ट्रम्प यांनी ठेवायला हवे. गल्लीतल्या दादाप्रमाणे प्रत्येकाला दम देणे, धमक्या देणे हे त्यांचे काम नाही. आपला देश महासत्ता असून त्या देशाचे आपण सर्वेसर्वा असल्याने वाट्टेल तसे वागण्याचा परवाना आपल्याला मिळाला आहे असा समज ट्रम्प यांचा झाला आहे. त्यांचे हे वर्तन अमेरिकेच्या नागरिकांनाही मान्य नाही. आपल्या अशा वागण्याने अमेरिकेचेच नाव खराब होत आहे हे ट्रम्प यांना कोणीतरी समजावून सांगायला हवे. डोनाल्ड ट्रम्प यांनी दुसऱ्या देशांना धमक्या, दम देण्याचे सत्र थांबवले नाही तर लवकरच जग युद्धाच्या खाईत लोटले जाईल.

**श्याम ठाणेकर**/९९२२५४६२९५

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९४२२६१२२४५/८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. **RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. **Publised at** TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, **RNI No. MAHMAR/2023/86477**

● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



### मुंबई येथील भाविकाकडून श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरास ५१ हजारांची देणगी

**पंढरपूर, दि.२५ जानेवारी-**

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरास आज दि.२५ जानेवारी रोजी मुंबई येथील भाविक सौ. सुशिला जयंतीलाल कानकीया यांनी कै. मदन मुकुंद मेस्त्री व कै. मथुरा मदन मेस्त्री यांच्या पावन स्मरणार्थ रुपये ५१ हजार इतकी देणगी अर्पण केली आहे. या देणगीबद्दल मंदिर समितीच्या वतीने देणगीदारांचा व्यवस्थापक संदेश भोसले यांच्या हस्ते मंदिर समितीची दैनंदिनी व दिनदर्शिका देऊन यथोचित सन्मान करण्यात आला. देणगी घेण्यासाठी जादा स्टॉलची निर्मिती, ऑनलाईन देणगीसाठी QR CODE, RTGS, संकेतस्थळ, मोबाईल ॲपची सुविधा उपलब्ध असून, देणगीसाठी इच्छुक भाविकांनी श्री संत तुकाराम भवन येथील कार्यालयास संपर्क साधावा असे विभाग प्रमुख राजेश पिटले यांनी यावेळी सांगीतले.



### आसावा प्रशालेचे चित्रकला स्पर्धेत यश

**सोलापूर, दि.२५ जानेवारी-**

कला संचलनालयाद्वारे घेण्यात आलेल्या शासकीय रेखाकला ग्रेड परीक्षेत दयानंद काशीनाथ आसावा प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी उत्तम यश संपादन केले. श्रद्धा संतोष जाधव,श्रद्धा श्रीशैल तोडकरी, सिद्धी संजीव गजेली या विद्यार्थिनींनी एलिमेंटरी परीक्षेत अ श्रेणी प्राप्त केली. तसेच १४ विद्यार्थ्यांनी ब श्रेणी व१३ विद्यार्थ्यांनी क श्रेणी प्राप्त केली.इंटरमिजीएट ग्रेड परीक्षेस ४७ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते.त्यापैकी भावना नंदकुमार वड्डेपल्ली,समीक्षा विनायक सुतार, गायत्री श्रीनिवास करदास या तीन विद्यार्थ्यांनी अ श्रेणी प्राप्त केली. प्रशालेतील ११ विद्यार्थ्यांनी ब श्रेणी व ३३ विद्यार्थ्यांनी क श्रेणी प्राप्त केली आहे. रेखाकला ग्रेड परीक्षेचा अंतिम निकाल-एलिमेंटरी ग्रेड परीक्षा-अ श्रेणी-०३, ब श्रेणी-१४. यशस्वी विद्यार्थ्यांना प्रशालेतील शिक्षिका जयश्री खंडाळकर, दीपिका जवळगेकर, वृषाली इंगळे आणि रविकांत सुरवसे यांनी मार्गदर्शन केले.यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे स्थानिय सचिव महेश चोप्रा,प्रशासक डॉ. विजयकुमार उबाळे आणि प्रशालेच्या मुख्याध्यापिका मनिषा पाटील यांनी अभिनंदन केले.



### 'दयानंद'मध्ये नॅशनल स्टार्टअप डे संपन्न

**सोलापूर, दि. २५ जानेवारी-**

येथील डी.बी.एफ. दयानंद कला व शास्त्र महाविद्यालयात 'नवोपक्रम, नवसंशोधन आणि साहचर्य मंडळ' आणि संस्कृत विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने नॅशनल स्टार्टअप डेच्या निमित्ताने सोलापुरातील उद्योग व्यवसाय आणि पीच प्रस्तुती या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.कार्यक्रमासाठी योगिन गुर्जर हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून लाभले. विद्यार्थ्यांना सोलापुरातील वस्त्रोद्योग आणि कृषी यांसारख्या प्रमुख औद्योगिक क्षेत्रांची माहिती देणे, तसेच 'बिझनेस पीच' (व्यावसायिक सादरीकरण) करण्याचे कौशल्य शिकवणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.गुर्जर यांनी विद्यार्थ्यांना स्थानिक पातळीवर स्वयंरोजगार आणि उद्योजकतेच्या संधी शोधण्यासाठी प्रोत्साहित केले. या कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांना स्थानिक उद्योग विश्वाची स्पष्ट समज मिळाली आणि त्यांच्यामध्ये व्यावसायिक कल्पना मांडण्याचा आत्मविश्वास निर्माण झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. एच. दामजी हे होते. कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून डॉ. आर.एच. कुलकर्णी आणि प्रा. एल.सी. मूशन यांनी कार्य केले.




### मानव उत्थान सेवा समितीतर्फे वात्सल्य वृद्धाश्रमास आवश्यक साहित्य वाटप

**सोलापूर, दि. २५ जानेवारी-**

मानव उत्थान सेवा समिती पंढरपूर, शाखा सोलापूरच्या वतीने परमपूज्य श्रीयाश महाराज त्यांचा पावन जन्मदिवस व मकर संक्रांतीच्या निमित्ताने आस्था रोटी बँक संचलित वात्सल्य वृद्धाश्रम या ठिकाणी अत्याआवश्यक साहित्य वाटप करण्यात आले आहे. मानव धर्मचे प्रणेते सदगुरुदेव श्री सतपाल जी महाराज यांच्या कृपाशीर्वादाने मानव उत्थान सेवा समिती पंढरपूर आश्रमाचे प्रबंधक - दामिनीबाई व साध्वी जगेश्वरी बाई यांच्या हस्ते दैनंदिन वापरण्याकरिता साहित्य व एक वेळेचे जेवण वाटप करण्यात आले आहे यावेळी आस्था रोटी बँक संचलित अध्यक्ष विजयकुमार छचूरे, रेखा घाटे, भाटीया, मंगल पाढरे, स्नेहा वनकुद्रे, संगीता छंचूरे, विद्या सिंगम, शशिकला पाढरे उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी अंजना कुपगिरी, सुवर्णा मच्छा, निर्मला रापेल्ली, पद्मा चिप्पा, षुष्पाताई गोडूर, अन्नपूर्णा लगशेटटी, कविता संबारी आदींचे सहकार्य प्राप्त झाले.


# अपार आयडीसाठी ३१ जानेवारीपर्यंतची मुदत

## १४ लाखाहून जास्त विद्यार्थ्यांचा अपार आयडी तयार

**तभा वृत्तसेवा । अविनाश गायकवाड**
**सोलापूर, दि. २५ जानेवारी-**

दहावी, बारावी आणि ग्रॅज्युएशनच्या विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाची बातमी आहे. जर तुम्ही अजूनही अपार आयडी बनवला नसेल तर आत्ताच बनवून घ्या. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीच्या दृष्टीने प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी अपार आयडी असणे आवश्यक आहे. बऱ्याच विद्यार्थ्यांचा हा आयडी अजूनही तयार नसल्यामुळे सरकारने विद्यार्थ्यांना ३१ जानेवारी ही अंतिम मुदत दिली आहे. अपार कार्डवर विद्यार्थ्यांचे संपूर्ण शैक्षणिक डिटेल्स या कार्डावर उपलब्ध होणार आहेत. विद्यार्थ्यांच्या दृष्टीने हे आयडी फार महत्त्वाचे असणार आहे. दरम्यान, सरकारकडे आजतागायत १४ लाखाहून अधिक अपार आयडी तयार झाल्याचीही माहिती मिळाली.

१२ अंकी नंबर असलेलं कार्ड विद्यार्थ्यांच्या दृष्टीने महत्त्वाचे असणार आहे.




३१ जानेवारीपर्यंत विद्यार्थ्यांना त्यांच्या आधारकार्डवरील नाव आणि शैक्षणिक नोंदीतील नाव एकासारखे आहे का? हे तपासून ओळखपत्र बनवून घेण्याचे निर्देश देण्यात आले आहे. दररोज अपार आयडी काढण्याच्या सूचना प्राथमिक आणि शिक्षण अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. विद्यार्थ्यांच्या दृष्टीने अपार आयडी फायदेशीर असून त्यांची गुणपत्रिका, प्रमाणपत्रे एकाच ठिकाणी डिजिटल स्वरुपात मिळणार असल्याने कागदपत्रे गहाळ होण्याची भीतीही नाही.

### अपार आयडी बनवायचा कसा?

apaar.education.gov.in या अधिकृत वेबसाइटला विद्यार्थ्यांना भेट द्यावी लागेल. जिथे त्यांना नोंदणीकृत मोबाईल नंबर आणि पासवर्डने लॉगिन करावं लागेल किंवा नवीन नोंदणी करावं लागेल. लॉगिन झाल्यानंतर 'Download PR ID' पर्यायावर क्लिक करून किंवा डिजिलॉकर मध्ये जाऊन तुम्ही तुमचा आयडी मिळवू शकता, यासाठी UDISE युनिक स्टुडंट आयडेंटिफायर, नाव, जन्मतारीख, लिंग, मोबाइल नंबर, आई-वडिलांचे नाव आणि आधार क्रमांक यांसारखी माहिती आवश्यक आहे. आतापर्यंत १४ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी अपार आयडी बनवला आहे.

### अपार आयडी म्हणजे काय?

अपार आयडी म्हणजे 'ऑटोमेटेड परमनंट अकॅडमिक अकाउंट रजिस्ट्री' आहे. केंद्र सरकारच्या अखत्यारित हा उपक्रम येत असून प्रत्येक विद्यार्थ्याला १२ अंकी युनिक नंबर मिळतो. तो नंबर म्हणजेच, अपार आयडीची तुमची ओळख असते. अपार आयडीवर विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती, गुण आणि पुरस्कार एकाच ठिकाणी डिजिटल स्वरूपात साठवतो आणि 'एक राष्ट्र, एक विद्यार्थी आयडी' या संकल्पनेवर आधारित आहे, जसे आधारकार्ड असते.

# कोयत्याने खुनी हल्ला प्रकरणी दोघांना अटकपूर्व जामीन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ जानेवारी-**

चौघांनी मिळून कोयत्याने खुनी हल्ला करून डोक्यात कोयत्याने वार करून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी सुरेश कृष्णा श्रीराम व विशाल श्रीराम या दोघांना अटकपूर्व जामीनावर मुक्त करण्याचे आदेश सत्र न्यायालय सोलापूर यांनी दिले.

१५ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ०९:३० वा.च्या सुमारास फिर्यादीचा भाऊ नामे राहुल अण्णारेड्डी व भाचा रवि अर्जुन संगा लिमयेवाडी चौकातील काका महाराष्ट्र चिकन सेंटर येथे चिकन आणण्यासाठी गेले होते. त्यानंतर लागलीच भाचा रवि यांनी फोन करुन त्यांना कळविले कि मी व राहुल मामा महाराष्ट्र चिकन शॉप येथे चिकन घेत असताना ओळखीचे इसम नामे सुरेश कृष्णा श्रीराम, प्रदीप गायकवाड, विशाल श्रीराम, प्रज्वल गायकवाड हे सदर ठिकाणी येवुन तु मागच्या वेळी केलेली केस माघारी घेतो का नाही असे म्हणुन शिवीगाळी करू लागले.आम्ही त्यांना विरोध करत असताना प्रदीप गायकवाड यांनी त्याच्या जवळ लपवुन आणलेला कोयता काढून तु केस घेणार नाहीस तर तुला आता खल्लास करुन टाकतो असे म्हणुन राहुल मामाच्या डोक्यात मारले. तेव्हा त्यांच्या डोक्याला मार लागुन रक्त येत होते व इतर जण राहुल मामाला हाताने मारहाण करुन शिवीगाळी करत होते. तेव्हा सदर ठिकाणी असलेले महाराष्ट्र चिकन दुकानातील इसम नामे रमजान फारुख बेपारी व मी मिळुन राहुल यास दुकानात आतमध्ये ओढून घेवुन दुकानाचे शटर लावुन घेतले. त्यावेळी ते सर्वजण सार्वजनिक ठिकाणी हातात कोयते घेवुन कोणी मध्ये आले तर त्यालापण खल्लास करतो असे आरडाओरड करुन सार्वजनिक रोडवर दहशत निर्माण केली त्यावेळी आजुबाजुचे लोक त्यांना पाहुन पळुन गेले तसेच दुकान दाराने त्यांना घाबरुन त्याच्या दुकानाचे शटर लावुन घेतले त्यावर ते चौघेजण तेथे आरडा ओरड करुन निघुन गेले. फिर्यादी लागलीच सदर ठिकाणी जावुन त्यांच्या भावाला पाहिले असता त्यांच्या भावाच्या डोक्यात मार लागुन खुप रक्त येत होते. त्यानंतर फिर्यादीने त्यांच्या भाच्याच्या मदतीने भावाला उपचाराकरीता सिव्हील हॉस्पिटल, सोलापूर येथे ॲडमिट केले. अशा आशयाची फिर्याद रोहित आण्णारेड्डी याने सलगर वस्ती पोलीस स्टेशन येथे दाखल केली होती.

दोघा आरोपींनी ॲड. संतोष न्हावकर यांच्यामार्फत अटकपूर्व जामीन मंजूर होऊन मिळणेसाठी सत्र न्यायालयात धाव घेतली होती. आरोपीतर्फे युक्तिवाद करताना ॲड. संतोष न्हावकर यांनी घटनेवेळी आरोपी निलमनगर येथील मंदिरात पूजा करत होता हे दर्शवणारी चित्रफीत सादर करून आरोपी निष्पाप असल्याचे न्यायालयाचे निदर्शनास आणून दिले. तो युक्तिवाद ग्राह्य मानून न्यायमूर्तींनी आरोपींना प्रत्येकी ५० हजाराच्या जातमुचलका व जामिनावर मुक्त करणेचा आदेश दिला.

यात आरोपीतर्फे ॲड. संतोष न्हावकर, ॲड. धनंजय येमूल यांनी तर सरकारतर्फे ॲड. दत्तूसिंग पवार यांनी काम पाहिले.

# विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांबरोबर आत्मविश्वासही वाढवा

## प्रशासन अधिकारी मल्हारी माने यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर दि.२४ जानेवारी-**

विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना योग्य व्यासपीठ मिळाल्यास त्यांच्यातील आत्मविश्वास अधिक बळकट होतो. वार्षिक स्नेहसंमेलन हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाचे प्रभावी माध्यम आहे, असे प्रतिपादन प्रशासन अधिकारी मल्हारी माने यांनी केले.

नीलम नगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस प्रशालेच्या वार्षिक स्नेहसंमेलनाच्या उदघाटनप्रसंगी माने बोलत होते. हुतात्मा स्मृती मंदिर येथे पार पडलेल्या या सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विविध कलाविष्कार सादर करत उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांना आपली कला सादर करण्यासाठी मिळालेले हे व्यासपीठ म्हणजे त्यांच्यासाठी आनंदोत्सवच असून त्यांच्या कलागुणांना नवी दिशा मिळते, असेही माने यांनी नमूद केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका विजयालक्ष्मी कुंभार होत्या. प्रारंभी तपोरत्नं



योगिराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजी, वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य महास्वामीजी, नेताजी सुभाषचंद्र बोस तसेच स्व. बसवराज कुंभार यांच्या प्रतिमेचे पूजन प्रमुख अतिथींच्या हस्ते करण्यात आले.यावेळी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे प्रशासन अधिकारी मल्हारी माने, केंद्रप्रमुख स्वप्नील चाबुकस्वार, सेवानिवृत्त प्राचार्य सुभाष धुमशेट्टी, रेवणसिद्ध रोडगीकर, विजयकुमार हुल्ले, प्राचार्य रविशंकर कुंभार , मुख्याध्यापक शिवानंद मेणसंगी, मुख्याध्यापिका वैशाली कुंभार, पालक-शिक्षक संघाच्या उपाध्यक्ष राजशेखर घंटे, सहसचिवा वैशाली अभंगे, सेवानिवृत्त मुख्याध्यापक ज्ञानेश्वर म्हेत्रे, सेवानिवृत्त शिक्षक धर्मराज बळ्ळारी, लक्ष्मीकांत त्रिशुले, पर्यवेक्षक गौरीशंकर आळंगे आदी मान्यवर उपस्थित होते.

मुख्याध्यापक रविशंकर कुंभार यांनी अहवाल वाचन केले. विद्यार्थ्यांनी गणेश गीत, शिव तांडव नृत्य, तेलुगू गीत, देशभक्तीपर गीत, छावा, कृष्ण जन्माला, तमिळ नृत्य, गोंधळ गीत, वाघ्या-मुरळी खंडोबा गीत, महाकाली दर्शन - देवी महिमा अशा विविध गीतांवर सादर केलेल्या नृत्यप्रकारांनी प्रेक्षकांची दाद मिळवली व पालकांकडून भरभरून वाहवा मिळवली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विश्वराध्य मठपती यांनी केले तर सांस्कृतिक कार्यक्रमाचे निवेदन उमादेवी कुंभार यांनी केले.

# सांगोला विद्यामंदिरात बारावीच्या विद्यार्थ्यांना निरोप

## परिक्षेसाठी दिल्या शुभेच्छा; विद्यार्थ्यांनी शाळेविषयी व्यक्त केले ऋण




**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२५ जानेवारी -**

सांगोला विद्यामंदिर ज्यु.कॉलेज येथे शैक्षणिक वर्ष सन २०२५-२६ मधील इ.१२ वीच्या विद्यार्थ्यांचा परिक्षेसाठी शुभेच्छा व निरोप समारंभ उत्साहात झाला.

यावेळी संस्थाध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके, प्राचार्य अमोल गायकवाड, उपमुख्याध्यापक चिंतामणी देशपांडे, उपप्राचार्य प्रकाश म्हमाणे, प्रा.शिवशंकर तटाळे उपस्थित होते. प्रा.झपके यांनी बदलते तंत्रज्ञान लक्षात घेता उच्च शिक्षण घेऊन नोकरीच्या संधी मिळवणे गरजेचे आहे असे सांगत बारावीच्या विद्यार्थ्यांना बोर्ड परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. चिंतामणी देशपांडे यांनी प्रास्ताविक केले. अमोल गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना बोर्ड परीक्षेला सामोरे जात असताना प्रात्यक्षिक परीक्षेचे बदललेले स्वरूप सांगितले. यावेळी सांगोला महाविद्यालयाचे प्रा.एस.पी.पाटील यांनी संगणक शाखेतील बीसीए, बीसीएस अभ्यासक्रमाबद्दल माहिती देत प्रवेश प्रक्रिया सांगितली. प्रा.जालिंदर मिसाळ यांनी जेईई, एम एच टी सीईटी व नीट या स्पर्धा परीक्षा विषयी मार्गदर्शन केले. विद्यार्थी मनोगतातून स्नेहल बोधगिरे, साक्षी बंडगर यांनी शिक्षक व शाळेविषयी ऋण व्यक्त केले. प्रा.राजेंद्र कुंभार यांनी सूत्रसंचालन केले. प्रकाश म्हमाणे यांनी आभार प्रदर्शन मानले.



# मराठा समाज बहुउद्देशीय मंडळ शिवजन्मोत्सव उत्सव अध्यक्षपदी धीरज थोरात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ जानेवारी-**

श्री छत्रपती शिवाजी महाराज मराठा समाज बहुउद्देशीय मंडळ, बाळे येथील शिवजन्मोत्सव उत्सव अध्यक्ष धीरज थोरात यांची निवड करण्यात अली. श्री छत्रपती शिवाजी महाराज मराठा समाज बहुउद्देशीय मंडळ, बाळे यांच्या वतीने सालाबादप्रमाणे यावर्षीही शिवजन्मोत्सव उत्साहात साजरा करण्यासाठी समाजाची बैठक आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीच्या अध्यक्षपदी नवनाथ पवार यांची निवड करण्यात आली. श्री छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त बाळे गावात होणाऱ्या उत्सवासाठी उत्सव उपाध्यक्ष नागेश मोरे, स्वप्निल जाधव, उत्सव कार्याध्यक्ष किरण सरवळे, उत्सव खजिनदार दिगंबर पोळ, उत्सव सचिव विशाल करंडे, पालखी सोहळा मिरवणूक प्रमुख आकाश ढोकळे, रक्तदान शिबिर प्रमुख तुळशीदास शिंदे, उत्सव सल्लागार व मार्गदर्शक राजकुमार इंगळे, शरद मोटे, विशाल पाटील, मंगेश घुले, रोहिदास शिंदे यांची निवड करण्यात आली.

कार्यक्रमाचे आयोजन छत्रपती शिवाजी महाराज मराठा समाज बहुउद्देशीय मंडळ, बाळे अध्यक्ष प्रमोद दत्तात्रय सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

# 'सोशल'चे डॉ. वडवान यांच्या विरोधातील याचिका अर्ज फेटाळला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ जानेवारी-**

येथील सोलापूर सोशल असोसिएशन या संस्थेच्या वादात संस्थेचे चेअरमन डॉ. अखलाक अहमद वडवान यांच्या अध्यक्षपदाच्या मान्यतेस स्थगिती मिळावी, अशी मागणी करणारा अर्ज धर्मादाय सह आयुक्त, पुणे विभाग, पुणे राहुल मामू यांनी नुकताच फेटाळून लावला आहे.

याबाबतची माहिती अशी, अल्पसंख्याक मुस्लीम धर्मीयांची सर्वात मोठी शिक्षण संस्था असलेली सोलापूर सोशल असोसिएशन या संस्थेत मोठे वाद चालू होता. संस्थेमार्फत बालवाडीपासून महाविद्यालयापर्यंतचे अनेक शैक्षणिक प्रकल्प राबविले जातात. विद्यार्थी संख्या सुमारे १० हजारापपेक्षा जास्त आहे, तर कर्मचाऱ्यांची संख्या सुमारे २५० पेक्षा जास्त आहे. डॉ. वडवान यांच्या अध्यक्षीय नेतृत्वाखाली



निवडून आलेल्या कार्यकारी मंडळाचा बदल अहवाल क्‍. ६७०/२०१२ हा तत्कालीन धर्मादाय उपआयुक्त प्रविण कुंभोजकर दिवाणी न्यायाधीश यांनी मंजूर केला होता. या निर्णयास आव्हान देणारे अपिल क्‍. ५०/२०२५ आणि ५४/२०२५ हे अलताफ जमादार आणि फारुक कमिशनर यांनी दाखल केले होते. डॉ. वडवान हे संस्थेचे सभासद नाहीत, त्यांना निवडणूक घेण्याचा अधिकार नाही, त्यांची निवड बेकायदेशीर आहे, सभासद बोगस आहेत, निवडणूक झालीच नाही अशा स्वरुपाचे आक्षेप या दोघांनी पुणे येथील कोर्टात उपस्थित करुन हरकती नोंदविल्या होत्या.

तक्रारदारांपैकी रियाज खरादी हे कोणत्याही प्रकारचे सभासद नाहीत. तसेच कमिशनर आणि जमादार यांनी सतत बोगस तक्रारी करुन संस्थेस बदनाम करण्याचे व सुरळीत चाललेले काम थांबविण्याचे प्रयत्न केले. या बाबी धर्मादाय आयुक्त यांच्या निदर्शनास आणून दिले. तक्रारदारांचे सर्व आक्षेप हे केवळ विरोधासाठी विरोध आहेत. या आक्षेपांना कागदोपत्री कोणताही आधार नाही. त्याचप्रमाणे अत्यंत सुरळीत चाललेल्या व्यवस्थापनामध्ये केवळ व्यक्ती व्देषापोटी हरकती असल्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे. तसेच मुस्लीम विद्यार्थ्यांच्या हिताकरीता स्थापन केलेल्या या संस्थेतील हा वाद समाजाचे नुकसान करणारा आहे, ही बाब न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली. दोन्ही पक्षाचे म्हणणे ऐकून घेवून धर्मादाय सह आयुक्त यांनी डॉ. वडवान यांच्या कार्यकारणी विरुध्द मागितलेली स्थगिती फेटाळण्याचा आदेश पारीत केला. याकामी डॉ. वडवान यांच्याकडून ॲड. नितीन हबीब, ॲड. रमेश रोडगी, ॲड. रोहित हबीब आणि ॲड. अब्दुल जब्बार शेख (माजी मुख्याध्यापक) यांनी काम पाहिले. तर जमादार आणि कमिशनर यांच्यावतीने ॲड. एस.आर. मुंढे आणि ॲड. ए. आर. रायनी यांनी काम पाहिले.

दिनांक: १७/०१/२०२६

**ॲड. सुरजसिंग हरिसिंग लोधा**
**यांनी दि. ०३/०१/२०२६ रोजी दिलेल्या**

**सावधानतेची नोटीसीला प्रतिउत्तर**

दि.०३/०१/२०२६ रोजी दिलेल्या सावधानतेची नोटीसीस जाहीर प्रतिउत्तर पुढीलप्रमाणे असे की, **रमेश फुलसिंग जाधव** यांनी आमचे अशील **अनुप कन्हेय्या मस्के** यांच्या कडून डी सोलापूर येथील व सब डी सोलापूर पैकी तालुका उत्तर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिका हद्दवाढ भागातील मौजे प्रताप नगर येथील आरतीविहार या नावाने ओळखल्या जाणाऱ्या वसाहती मधील **प्लॉट्स गट नंबर ३३/१ प्लस ३३/२ पैकी प्लॉट नंबर ७० एकूण क्षेत्र ११५.६० चौरस मीटर प्लॉट नंबर ७१ एकूण क्षेत्र ९२ प्लॉट नंबर ७० एकूण क्षेत्र ११५.६० चौरस मीटर प्लॉट नंबर ७१ एकूण क्षेत्र ९२.६० चौरस मीटर प्लॉट नंबर ७२ ९२ पॉईंट ७२ चौरस मीटर असे एकूण सात ओपन प्लॉट असलेली** जागा त्यास एकूण क्षेत्रफळ **६७६.८० चौरस मीटर** म्हणजेच ७२८२. ३३८ चौरस फूट इतके आहे. येणेप्रमाणे सर्व प्लॉट जागा व त्यातील दगड माती वगैरे तगभूत वस्तू वस्तुसह व येणे जाणे चे वापराचे हक्कासह असलेली प्लॉट जागा मिळकत ही मूळता **श्री. अनुप कन्हैया मस्के** यांच्या मालकी हक्काची व कब्जावहीवाटीची होती व आहे.

वर नमूद वर्णनातील इसम रमेश फुलसिंग जाधव याने सदर मिळकत खरेदी करण्याबद्दल इच्छा दर्शवली. सदर इसम रमेश जाधव यांनी नोटीस मध्ये नमूद केल्याप्रमाणे **ॲड. सुरते मॅडम** यांच्यासमोर नोटरी ईसार पावती करून घेतली. परंतु सदर नोटरी ईसार पावतीचा कालावधी फक्त तीन महिने होता. म्हणजे म्हणजे **दिनांक: ०५/०८/२०२४ पासून दिनांक: ०४/११/२०२४** पर्यंत सदर व्यवहार पूर्ण करण्याचा कालावधी ईसार पावतीमध्ये स्पष्ट नमूद केला होता असे असताना देखील सदर इसमाने जाणीवपूर्वक वेळेत व्यवहार पूर्ण केला नाही. त्यामुळे वर नमूद मिळकती संबंधी हक्क सांगण्याचा सदर इसमास कोणताही अधिकार नाही. तसेच सदर मिळकतीवर बेकायदेशीर रित्या आपला हक्क सांगतो आहे. त्यामुळे आमच्या अशिलाची तमाम जनतेस अशी विनंती आहे की, सदर इसमाच्या दिशाभूल करणाऱ्या वक्तव्यावर कोणीही विश्वास ठेवू नये. कारण सदर नोटरी ईसार पावती चा व्यवहार फक्त तीन महिन्यांमध्ये पूर्ण करणे बंधनकारक होते. तशा आशयाचा मजकूर नोटरी ईसार पावती मध्ये स्पष्ट नमूद केला आहे. असे असताना देखील सदर इसमाने वकीलामार्फत सावधानतेची नोटीस देऊन आमच्या अशिलाची बदनामी करण्याचा प्रयत्न केला आहे आणि सदर मिळकतीस विनाकारण, खोडसाळपणे हरकत व अडथळा करू पाहत आहेत. त्यामुळे सदर इसम व्यवहार करण्यास योग्य नाही तरी कोणीही अशा प्रकारच्या भूलथापांना बळी पडू नये. सदर मिळकत निर्विवाद निर्जोखीम होती व अजूनही आहे तसेच सदर मिळकत आमची अशी अनुप मस्के यांच्या ताब्यात होती व आहे.

वास्तविकता वर नमूद मिळकत खरेदी करण्याची सदर इसमाची क्षमता कधीही नव्हती आणि नाही हे या नोटीस द्वारे त्यांनी सिद्ध केले आहे. त्यामुळे वर नमूद मिळकतीवर सदर इसमाला हक्क सांगण्याचा कोणताही अधिकार नव्हता व नाही. सदर मिळकती बद्दल दावा सांगणारा मजकूर चुकीचा बेकायदेशीर आहे. तसेच आमच्या अशीलासोबत सदर मिळकतीबद्दल व्यवहार करण्याचा कोणताही हक्क संबंध राहिला नाही तसेच तो व्यवहार आमच्यावर बंधनकारक नाही. इथून पुढे रमेश फुलसिंग जाधव याने सदर मिळकतीवर हक्क सांगणारा मजकूर स्वतः अथवा वकिलामार्फत सदर इसमाने प्रकाशित केल्यास अथवा सदर मिळकतीवर आपला हक्क सांगितल्यास सदर इसम आणि संबंधीत व्यक्तीवर आमचे अशील संबधित व्यक्तीवर योग्य त्या सक्षम न्यायालयात फौजदारी अथवा दिवाणी स्वरूपाची कायदेशीर कारवाई करतील याची नोंद घ्यावी.

सदर जमिनी बद्दल इतर कोणाला व्यवहार करण्याकरिता खालील नंबर वर संपर्क साधावा.

**अनुप मस्के मो.९९६०८११२२२**
**तारीख:**

**मार्फत**
**ॲड. स्वाती एस. वाघमारे**
B.com,L.L.B,MSW
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, तुळजापूर, जि. धाराशिव**
MAH/1503/2012

**नोटीस देणार**
**अनुप कन्हेय्या मस्के**

## महत्त्वाचे

### कडव्या झुंजीनंतरही अनाहतचा पराभव



**न्यू यॉर्क :** भारताची उदयोन्मुख स्क्वॅश खेळाडू अनाहत सिंगने न्यूयॉर्कमधील स्प्रॉट टूर्नामेंट ऑफ चॅम्पियन्स स्क्वॅश स्पर्धेच्या दुसऱ्या फेरीत जपानच्या जागतिक क्रमवारीत सातव्या क्रमांकावर असलेल्या सातोमी वातानाबेला जवळपास धक्का दिला होता, पण अखेरीस तिला पराभव पत्करावा लागला. आपल्या पहिल्याच पीएसए प्लॅटिनम-स्तरीय स्पर्धेत खेळताना, जागतिक क्रमवारीत ३१व्या क्रमांकावर असलेल्या अनाहतने सुरुवातीचे दोन गेम जिंकले, परंतु अनुभवी जपानी सहाव्या मानांकित खेळाडूने जोरदार पुनरागमन करत ६-११, ६-११, ११-२, ११-८, ११-६ असा विजय मिळवला. तो माझ्यासाठी खूप कठीण सामना होता अनाहतने खूप अप्रतिम स्क्वॅश खेळला व तिचे विनर्स अविश्वसनीय होते,'असे असे विजयी सातोमी म्हणाली. भारताची अव्वल महिला खेळाडू अनाहतने यापूर्वी लुसी टरमेलला हरवून स्पर्धेच्या दुसऱ्या फेरीत प्रवेश केला होता.

# क्रीडा क्षेत्रातील दिग्गजांना पद्मश्री जाहीर



बलदेव सिंग | हरमनप्रीत कौर | प्रवीण कुमार | रोहित शर्मा | सविता पुनिया | व्लादिमीर मेस्तीवीरीश्विली | विजयराज अमृतराज | भगवानदास रायकर | के. पजनीवेल

**◆ नवी दिल्ली, २५ जानेवारी**

**क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या दिग्गजांना रविवारी पद्मश्री पुरस्कार जाहीर केला आहे. यामध्ये अनुभवी हॉकी प्रशिक्षक बलदेव सिंग (पंजाब), महिला क्रिकेटपटू हरमनप्रीत कौर भुल्लर (पंजाब), दिव्यांग ॲथ्लिट प्रवीण कुमार (उत्तर प्रदेश), भारतीय क्रिकेट संघाचा माजी कर्णधार रोहित शर्मा (महाराष्ट्र), भारतीय हॉकीपटू-गोलरक्षक सविता पुनिया (हरयाणा), कुस्ती प्रशिक्षक व्लादिमीर मेस्तीवीरीश्विली (जॉर्जिया), टेनिसपटू विजयराज अमृतराज (अमेरिका), भगवानदास रायकर (मध्य प्रदेश) आणि के. पजनीवेल (पुडुचेरी) यांचा समावेश आहे.**



Padma Shri

बलदेव सिंग यांनी भारतीय महिला हॉकीमध्ये क्रांती आणली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आतापर्यंत ५० आंतरराष्ट्रीय खेळाडू घडले. त्यांनी एक प्रमुख हॉकी नर्सरीची स्थापना केली.

भारतीय महिला क्रिकेट संघाची कर्णधार हरमनप्रीत कौर हिच्या नेतृत्वाखाली भारताने ऐतिहासिक पहिले महिला विश्वचषक जिंकले. ती टी-२० क्रिकेटमध्ये आंतरराष्ट्रीय शतक झळकावणारी पहिली भारतीय महिला क्रिकेटपटू आहे.

दिव्यांग उंच उडीपटू प्रवीण कुमारने पॅरालिम्पिकमध्ये सुवर्णपदक जिंकले. तो सलग पॅरालिम्पिक पदक जिंकणारा सर्वात युवा दिव्यांग खेळाडू ठरला.

भारतीय क्रिकेट संघाचा माजी कर्णधार रोहित शर्माला पद्मश्री पुरस्कार जाहीर झाला आहे. रोहितच्या नेतृत्वाखाली भारताने टी-२० विश्वचषक व चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकली. त्याने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये २० हजारपेक्षा अधिक धावांची नोंद केली. त्याने एकदिवसीय क्रिकेटमध्ये तीन द्विशतक झळकावले. क्रिकेटपटूंचा तो प्रेरणास्थान आहे.

भारतीय हॉकीपटू-गोलरक्षक सविताला भारतीय महिला हॉकीची महान भिंत म्हणून ओळखतात. सविताने लागोपाठ तीन वेळा वर्षातील सर्वोत्तम एफआयएच गोलरक्षकाचा पुरस्कार पटकावण्याचा पराक्रम केला असून अशी कामगिरी करणारी ती पहिली भारतीय महिला खेळाडू ठरली.

जॉर्जियाचे कुस्ती प्रशिक्षक व्लादिमीर मेस्तीवीरीश्विली यांना मरणोत्तर पद्मश्री जाहीर झाला आहे. व्लादिमीर हे महान फ्रिस्टाईल कुस्ती प्रशिक्षक होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक ऑलिम्पिकपदक विजेते कुस्तीगीर घडले व त्यांनी भारताला जागतिक कुस्ती क्षेत्रात अढळ स्थान निर्माण करण्यात मदत केली.

अनुभवी टेनिसपटू विजयराज अमृतराज (अमेरिका) यांना पद्मश्री जाहीर झाला असून विजय अमृतराज हे देशाचे सर्वात यशस्वी टेनिसपटू आहे. त्यांनी जागतिक टेनिस क्षेत्रात भारताचे नाव उंचावले. त्यांनी आतापर्यंत १६ एकेरी पुरुष गटाचे विजेतेपद पटकावले असून त्यांनी डेव्हिस चषक संघाचे कर्णधारपदही भूषविले आहे.

भगवान दास रायकर (मध्य प्रदेश) यांची बुंदेली वार आर्ट प्रशिक्षक म्हणून सहा दशकांची कारकीर्द आहे. पारंपरिक बुंदेलखंड मार्शल आर्टचे संवर्धन करण्यात त्यांनी मोलाचा वाटा उचलला आहे. ते चार बुंदेली शस्त्र संचालनात पारंगत असून त्यांनी आतापर्यंत हजारे प्रशिक्षणार्थ्यांना मार्गदर्शन केले.

के. पजनीवेल (पुडुचेरी) हे प्रसिद्ध सिलाम्बम प्रशिक्षक आहे. त्यांना प्राचन मार्शल आर्ट प्रकाराला पुनरुज्जवीत केले. त्यांनी मामल्लन मार्शल आर्ट व लोककला विकास मंडळाचे स्थापना केली. या मंडळातून सुमारे ५ हजारपेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी या क्रीडा प्रकाराचे प्रशिक्षण घेतले.

◀(वृत्तसंस्था)

# विदर्भाचा आंध्र प्रदेशकडून पराभव

### रणजी करंडक क्रिकेट

**◆ अनंतपूर, २५ जानेवारी**

प्रतिष्ठेच्या रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत रविवारी येथे एलिट अ गटाच्या साखळी सामन्यात आंध्र प्रदेशने विदर्भावर ८ गडी राखून विजय मिळविला. विदर्भाने आंध्र प्रदेश संघासमोर विजयासाठी २५९ धावंचे लक्ष्य ठेवले होते, ते त्यांनी ५६.१ षटकांत २ गडी गमावित गाठले.

या विजयाबरोबरच आंध्र प्रदेशने २८ गुणांसह अ गटात अव्वल स्थान मिळविले. विदर्भाचा हा सहा सामन्यातील दुसरा पराभव ठरला असून विदर्भाची २५ गुणांसह तिसऱ्या क्रमांकावर घसरण झाली आहे. जम्मू-काश्मीर २५ गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहे.

आंध्र प्रदेशने १ बाद ९३ धावांवरून पुढे चौथ्या आणि अंतिम दिवशी लक्ष्याचा पाठलाग सुरु केला. विदर्भाच्या गोलंदाजांनी आंध्र प्रदेशच्या फलंदाजांना झटपट तंबूत परत पाठविण्याचा आटोकाट प्रयत्न केला, मात्र दिवसभराच्या खेळात त्यांना केवळ कालचा नाबादवीर श्रीकर भारतला बाद करण्यात यश आले. श्रीकरने ८९ चेंडूंचा सामना करत ५ चौकारांसह ४३ धावांची भर घातली. त्याने कालचा नाबाद अर्धशतकवीर शेख रशीदसोबत तिसऱ्या गड्यासाठी ९९ धावांची भागीदारी केली आणि संघाला ११४ धावांचा टप्पा गाठून दिला.

पुढे शेख रशीदने कर्णधार रिकी भुईच्या साथीने आपल्या अर्धशतकी खेळीचे शतकी खेळीत रूपांतर केले आणि संघाच्या विजयात सिंहाचा वाटा उचलला. शेख रशीद व रिकीने नाबाद खेळी करत ५६.१ षटकांत आंध्र प्रदेशला २५९ धावांचे लक्ष्य गाठून दिले. रशीद व रिकीने तिसऱ्या गड्यासाठी नाबाद १४५ धावांची भागीदारी करून आंध्र प्रदेशला विजय मिळवून दिला. शेख रशीदने १४४ चेंडूंत २१ चौकारांसह नाबाद १३२ धावांची, तर कर्णधार रिकी भुईने ९२ चेंडूंत ७ चौकार व २ षट्कारांसह नाबाद ६४ धावांची विजयी खेळी केली. विदर्भाकडून नचिकेत भुतेलाच दोन बळी टिपण्यात यश आले, उर्वरित गोलंदाजांनी केवळ धावा वाटण्यास व आंध्र प्रदेशला विजय मिळवून देण्यात मदत करण्याचे कार्य केले.

◀(वृत्तसंस्था)

### शिवाजी महाविद्यालयाचे दोघे विद्यापीठ संघात

**बार्शी, दि. २५ जानेवारी-**

सौराष्ट्र विद्यापीठ, राजकोट (गुजरात) येथे २७ जानेवारी ते २ फेब्रुवारी या कालावधीत होणाऱ्या पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ क्रिकेट स्पर्धे साठी येथील शिवाजी महाविद्यालयाच्या समर्थ देशमुख व पृथ्वीराज मिसाळ यांची पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या संघात निवड झाली आहे. या संघाचे सराव शिबीर येथील शिवाजी महाविद्यालयात डॉ. रामहरी नागटिळक यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे. या निवडीबद्दल संस्था अध्यक्ष डॉ.बी.वाय यादव व पदाधिकारी यांच्यासह प्राचार्य डॉ.ए.बी.शेख आदींनी अभिनंदन केले. या खेळाडूंना शारीरिक शिक्षण संचालक डॉ.हरिदास बारसकर, डॉ.विजयानंद निंबाळकर, डॉ.रामहरी नागटिळक, प्रा.संजय पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.



# आरसीबी मुसंडी मारण्याच्या तयारीत

**बडोदा, २५ जानेवारी**

गुणतालिकेत अव्वल स्थानी असलेला रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघ सोवारी येथे संघर्ष करणाऱ्या मुंबई इंडियन्स संघाविरुद्धच्या महिला प्रीमियर लीग सामन्यात या हंगामातील पहिल्या पराभवातून सावरण्याचा प्रयत्न करेल. आरसीबीची विजयी मालिका शनिवारी संपुष्टात आली. तेव्हा त्यांना दिल्ली कॅपिटल्सविरुद्धच्या सामन्यात या हंगामातील पहिल्या पराभवाला सामोरे जावे लागले.

लीगच्या निर्णायक टप्प्यात परिस्थिती किती लवकर बदलू शकते याची ही एक वेळेवर आठवण होती. पराभवानंतरही, बंगळुरू संघ गुणतालिकेत अव्वल स्थानी चांगल्या स्थितीत आहे. त्यांनी संपूर्ण स्पर्धेत सर्वच विभागांध्ये सातत्य दाखवले आहे. प्लेऑफ जवळ येत असताना हा पराभव लवकर विसरून पुढे जाण्यास ते उत्सुक असतील. दुसरीकडे, मुंबई इंडियन्स संघाला पुनरुज्जीवनाची तातडीने गरज आहे. गतविजेत्या संघाने सलग तीन सामने गमावले आहेत, त्यामुळे त्यांची मोहीम थांबली आहे आणि त्यांच्या प्लेऑफच्या आशांवर दबाव आला आहे. साखळी फ ेरीत अव्वल संघाविरुद्धचा विजय केवळ पराभवाची मालिका थांबवू शकत नाही, तर लय शोधणाऱ्या संघाला अत्यंत आवश्यक आत्मविश्वासही देऊ शकतो. मुंबई इंडियन्सची मुख्य चिंता सातत्याचा अभाव ही आहे.



स्मृती मंधाना | हरमनप्रीत कौर

# भारताकडून न्यूझीलंडचा धुव्वा; मालिका जिंकली

**गुवाहाटी, दि. २५ जानेवारी-**

गोलंदाजांच्या प्रभावी कामगिरीनंतर अभिषेक शर्मा आणि कर्णधार सूर्यकुमार यादवच्या दमदार फलंदाजीच्या बळावर भारताने येथे तिसऱ्या टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यात पाहुण्या न्यूझीलंडवर ६० चेंडू शिल्लक ठेवित ८ गड्यांनी दणदणीत विजय नोंदविला. या विजयाबरोबरच भारताने पाच सामन्यांची टी-२० मालिका ३-० ने खिशात घातली आणि आगामी टी-२० विश्वचषकासाठी सज्ज असल्याचे दाखवून दिले.

भारताने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला आणि न्यूझीलंडला २० षटकांत ९ बाद १५३ धावांवर रोखले. नंतर भारताने १० षटकांत २ बाद १५५ धावा काढून आपला विजय साकार केला. अभिषेक शर्मा व सूर्यकुमार यादवने नाबाद खेळी करत भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केला. भारताने १० षटकांत २ बाद १५५ धावा केल्या. अभिषेकने अवघ्या २० चेंडूंत नाबाद ६८ धावांची, तर सूर्यकुमारने २६ चेंडूंत नाबाद ५७ धावांची विजयी खेळी केली.

टीम इंडियाने पहिला सामना ४८ धावांनी आणि दुसरा ७ गडी राखून जिंकला. चौथा सामना २८ जानेवारी रोजी विशाखापट्टणम येथे खेळला जाईल.

# तिसऱ्याच दिवशी महाराष्ट्राचा त्रिपुरावर डावाने विजय

## किरण चोरमलेचे अर्धशतक, वैभव दारकुंडेचे ४ बळी, तन्मोय दासच्या ८४ धावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ जानेवारी-**

येथील इंदिरा गांधी पार्क स्टेडियमवर गेल्या २ दिवसापासून चालू असलेला महाराष्ट्र विरुद्ध त्रिपुरा सामना महाराष्ट्राने तिसऱ्याच दिवशी एक डाव व १२२ धावांनी जिंकला.

तिसऱ्या दिवशी सकाळी कालची नाबाद जोडी दिग्विजय आणि किरण चोरमले यांनी डाव पुढे सुरू केला, दोघांनी ५ व्या विकेट साठी ९० धावांची भागीदारी रचली आणि दिग्विजय पाटील वैयक्तिक १३५ धावांवर (१८५ चेंडू, १० चौकार, ३ षटकार) अर्काजीत रॉय चे चेंडूवर यष्टीचीत झाला. त्यानंतर लगेचच किरण ने आपले अर्धशतक पूर्ण केले आणि ३ धावांच्या अंतराने तो पण ५० धावांवर (९१ चेंडू २-२ चौकार षटकार) अर्काजीत कडूनच त्रिफळा बाद झाला. नंतर आलेल्या यष्टिरक्षक अभि पवार आणि अजय बोरुडे यांनी संघाची धावसंख्या ५०० पार नेली. १३४ व्या षटकात ५१३ धावा वर घोषित केला. त्रिपुरा संघाकडून अमित अली १२६/३ बळी व अर्काजीत रॉय याने १०२/३ बळी घेतले.

महाराष्ट्राने डाव घोषित केल्यावर त्रिपुरा संघाचा दुसरा डाव सुरू झाला आणि १ निर्धाव षटक झाल्यावर लंच साठी खेळ थांबला. त्यानंतर दुसऱ्या सत्रात मात्र महाराष्ट्राचा सलामीचा तेज गोलंदाज वैभव दारकुंडे यांनी जादुई स्पेल टाकत एका पाठोपाठ एक असे दीपजोय देब (४), सप्तजीत दास (०), दुर्लभ रॉय (१७), आनंध भौमिक (०) यांना बाद केले, तर त्याचे सोबतीला शुभम मेड ने अरिंदम बर्मन याला देखील शून्यावर बाद करत निम्मा संघ ५२ धावत माघारी धाडला. त्या नंतर मात्र सलामीचा फलंदाज तन्मोय दास याने वैयक्तिक अर्धशतक पूर्ण केले आणि अमित अली सोबत ५३ धावांची भागीदारी केली पण स्वराज चव्हाण ने अमित अली याला २२ धावा केल्या असताना पायचीत केले. चहापानाला खेळ थांबला तेव्हा त्रिपुरा संघाने ६ बाद १०५ धावा केल्या होत्या.

शेवटच्या सत्रात उर्वरित ४ खेळाडू लवकरात लवकर बाद करून सामना जिंकायचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेऊन कर्णधाराने किरण चोरमले आणि दिग्विजय पाटील यांना देखील गोलंदाजी साठी पाचारण केले आणि दोघांनी तो विश्वास सार्थ ठरवत एकेक बळी मिळवला. दिग्विजय ने कप्तान संदिप सरकार याला ५ धावांवर पायचीत केले. अमित अली बाद झाल्यावर तन्मोय ८४ धावावर (१२२ चेंडू, ८ चौकार ३ षटकार) किरण चे गोलंदाजी वर स्वयंचित झाला. त्यानंतर आलेल्या अर्काजीत रॉय याने तळातील फलंदाजासोबत थोडाफार प्रतिकार करत चौकार लगावले पण पहिल्या डावात ४ बळी घेणारा शुभम मेड याने राजदीप दत्ता (०), दीपेन बिस्वास (८) यांना अनुक्रमे अनिरुद्ध साबळे आणि सचिन धस करवी झेल बाद करत शेवटचे २ बळी मिळवले आणि विजयावर शिक्कामोर्तब केला. वैभव दारकुंडे ५४/४, शुभम मेड ५३/३ तर स्वराज चव्हाण, दिग्विजय पाटील, किरण चोरमले यांनी प्रत्येकी १ बळी मिळवत महाराष्ट्राच्या विजयात मोलाची भूमिका बजावली.



किरण चोरमले | वैभव दारकुंडे | तन्मोय दास

### शुक्रवारी पाँडेचरीविरुद्ध लढत

या विजयासह महाराष्ट्राने सामन्यात १६ गुणांची कमाई केली असून गटात पहिल्या २ स्थानात जागा मिळवली आहे. तिसऱ्याच दिवशी सामना संपल्याने चौथ्या दिवशी महाराष्ट्राचे खेळाडूंना विश्रांती मिळणार असून ३० जानेवारी पासून सोलापुरात पाँडिचेरी संघासोबत पुढचा सामना होणार असल्याचे जिल्हा क्रिकेट संघटनेच्या वतीने कळविण्यात आले.



### सोलापूर जिल्हा सब ज्युनिअर ॲथलेटिक्स स्पर्धा उद्या

**सोलापूर, दि.२५ जानेवारी-**

सोलापूर जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशनच्या वतीने जिल्हा सब ज्युनिअर मुले व मुलींची निवड चाचणी स्पर्धा मंगळवार २७ जानेवारी रोजी सकाळी ९ वाजता नेहरुनगर शासकीय मैदान येथे होणार आहे. स्पर्धा प्रवेशिका सर्धेअगोदर त्याच ठिकाणी स्विकारले जातील. या स्पर्धेसाठी जन्म दाखला ग्राम पंचायत, नगरपालिका व महानगरपालिका यांनी दिलेला असावा. यातून एम जी एम कॉलेज मैदान कोरेगाव (जिल्हा अहिल्यानगर) येथे ७ व ८ फेब्रुवारी रोजी महाराष्ट्र सब ज्युनिअर मैदानी स्पर्धे साठी जिल्हा संघ निवडण्यात येणार आहे. ८ वर्षे वयोगटासाठी (९-२-२०१८ ते ०८-२-२०२०), १० वर्षे (९-२-२०१६ ते ८-२-२०१८), १२ वर्षे (९-२-२०१४ ते ८-२-२०१६), १४ वर्षे (९-२-२०१२ ते ८-२-२०१४या दरम्यान जन्मलेले खेळाडू पात्र आहेत. अधिक माहितीसाठी ॲथलेटिक्स संघटनेचे सचिव राजू प्याटी (मो.९३२६०५५९४०) यांच्याशी संपर्क साधावा.

### आरएसएस तिरंगा मॅरेथॉनमध्ये श्रद्धा गुंटुक प्रथम

**सोलापूर, दि. २५ जानेवारी-**



राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व क्रीडा भारती यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीयस्वयंसेवकसंघाचे शताब्दी निमित्त आयोजित करण्यात आलेल्या तिरंगा मॅरेथॉनमध्ये राष्ट्रीय धावपटू श्रद्धा केशव गुंटुक हिने ३.५ किमी स्पर्धेत महिला गटात प्रथम क्रमांक पटकाविला आहे श्रद्धा गेले ५ ते ६ वर्षापासून रनिंगमध्ये सराव करत आहे. श्रद्धाला सिनियर ऑलिम्पियन केशवराज सिंह तसेच स्वामी विवेकानंद प्रशालेचे प्राचार्य अंबादास पांढरे, प्रा. चिदानंद माळी व क्रीडा प्रशिक्षक कृष्णा कोळी यांचे मार्गदर्शन लाभत आहे.

# पोलिस, पोस्ट, महावितरण व रेल्वेचे संघ उपांत्य फेरीत

## विद्यार्थी क्रीडा केंद्राची ६२ वी खो-खो स्पर्धा

**मुंबई, दि. २५ जानेवारी-**

मुंबईच्या लाल मातीत खेळाडूंच्या वेगवान हालचालींनी, अचूक चढायांनी आणि शेवटच्या सेकंदापर्यंत चाललेल्या अटीतटीच्या लढतींनी अक्षरशः मैदान पेटवून दिले. मुंबई खो-खो संघटनेच्या मान्यतेने आणि विद्यार्थी क्रीडा केंद्र यांच्या आयोजनाखाली सुरु झालेल्या ६२ व्या जिल्हा अजिंक्यपद खो-खो स्पर्धेत आज जिद्द, चपळता आणि विजयाची भूक यांचा अनोखा संगम पाहायला मिळाला. महाराष्ट्र पोस्ट, पश्चिम रेल्वे आणि ओम साईश्वर सेवा मंडळ या संघांनी प्रतिस्पर्ध्यांना धूळ चारत दिमाखात विजय मिळवला आणि उपांत्य फेरीत आपली जागा पक्की केली.

या निकालांनंतर पुरुष व्यावसायिक विभागात मध्य रेल्वे वि. रचना नोटरी आणि पश्चिम रेल्वे वि. महाराष्ट्र पोस्ट, तर महिला व्यावसायिक विभागात पश्चिम रेल्वे वि. महावितरण आणि रचना नोटरी वि. मुंबई पोलीस या उपांत्य फेरीतील लढती निश्चित झाल्या आहेत.

**पोस्टाचा थरारक विजय, बँक ऑफ इंडियाची कडवी झुंज**

व्यावसायिक गटाच्या उपांत्यपूर्व फेरीत महाराष्ट्र पोस्टने बँक ऑफ इंडिया संघावर १७-१५ असा अवघ्या २ गुणांनी आणि केवळ १० सेकंद शिल्लक असताना अत्यंत रोमांचक विजय मिळवला.

महाराष्ट्र पोस्टकडून अक्षय मासाळ (२, १:१० मि. संरक्षण), लक्ष्मण गवस (१:१० व १:४० मि. संरक्षण), आकाश साळवे (१:३० मि. संरक्षण व १ गुण), प्रतीक देवरे (१:३० मि. संरक्षण व १ गुण), शुभम शिंदे (५ गुण), आशितोष पवार (४ गुण), शुभम उत्तेकर (१:२०, १:२० मि. संरक्षण व १ गुण) यांनी विजयात निर्णायक योगदान दिले. पराभूत बँक ऑफ इंडियाकडून सुजल जायगडे (२:२० मि. संरक्षण व १ गुण), हर्ष कामतेकर (१ मि. संरक्षण व ४ गुण), रामचंद्र झोरे (१:३०, १:५० मि. संरक्षण व ३ गुण), जनार्दन सावंत (१:१० व १:४० मि. संरक्षण) यांनी शेवटपर्यंत झुंज दिली.

**पश्चिम रेल्वेचा डावाने विजय, मुंबई पोलीस नामोहरम**

दुसऱ्या सामन्यात पश्चिम रेल्वेने आक्रमक खेळ करत मुंबई पोलीस संघावर १०-८ असा एक डाव व २ गुणांनी दणदणीत विजय मिळवला. पश्चिम रेल्वेकडून राहुल मंडल (१:५० मि. संरक्षण व २ गुण), महेश शिंदे (१:३० मि. संरक्षण व २ गुण), प्रसाद राड्ये (२:३० मि. संरक्षण), विजय शिंदे (१:३० मि. संरक्षण व २ गुण), अमित पाटील (३:२० मि. संरक्षण व १ गुण) यांनी अष्टपैलू कामगिरी करत संघाचा दबदबा निर्माण केला. पराभूत मुंबई पोलीसकडून आकाश खापरे (१:२० मि. संरक्षण), प्रदीप जाधव (१:२० मि. संरक्षण), हर्ष मोरे (१ मि. संरक्षण), सोहेल शेख (४ गुण) यांनी लढत दिली.



### ४ फूट ११ इंच गट ओम साईश्वरचा एकतर्फी विजय

४ फूट ११ इंच गटातील सामन्यात ओम साईश्वर सेवा मंडळाने श्री समर्थ व्यायाम मंदिर संघावर १०-४ असा एक डाव व ६ गुणांनी दणदणीत विजय मिळवत आपली ताकद सिद्ध केली. ओम साईश्वरकडून श्लोक जाधव (४ मि. संरक्षण), कार्तिक गामी (नाबाद ४ मि. संरक्षण व २ गुण), आरव साटम (२:२० मि. संरक्षण व १ गुण), अधिराज गुरव (१:३० मि. संरक्षण व ५ गुण), शंतनू रावराणे (१:१० मि. संरक्षण व १ गुण) यांनी मैदानावर वर्चस्व गाजवले. पराभूत श्री समर्थ संघाकडून कृशाल वाघधरे (२ मि. संरक्षण), अद्वैत हडकर (१:५० मि. संरक्षण), सार्थ वायंगणकर (१ मि. संरक्षण व १ गुण) यांनी प्रतिकार केला.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



**सोलापूर :** आत्मनिर्भरत वस्ती स्तर संस्थाचे अध्यक्ष सुनीता दळवी यांनी मकर संक्रांती निमित्ताने हळदी कुंकूचा कार्यक्रम आयोजित केला. यात महिलांनी मकर संक्रांती निमित्त वाण वाटप केले व तीळगुळाचे वाटप करण्यात आले. यावेळी भगवंत महिला बचत गटाच्या अध्यक्षा अनिता मेलशेट्टी व स्वावलंबी महिला गटाच्या अध्यक्षा अनुराधा करपे , इंदुमती भोसले प्रज्ञा कुलकर्णी, रेखा ढवळे, उज्वला खंडागळे, चित्रा देवकर, वैशाली सुरवसे उपस्थित होते.



### राष्ट्रगीत लाऊडस्पीकरवर लावणे बंद करण्याची मागणी

**सोलापूर, दि. २५ जानेवारी-**

मराठा सेवा संघ प्रणित छत्रपती शिवाजी मुस्लीम ब्रिगेड, सोलापूर यांच्यावतीने निवासी जिल्हाधिकारी दिनेश बार्गे यांना शहर अध्यक्ष हाजी मतीन बागवान व जिल्हा अध्यक्ष शफी रचभरे यांनी निवेदन दिले. सध्या सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये लाऊडस्पीकरद्वारे विद्यार्थ्यांना राष्ट्रगीत ऐकवले जात आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये स्वतः राष्ट्रगीत म्हणण्याचे प्रमाण फारच कमी झाले आहे. अनेक विद्यार्थ्यांना तर पूर्ण राष्ट्रगीत पण म्हणता येत नाही. याचा त्यांच्या बुद्धीवर परिणाम होत असून त्यांची स्मरणशक्ती कमी होत चालल्याचे निदर्शनास येत आहे म्हणून राष्ट्रगीत पूर्वीसारखे तोंडी म्हणण्याचे चालू करावे जेणेकरून विद्यार्थ्यांना हे पाठ होऊन भविष्यात त्यांना ते आठवणीत राहू शकते. तसेच अशा प्रकारचे निवेदन छत्रपती शिवाजी मुस्लीम ब्रिगेड, सोलापूर यांच्यावतीने सोलापूर महानगरपालिका आयुक्त आणि प्रशासन अधिकारी, सोलापूर महानगरपालिका शिक्षण मंडळ यांना सर्व महानगरपालिका शाळांसाठी देण्यात आले. जिल्हा परिषद शाळांसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, सोलापूर जिल्हा परिषद यांनाही हे निवेदन सादर करण्यात आले. यावेळी जावेद बद्दी उपस्थित होते.

### शास्त्रीय गायक विलास कुलकर्णी यांना 'विद्या वाचस्पती' पदवी जाहीर



**सोलापूर, दि.२५ जानेवारी-**

शास्त्रीय गायन क्षेत्रातील बहुमूल्य योगदानाबद्दल उमरगा येथील सुपुत्र आणि सोलापूरच्या सेवासदन कन्या प्रशालेचे संगीत शिक्षक विलास कुलकर्णी यांना उत्तर प्रदेश येथील 'पंडित दीनदयाळ उपाध्याय हिंदी विद्यापीठातर्फे 'विद्या वाचस्पती सारस्वत सन्मान' जाहीर करण्यात आली आहे. भगवान श्रीकृष्ण आणि भारतीय जनसंघाचे संस्थापक पं. दीनदयाळ उपाध्याय यांचे जन्मस्थान असलेल्या मथुरा येथील या विद्यापीठाने नुकतीच ही घोषणा केली. विद्यापीठाचे कुलपती इंदु भूषण मिश्रा यांनी पत्रकाद्वारे ही माहिती दिली. हिंदी भाषा, साहित्य आणि कला क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याचा गौरव करण्यासाठी हे विद्यापीठ जगभरात प्रसिद्ध आहे. येत्या १ फेब्रुवारी २०२६ रोजी नवी दिल्ली येथे 'राष्ट्रीय हिंदी चर्चासत्र आणि सत्कार समारंभ' आयोजित करण्यात आला आहे.




### 'विणकर बागेतील सर्व कामे तत्परतेने करू'

**सोलापूर, दि. २५ जानेवारी-**

प्रभातील सर्व विकास कामे विशेषता विणकर बागेतील सर्व कामे तत्परतेने करू असे आश्वासन नूतन नगसेवक अमर पुदाले यांनी सर्व नगरसेवकांच्या वतीने दिले. हरि ओम संस्थेकडून प्रभाग क्र ८चे नवनिर्वाचित नगरसेवक अमर पुदाले, गौरीशंकर दर्गो पाटील, गीता गवई, बबिता धुम्मा यांचा सत्कार हरि ओम विणकर बाग बहुद्देशीय संस्थेचे उपाध्यक्ष बालाजी जंगम यांच्या हस्ते करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी संस्थेचे विश्वस्त अशोक यज्जा,पदाधिकारी, मिलींद बोमड्याल, रुक्मण्सा दौलताबाद, पत्तेवार, मुसलाप्पा कसा, मोहन भूमकर, मुरलीधर अरकाल, अरविंद वासी, कृष्णा गुर्रम, दुर्गेश सिद्दम आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लक्ष्मीकांत दंडी यांनी केले. गणेश सिद्धम यांनी प्रास्ताविक केले. राजगोपाल गणपा यांनी आभार मानले.

## निधन वृत्त...

### विजय राऊत



**कासेगाव, दि.२५ जानेवारी-**

कासेगाव (ता. दक्षिण सोलापूर) येथील श्रीदत्त हॉटेल व बार्शीतील श्रीदत्त नाष्टा सेंटरचे मालक विजय रामलिंग राऊत (वय-६३) यांचे बार्शी येथील हिरेमठ हॉस्पीटलमध्ये उपाचारदरम्यान दि.२३ जानेवारी रोजी निधन झाले. कासेगाव येथील स्मशानभूमीत त्यांच्या पार्थीवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सून, तीन विवाहित मुली, जावई, नातवंडे, तीन भाऊ, भावजयी असा परिवार आहे. कासेगाव परिसरात प्रसिध्द आचारी म्हणून त्यांचा नावलौकीक होता. जिल्हा मध्यवर्ती बँकेचे कर्मचारी बालाजी राऊत यांचे ते बंधू होत.

# वारी परिवाराच्या वतीने राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त मतदान जनजागृती सायकल रॅली



**तभा वृतसेवा,**
**मंगळवेढा, दि.२५ जानेवारी-**

आगामी काळात होऊ घातलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या तोंडावर मंगळवेढ्यातील वारी परिवार सायकल क्लबने दि २५ जानेवारी रोजी राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त मंगळवेढा ते खोमनाळ मतदार जनजागृती सायकल रॅली काढून प्रबोधन केले.

तहसिलदार तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी मदन जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली लोकशाहीच्या उत्सवात नागरिकांचा सहभाग वाढविण्याकरिता सायकल स्वारांनी महत्वपूर्ण कार्य केले आहे. येणाऱ्या निवडणुकीत जास्तीत जास्त मतदारांनी मतदान करून आपला मतदानाचा हक्क बाजावावा अशी साद घालण्यात आली. यावेळी मतदार राजा जागा हो, लोकशाहीचा धागा हो, आपले मत पवित्र मत, मतदान करूया लोकशाही बळकट करूया, लावा बोटाला शाई बळकट करा लोकशाही, अंगणात घाला रांगोळी सडा मतदानाला बाहेर पडा, चला रे चला मतदानाला चला असा मतदानाचा जनजागर करण्यात आला. सदर रॅलीचा समारोप तहसील कार्यालय मंगळवेढा येथे करण्यात आला. यावेळी राष्ट्रीय कार्यात मोलाचे योगदान दिल्याबद्दल सर्व रायडर्सना सन्मानित करण्यात आले.

याअगोदरही वारी परिवाराच्या वतीने अनेक गावात मतदान जनजागृती करण्यात आली. निश्चितच सदर स्तुत्य उपक्रमामुळे येणाऱ्या पंचायत समिती व जिल्हा परिषद निवडणूकीत मतदानाची टक्केवारी वाढण्यास मदत होणार आहे.

सदर रॅलीत चंद्रजीत शहा, विजय क्षीरसागर, विष्णू भोसले, विठ्ठल बिले, दत्तात्रय जाधव, स्वप्नील टेकाळे, कल्याण घुले, पांडुरंग कोंडूभैरी, विवेक वाले, रवी जाधव, अवी जाधव, प्रा विनायक कलुबर्मे, सतीश दत्तू, सुधीर बिले, हणमंत ढेंबरे आदी सहभागी होते. यावेळी नायब तहसीलदार जयश्री स्वामी, स्वीप नोडेल ऑफिसर पूनम नरसोडे, हरिप्रसाद देवकर, अमोल वस्त्रे, तहसील कार्यालय व मंगळवेढा नगरपरिषद यांचे विशेष सहकार्य लाभले.

## उजनीतील पद्मावती मंदिरात चोरी; मूर्तीचे सात लाखांचे दागिने लंपास

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डुवाडी, दि.२५ जानेवारी-**

उजनी मा.(ता माढा) येथील पद्मावती मंदिराच्या दरवाजाचा कडीकोयंडा तोडून पद्मावती देवीच्या मूर्तीचे सोने चांदीचे दागिने व साहित्य असा सुमारे सात लाख रूपयांचा ऐवज चोरट्याने चोरून नेला.

ही घटना दि.२३ रोजी रात्रीच्या सुमारास उजनी मा. ता.माढा येथील पद्मावती देवीच्या मंदिरात घडली. याबाबत मंदिरातील पुजारी महादेव शिवराम घाडगे वय ५३ रा.भराडीवस्ती उजनी (मा) यांनी कुर्डुवाडी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार फिर्यादी स्वतः दि.२३ रोजी सायं ५.३० वा मंदिराच्या गाभाऱ्याचा दरवाजा बंद करुन घरी गेले होते. दुसऱ्या दिवशी दि.२४ रोजी स.६.२५ वा नागनाथ भराडे यांनी फिर्यादीला फोन करुन सांगितले की मंदिराचा दरवाजाचे कुलूप तोएले आहे व मंदिर उघडे दिसत आहे .तुम्ही लवकर या. फिर्यादी धावत पळत मंदिरात आले तेंव्हा देवीच्या मूर्तीवरील सोन्याचे दागिने दिसून आले नाहीत व गाभाऱ्यातील लोखंडी कपाट उघडे दिसले.चोरी झाल्याचे लक्षात येताच त्यांनी गावातील पोलीस पाटील, सरपंच व ग्राम स्थांना बोलावून घेत चोरट्यांनी देवीच्या मूर्तीवरील सोन्याचे दागिने व कपाटातील दागिने चोरुन नेले असल्याचे लक्षात आले. यामध्ये मूर्तीच्या गळ्यातील सव्वा तोळे वजनाची सोन्याची बोरमाळ, गळ्यातील सोन्याचे दीड तोळ्याचे गंठण, नाकातील नथ , सोन्याचे सव्वा तोळ्याचे गंठण असे सुमारे ४ तोळे एक ग्रॅम वजनाचे ३ लाख ६९ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरीस गेले. त्याचबरोबर देवीचा अर्धा किलोवजनाचा चांदीचा टोप, एक किलो,पाउन किलो,पाव किलो,वीस ग्रॅम वजनाचे चांदीचे चार जोड पादुका, ७०० ग्रॅम वजनाचा देवीचा चांदीचा टोप, २०० ग्रॅम वजनाचे देवीच्या गळ्यातील चांदीचे लिंग, अर्धा भार वजनाचा चांदीचा घोडा व देवीच्या नैवेद्याचे अर्धा किलो वजनाचे चांदीचे ताट व तांब्या असा एकूण २ लाख ७६ हजार २५० रुपये किमतीचे ३ किलो २६० ग्रॅम वजनाचे चांदीचे दागिने चोरीस गेले.



## मुख्याध्यापक संघ अक्कलकोट तालुकाध्यक्षपदी प्रभाकर बंदीछोडे

### उपाध्यक्षपदी शिवराज किलजे तर सचिवपदी सिध्दय्या स्वामी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २५ जानेवारी-**

अक्कलकोट तालुका माध्यमिक व उच्च माध्यमिक मुख्याध्यापक संघाच्या नुकत्याच झालेल्या सभेत तालुकाध्यक्षपदी प्रभाकर बंदीछोडे, उपाध्यक्षपदी शिवराज किलजे तर सचिवपदी सिद्धया स्वामी यांची निवड करण्यात आली.

राज्य मुख्याध्यापक महामंडळाचे माजी अध्यक्ष व जिल्हा परिषद सदस्य सुभाष माने यांनी कार्यकारिणीची निवड जाहीर केली. जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून उत्तम लवटे उपस्थित होते. यावेळी राज्याध्यक्ष तानाजी माने, रंगसिद्ध दसाडे, सिद्राम खट्टे, रेवणसिद्ध रोडगीकर हे नियंत्रण समितीचे सदस्य उपस्थित होते. श्रीशैल पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. तालुक्यातून प्राचार्य मुख्याध्यापक, मुख्याध्यापिका मोठ्या संख्येने उपस्थित होते. बसय्या हिरेमठ, भोसले मॅडम ,बाबर मॅडम, चंद्रकांत पुजारी, कल्याणी देशेट्टी, सिद्धेश्वर धर्मसाले, अनिल पाटील, महादेव सोनकर, संजय जानराव आदींनी परिश्रम घेतले. सिद्धया स्वामी यांनी सूत्रसंचालन केले. प्राचार्य शंकर व्हनमाने यांनी आभार मानले.

**तालुका नूतन कार्यकारणी**

विद्यासचिव सोनाली सुतार, कोषाध्यक्ष अशोक कलशेट्टी, प्रसिद्धी प्रमुख शंकर व्हनमाने, क्रीडा विभाग प्रमुख अनिल देशमुख, कार्यकारणी सदस्य महेश चाणकोटे, महादेव मान, अशोक मुजावर, सिद्धाराम हडपद, मलकप्पा भरमशेट्टी, व्यंकटेश बोकडे, सल्लागार कल्याणी देशेट्टी, नंदाजी कदम.

## कासारवाडी येथे श्रमसंस्कारातून घडली समाजाभिमुख पिढी

### सुलाखे कॉलेजच्या सात दिवसीय शिबिराचा प्रेरणादायी समारोप



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२५ जानेवारी-**

येथील बी. पी. सुलाखे कॉमर्स कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने कासारवाडी (ता.बार्शी) येथे आयोजित सात दिवसीय विशेष निवासी श्रमसंस्कार शिबिराचा समारोप झाला. शिबिरात १०० स्वयंसेवक व स्वयंसेविकांनी सहभाग नोंदविला.

'शाश्वत विकासाच्या दिशेने युवकांची भूमिका : जलसंधारण व्यवस्थापन व पडीक जमीन विकास' या विषयावर आधारित हे शिबिर दि. १७ ते २३ जानेवारी या कालावधीत पार पडले. समारोप कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे सोलापूर विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे माजी संचालक डॉ. जी. एम. सरवदे होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. बी. करंडे होते. यावेळी सरपंच अश्विनी मंडलिक, उपसरपंच जितेंद्र गायकवाड व जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक सुधाकर बडे हे उपस्थित होते. प्रा. के. एम. माळी यांनी शिबिराचा अहवाल सादर केला. डॉ. बी. डी. लांडे यांनी पाहुण्यांचा परिचय करुन दिला. कार्यक्रम अधिकारी डॉ. एम. ए. ढगे यांनी निकाल वाचन केले. उत्कृष्ट ग्रुप व उत्कृष्ट स्वयंसेविका या दोन्ही पुरस्कारांचे बक्षीस वितरण प्रमुख पाहुणे डॉ. सरवदे यांच्या हस्ते करण्यात आले. तर उत्कृष्ट स्वयंसेवक पुरस्काराचे बक्षीस वितरण कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. करंडे यांच्या हस्ते करण्यात आले. यामध्ये उत्कृष्ट ग्रुप (विभागून)- सिंधुदुर्ग ग्रुप, हरिहर ग्रुप. उत्कृष्ट स्वयंसेवक (विभागून)- श्रीराम तोडकरी, प्रथमेश आगलावे. उत्कृष्ट स्वयंसेविका (विभागून)- निशा पवार, सृष्टी गुंडगिरी. शिवानी पवार व प्रेमसाई वाघमोडे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. एम. ए. ढगे यांनी आभार मानले.

## जामगाव येथे नशामुक्त भारत महोत्सव; ३५० विद्यार्थ्यांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २५ जानेवारी-**

जामगाव (आ) (ता. बार्शी) येथील आयुष व्यसनमुक्ती उपचार व संशोधन केंद्राच्यावतीने घेण्यात आलेल्या नशामुक्त भारत युवक महोत्सवात २० शाळांनी सहभाग घेतला. यामध्ये तब्बल ३५० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. त राष्ट्रमाता जिजाऊ जयंती व स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त संपन्न झाला.

भारत सरकारच्या सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयाच्या नशामुक्त भारत अभियानअंतर्गत हा महोत्सव झाला. महोत्सवाचे उद्घाटन नायब तहसीलदार एस. व्ही. बदे यांच्या हस्ते झाले. यावेळी तुरुंग अधिकारी संदीप नालपे, येडाई प्रोड्युसर कंपनी आंदोरा यांच्या संचालिका सुमन तांबारे, आयुष व्यसनमुक्ती उपचार व संशोधन केंद्राचे संचालक डॉ. संदीप तांबारे, कविता अंधारे, जी. बी. शिंदे उपस्थित होते.

युवकांमध्ये व्यसनमुक्तीबाबत जनजागृती निर्माण करणे आणि निरोगी जीवनशैलीचा संदेश देणे हा या महोत्सवाचा मुख्य उद्देश होता. या उ महोत्सवाअंतर्गत व्यसनमुक्ती पथनाट्य, वक्तृत्व स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, समूह नृत्य तसेच रील स्पर्धा अशा विविध सृजनशील व प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. पथनाट्यातून व्यसनांचे दुष्परिणाम, कुटुंबावर होणारा परिणाम आणि व्यसनातून मुक्त होण्याचे मार्ग प्रभावीपणे मांडण्यात आले.

वक्तृत्व स्पर्धेत विद्यार्थ्यांनी नशामुक्त भारत - सशक्त भारत आणि युवक व व्यसनमुक्ती या विषयांवर विचार मांडत उपस्थितांना प्रेरित केले. विविध स्पर्धांतील विजेत्यांना बक्षिसे व प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले. एम. डी. मोरे यांनी सूत्रसंचालन केले. सचिन शिंदे यांनी आभार मानले.


## चोरीच्या संशयातून तरुणाला मारहाण

**बार्शी, दि. २५ जानेवारी -**

तालुक्यातील मालवंडी गावात किराणा माल चोरीच्या संशयावरुन तरुणास लाकडी काठीने व लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी तिघांविरुद्ध पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

याबाबत नौशाद असिफ शेख (वय ३०, व्यवसाय मजुरी, रा. मालवंडी, ता. बार्शी) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांचा मुलगा तन्वीर हा १७ जानेवारी रोजी कामासाठी धानोरे रोडवरील लक्ष्मण लेंगरे यांच्या शेतात गेला होता. दुपारी दोनच्या सुमारास आशपाक अत्तार यांच्या दुकानाजवळ मालाचे पुडे पडलेले दिसल्याने अनिल लेंगरे याने ते उचलून घरी नेले होते. यानंतर तन्वीर हा अनिलला दुकानासमोरुन घेऊन जात असताना, आशपाक व मेहबुब अत्तार आणि त्यांचा मेहुणा यांनी अडवून चोरीचा आरोप करत शिवीगाळ सुरु केली.

## श्रीपूर येथे गोंदवलेकर महाराज जन्मोत्सवानिमित्त कीर्तन महोत्सव




**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि.२५ जानेवारी-**

श्रीपूर (ता. माळशिरस) येथील श्रीराम भक्त मंडळाच्या वतीने हनुमान मंदिरात ब्रम्हचैतन्य गोंदवलेकर महाराजांच्या जन्मोत्सवा निमित्त बुधवार दि. २८ जानेवारी ते शुक्रवार दि. ३० जानेवारी पर्यंत किर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती श्रीराम भक्त मंडळाचे हरीभाऊ कुलकर्णी यांनी दिली.

यावेळी गजानन मोकाशी, हरीभाऊ वसेकर, संतोष जोशी, तुकाराम केसकर उपस्थित होते.अधिक माहिती देताता हरीभाऊ म्हणाले जन्मोत्सवाचे हे २६ वे वर्ष आहे. साधारण पणे सर्वत्र पारंपारिक (वैष्णव )किर्तने होतात. यावर्षी किर्तन मंजिरी संध्याजी संतोष पाठक (पोतदार) यांचे बुधवार दि. २८ व २९ जानेवारी रोजी सायंकाळी ७ ते ९ तसेच शुक्रवार दि. ३० जानेवारी रोजी काल्याचे किर्तन व पुष्पवृष्टी होऊन महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. तर दि. २८ रोजी गोंदवलेकर महाराजांच्या प्रतिमेची सायं.६ वा शोभायात्रा काढण्यात येणार आहे. याबरोबरच दररोज पहाटे ५ ते ६ वाजता काकड आरती होणार आहे.

**बारामती कृषी प्रदर्शन**

## केव्हीके चॅम्पियन स्पर्धेत निमगाव टें च्या पाटलांच्या चिमणी कालवडीचा प्रथम क्रमांक

### दुर्मिळ अकरा कालवडींचा स्पर्धेत सहभाग



**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डूवाडी, दि. २५ जानेवारी -**

भारतातील सर्वात मोठ्या भरवले गेलेल्या बारामती येथील कृषि प्रदर्शनामध्ये केव्हीके आयोजित कालवड चँम्पियन स्पर्धेत माढा तालुक्यातील निमगाव टें येथील पाटलांच्या 'चिमणी' कालवडीने सर्व किचकट निकष पार करीत प्रथम क्रमांक पटकावला. यानिमित्त पाटील यांचा शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह व रोख ५१ हजार रूपये देऊन सत्कार करण्यात आले. या स्पर्धेत राज्यातुन ११ दुर्मीळ कालवडींचा सहभाग होता.

बारामतीच्या कृषी प्रदर्शनात केव्हीके आयोजित कालवड चॅम्पियन स्पर्धेत निमगाव टें येथील पशुपालक प्रदीपकुमार भागवत पाटील यांच्या पाटील डेअरी फर्म मधील एचएफ कालवडीने प्रथम क्रमांक पटकावत उल्लेखनीय यश संपादन केले. त्यांच्या या उत्कृष्ट कामगिरीबद्दल त्यांना प्रथम पारितोषिकाचा मानाचा पुरस्कार आयोजक व सर्वेसर्वा राजेंद्र पवार यांच्या हस्ते प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

या स्पर्धेमध्ये एच.एफ. कालवडींचा समावेश असून, प्रदर्शनासाठी १५ ते २२ महिन्यांपर्यंत वयाच्या कालवडींसाठी शर्थ व अटी लागू होत्या. या चॅम्पियन स्पर्धेत पाटील यांच्या बी.एफ. आम्रपाल सिमेन्सपासून जन्मलेल्या एच.एफ. कालवडीने सर्वोत्तम गुणवत्ता, संगोपन व देखभालीच्या निकषांवर अव्वल ठरत परीक्षकांची मने जिंकली.

या यशामागे पाटील यांना त्यांच्या आई-वडिलांचा आशीर्वाद, तसेच आदर्श सरपंच यशवंत शिंदे व गार्गी यशवंत शिंदे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. याशिवाय सोमनाथ चोरमुले व सुहास लट्टे यांचेही वेळोवेळी सहकार्य व मार्गदर्शन त्यांना मिळाले. या स्पर्धेत कळस येथील कृषि प्रदर्शनामध्ये प्रथम क्रमांक आलेल्या अनासरी मंचर येथील गणेश तावरे, योगेश तावरे याच्या ३ कालवडीसह यजमान बारामती येथील सहा कालवडींचा समावेश होता. अशा अकरा कालवडींचा स्पर्धेत सहभाग होता.

या दैदीप्यमान यशामुळे निमगाव टें. परिसरासह तालुका व जिल्हा पातळीवर कृषी व पशुपालन क्षेत्रातून प्रदीपकुमार पाटील यांच्यावर अभिनंदन व शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. निमगाव टें येथे वाजत गाजत गुलालाची मुक्त उधळण करीत पाटील व त्यांच्या कालडीचे ग्रामस्थांनी स्वागत करीत आनंदोत्सव केला. या जातीचे कालवड पहील्या वेतास ३२ ते ३८ लिटरपर्यंत दुध देतात.



रुक्मिणी मातेस अलंकार परिधान - रथसप्तमीनिमित्त श्री रुक्मिणी मातेस विविध अलंकार परिधान करण्यात आले होते.



सिध्दारुढ मठाच्या वतीने पालखी मिरवणूक - सोलापूर आकाशवाणी केंद्र परिसरातील रवींद्र नगर, गवळी वस्ती येथील सिध्दारुढ मठाच्या वतीने पालखी मिरवणूक काढण्यात आली.



रथसप्तमीनिमित्त सोलापुरातील शुभराय मठात रविवारी सामुदायिक बोरन्हाण कार्यक्रम संपन्न झाला. भगवान श्रीकृष्णाच्या जन्मापासून ही प्रथा चालत आलेली आहे, असे सांगण्यात आले.

# जि.प. निवडणूक प्रचारासाठी मुख्यमंत्री, महसूलमंत्री येणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ जानेवारी-**

राज्याच्या १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांसाठी ही निवडणूक जाहीर झाली आहे. जिल्ह्यातील १२ नगरपालिका, सोलापूर महापालिका निवडणुकीनंतर आता जिल्हा परिषदेचीही निवडणूक लागली असून, यामध्ये ६८ जागांसाठी चुरशीचे मतदान होणार आहे. सध्या वैध ठरलेल्या सर्व पक्षीय उमेदवारांनी प्रचाराचा शुभारंभ जोरात सुरू केला आहे. भाजपाच्या उमेदवारांनी डोअर टु डोअर प्रचारावर भर दिला आहे. दरम्यान, या उमेदवारांच्या प्रचारासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे येणार असल्याची माहिती भाजपा जिल्हाध्यक्ष शशिकांत





चव्हाण यांनी दिली.

सोलापूर महापालिका निवडणुकीनंतर आता ग्रामीण भागाचे राजकारण चांगलेच तापले आहे. दरम्यान, सोलापूर जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद ओबीसीसाठी राखीव आहे. या निवडणुकीसाठी काही उमेदवारांच्या गटातील मतदारसंघात त्यांच्या २-३ राऊंडही झाल्या आहेत. दरम्यान, ही निवडणूक भाजपा, राष्ट्रवादी अन् शिंदे सेनेतच रंगणार असल्याचे दिसून येत आहे. अर्ज माघार घेण्यासाठी अजून २ दिवस बाकी असल्याने यानंतरच फायनल उमेदवारांची यादी समोर येणार आहे. सध्यातरी विविध पक्षाच्या नाराज पदाधिकाऱ्यांचा रूसवा काढण्यात नेतेमंडळी व्यस्त असल्याचे दिसून येत आहे.

जिल्ह्यात १२ नगरपालिकांची नुकतीच निवडणूक पार पडली आहे. यामध्ये भाजपाच्या जागा वाढल्यानंतर महापालिकेतही भाजपाला बहुमत (८७ जागा) मिळाले आहे. आता जिल्हा परिषदा आणि पंचायत समितीच्या निवडणुकांची रणधुमाळी चालू आहे. महापालिका निवडणुकीसाठी मुख्यमंत्री फडणवीस आल्यानंतर मतदानाचा मोठा टक्का वाढला होता; यामुळेच या धर्तीवर आता जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत मुख्यमंत्र्यांच्या २ आणि महसूलमंत्र्यांच्या ४ सभा ठेवल्या आहेत. याचा फायदा भाजपाला होईल, असा आशावादही त्यांनी व्यक्त केला.

## विकास जाधव यांच्या वतीने नगरसेवक इंगळे यांचा सत्कार

**अक्कलकोट :** पिंपरी चिंचवडचे भारतीय जनता पार्टीचे मंडल उपाध्यक्ष विकास जाधव परिवाराच्या वतीने श्री.वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन तथा भारतीय जनता पार्टीचे नगरसेवक महेश इंगळे यांचा वटवृक्ष मंदीरात सत्कार करण्यात आला. यावेळी मंदिर समितीचे सचिव आत्मराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, प्रा.शिवशरण अचलेर, श्रीशैल गवंडी, श्रीकांत मलवे व जाधव परिवारातील मोहन जाधव, स्वाती जाधव, मनस्वी जाधव, श्रीवि जाधव, सिद्धी जाधव उपस्थित होते.

# राजकीय नेते प्रचारात व्यस्त, पाणीटंचाईने नागरिक त्रस्त

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि.२५ जानेवारी...**

भीमा नदीत पाणी नसल्यामुळे टाकळी येथून मंद्रूपला होणारा पाणीपुरवठा आठ दिवसापासून बंद आहे . त्यामुळे ऐन निवडणुकीच्या तोंडावर मंद्रूपकरांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. याकडे ग्रामपंचायतीचे दुर्लक्ष होत असून पर्यायी व्यवस्था करण्याची मागणी होत आहे .



मंद्रूप गावाला टाकळी येथील भीमा नदीतून पाणीपुरवठा करण्यात येतो. मात्र आठ दिवसापासून भीमा नदीत पाणी नसल्यामुळे मंद्रूपचा नळ पाणीपुरवठा बंद करण्यात आला आहे . याबाबत ग्रामपंचायतकडे विचारणा केली असता प्रशासनाकडून उडवाउडवीची उत्तरे देण्यात येत आहे. त्यामुळे जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीत मतदारांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे . वारंवार पाणी टंचाई समस्या उद्भवत असताना सत्ताधाऱ्यांकडून बघायची भूमिका घेण्यात येत असल्यामुळे नागरिकांमधून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. १४ कोटी रुपये खर्च करून नवीन पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे, मात्र सत्ताधाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे या जलवाहिनीतून मंद्रूपला अपुरा व खंडित पाणीपुरवठा होत असल्यामुळे नागरिकांमधून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. आठ दिवसापासून पाणीटंचाई असताना नागरीकांना दवंडी देऊन कल्पनाही देण्यात आली नाही.



त्यामुळे नागरीक दररोज पाण्याच्या प्रतीक्षेत दिसून येत आहेत. ग्रामपंचायतीच्या हलगर्जीपणामुळे अबालवृध्दांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. सर्वत्र प्रजासत्ताकदिन जल्लोषात साजरा करण्यात येत असताना विद्यार्थी व नागरीकांना पाण्याची प्रतिक्षा करावी लागत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांमधून ग्रामपंचायतच्या कारभाराविरोधात संताप व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान आठ दिवसापासून जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरू झाली आहे. यासाठी मंद्रूपमधील सर्वपक्षीय नेते उमेदवार म्हणून इच्छुक आहेत. मंद्रूपमध्ये आठ दिवस पाणीटंचाई असताना राजकीय नेते मात्र प्रचारात व्यस्त आहेत. त्यामुळे मतदारांमधून संताप व्यक्त करण्यात येत आहे.

# जिजाऊ सृष्टी आणि पुतळा उभारण्याचा निर्धार

## मराठा सेवा संघातर्फे नूतन नगरसेवकांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२५ जानेवारी-**

छत्रपती शिवाजी महाराज आणि राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ यांच्या प्रेरणेतून आम्ही सार्वजनिक जीवनात आलो. समाजबांधवांच्या पाठिंब्यामुळे नगरसेवक होण्याची संधी मिळाली. त्यामुळे सोलापूर शहरात जिजाऊ सृष्टी साकारण्यासाठी व राजमाता जिजाऊ यांचा पुतळा उभारण्याकामी आम्ही आजरोजी निर्धार करीत आहोत, असे मराठा समाजातील नूतन नगरसेवकांनी सांगितले.



मराठा सेवा संघाच्या वतीने मराठा समाजातील नूतन नगरसेवकांचा सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. पुणे विभागिय अध्यक्ष प्रशांत पाटील हे अध्यक्षस्थानी होते. आजच्या सत्काराला उत्तर देताना मराठा समाजातील नगरसेवकांनी असेही सांगितले की, समाजाचे प्रश्न सोडवण्यासाठी सभागृहात काम करणार आहोत. सामाजिक सलोखा जपत शहराच्या सर्वांगीण विकास करु. नूतन नगरसेवक जयकुमार माने, अमोल शिंदे, अनंत जाधव, गणेश वानकर, विनोद भोसले, प्रिदर्शन साठे, श्रध्दा पवार, मृण्मयी गवळी, ज्ञानेश्वरी देवकर, वैशाली भोपळे, कल्पना कदम, मनोरमा सपाटे, पूनम काशीद या नूतन नगरसेवकांचा सन्मान करण्यात आला. अमोल शिंदे, गणेश वानकर, विनोद भोसले, अनंत जाधव, जयकुमार माने, कल्पना कदम यांनी मनोगत व्यक्त केले.

याप्रसंगी दत्ता मुळे, प्रिती कदम, उज्वला साळुंखे, सदाशिव पवार, आर.पी. पाटील, प्रकाश ननवरे, हणमंत पवार, नवनाथ चव्हाण, सोमनाथ राऊत, लक्ष्मण महाडिक, दिनकर देशमुख, सचिन चव्हाण, गोवर्धन गुंड, प्रकाश डोंगरे, नितीन जाधव, हनुमंत चव्हाण, नितीन मोहिते, नवनाथ कदम, राम माने, परशुराम पवार, स्वाती पवार, लत्ता ढेरे, अभिजंली जाधव आदी उपस्थित होते.

# ‘कुटुंबाच्या सर्वांगीण विकासात महिलांचे मोठे योगदान’



## राष्ट्रीय गुरव समाज महासंघातर्फे हळदी-कुंकू व तीळगुळ वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ जानेवारी-**

कुटुंबाच्या सर्वांगीण विकासात महिलांचा योगदान मोठा आहे. स्त्री ही अबला नव्हे सबला व सर्वगुणसंपन्न आहे. महिलांनी स्वकार्यक्षमता व नियोजन कौशल्याचा विकास करून कौटुंबिकसह शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक संपन्नता निर्माण करावी, असे प्रतिपादन भाजपाच्या शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर यांनी केले.

राष्ट्रीय गुरव समाज महासंघाच्या सोलापूर जिल्हा शाखेच्या वतीने आयोजित हळदी-कुंकु व तीळगुळ वाटप कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी राष्ट्रीय कार्याध्यक्ष मल्लिकार्जुन गुरव, जिल्हाध्यक्ष निंगराज विंचुरे, जिल्हा महिलाध्यक्षा वर्षा पाथरकर, शहराध्यक्ष वैशाली मेलगिरी आदी उपस्थित होते.

संभाजीनगर येथील गुरव समाजातील नूतन नगरसेविका अर्चना शैलेश नीलकंठ, सोलापूरच्या नगरसेविका कल्पना ज्ञानेश्वर कारभारी आणि ज्ञानेश्वर पाटील यांची जिल्हा कार्याध्यक्षपदी तर शंकर पाटील यांची सहकार्याध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

प्रारंभी संत काशीबा महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. वेदश्री फुलारी हिने ईशस्तवन म्हटले. दरम्यान, खास महिलांसाठी गाण्यातून उखाणा घेणे, बादलीत चेंडू टाकणे, चिठ्ठ्यानुसार गीत गायन करणे आदी स्पर्धा घेण्यात आले. श्रध्दा पाटील व कौशल्य पुजारी यांनी खेळ तर अश्विनी गुरव, उज्ज्वला पाटील व अश्विनी पुजारी यांनी लकी ड्रॉचे स्पर्धेतील मानकरी ठरले. श्रेया पाटील, सारिका पाटील, कविता स्वामी, मनीषा गुरव, पूजा गुरव, प्रियंका पाटील यांनी या स्पर्धांचे संयोजन केले.

वंदना तळीखेडे, जयश्री चिंचोळकर, संगीता स्वामी, अनिता पाटील, अपर्णा स्वामी, राजश्री पुजारी, मनोरमा जिड्डीमनी, आनंद पुजारी यांनी वाण, वर्षा पाथरकर यांनी नाष्टा तर वैशाली मेलगिरी यांनी तीळगुळ दिले. मनोरमा जिड्डीमनी यांनी सूत्रसंचालन केले. सुरेश पाटील यांनी सत्कारमुर्तींच्या नावांचे वाचन केले. श्रेया पाटील व पूर्वा पुजारी यांनी पाहुण्यांचे परिचय करुन दिले. मनिषा बोरगांवकर यांनी आभार मानले.

## माघवारी पालखी सोहळ्यातील आज दुसरे रिंगण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ जानेवारी-**

माघवारी पालखी सोहळ्यासाठी प्रतिवर्षी पंढरपूरला पायी चालत जात असताना मार्गावर असलेल्या गावामध्ये जनजागृती करत आम्ही मार्गस्थ होत असतो. यंदा देशाची संस्कृती व भक्ती परंपरा याचा संगम कुरुल (ता. मोहोळ) येथे प्रजासत्ताक दिनी होत आहे. माघवारीतील दुसरे गोल रिंगण भावपूर्ण वातावरणात संपन्न होणार असल्याची माहिती ह.भ.प. सुधाकर इंगळे यांनी दिली. हा गोल रिंगण सोहळा दि.२६ जानेवारीस सकाळी ९.३० वा. राष्ट्रध्वज व वारकरी पताका स्मरण करून सुरु होणार आहे. माघवारीतील दुसरे गोल रिंगण भावपूर्ण वातावरणात संपन्न होणार आहे. रिंगणाचे यजमान कुरुल ग्रामस्थ व हनुमान भजनी मंडळ हे आहेत. सुधाकर इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली तानाजी बेलेराव, कुमार गायकवाड, प्रदीप मोरे आदी परिश्रम घेत आहेत.



# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## विद्यार्थ्यांकडून मतदान जनजागृती

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २४ जानेवारी :** जिल्हा परिषद, पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकांच्या अनुषंगाने, शाळा, महाविद्यालयांत मतदार जनजागृती करण्यानिमित्त वेळापत्रक जाहीर केले आहे. १९ जानेवारीपासून वेळापत्रकानुसार अंमलबजावणी सुरू असल्याची माहिती लातूर पं. स.चे गटशिक्षणाधिकारी चाँद शेख यांनी दिली.

दि. १९ ते २३ जानेवारी दरम्यान, शाळांचे केंद्र प्रमुख, मुख्याध्यापक, विस्तार अधिकाऱ्यांची बैठक, शाळांमध्ये निबंध, चित्रकला स्पर्धा, जनजागृतीविषयक कार्यक्रम, बीएलओंची आढावा बैठक, असे कार्यक्रम पार पडले. दि. २४ जानेवारी रोजी सर्व शाळांच्या मुख्याध्यापकांनी शाळा परिसरातील मुख्य चौक व गर्दीच्या ठिकाणी मतदान जनजागृती विषयक पथनाट्य, सर्व शाळांत मतदार जनजागृतीसाठी पालक मेळा-वा घेण्यात आला. दि. २६ जानेवारीला प्रभातफेरीद्वारे जनजागृती करणे, घोषवाक्य देणे हे कार्यक्रम होणार आहेत. तर दि. २७, २८ जानेवारी रोजी सर्व शाळांत वक्तृत्व - घोषवाक्य स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार आहे. दि. २९ जानेवारीला सर्व शाळांत पत्रिका वाटप, दि. ३० जानेवारी रोजी मतदार संकल्प पत्र आई-वडिलांकडून घेणे, दि. ३१ जानेवारीला स्काऊट गाईड रॅली कार्यक्रम, मुरूड, बोरी, तांदुळजा, गंगापूर येथे होईल. दि. २ फेब्रुवारी रोजी मतदार जनजागृती विषयक सायकल रॅली मुरूड, बोरी, तांदुळजा, गंगापूरसह इतर ठिकाणी काढण्याच्या सूचना लातूरचे गटशिक्षणाधिकारी चाँद शेख यांनी मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख, शिक्षकांना दिल्या आहेत. ही जनजागृती मोहीम ३ फेब्रुवारीपर्यंत चालणार आहे.



# मनपा पदाधिकाऱ्यांच्या निवडीबद्दल उत्सुकता

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २४ जानेवारी :** नुकत्याच पार पडलेल्या लातूर शहर महानगरपालिकेच्या नूतन पदाधिकाऱ्यांच्या निवडीकडे लातूरवासियांचे लक्ष लागले असून कोणत्या नगरसेवकाच्या खांद्यावर कोणती जबाबदारी सोपविली जाऊ शकते,याबद्दल सामान्य नागरिकांत प्रचंड उत्सुकता आहे. मनपा निवडणुकीत काँग्रेस - वंचित आघाडीला लातुरात स्पष्ट बहुमत मिळाल्याने नागरिकांच्या नजारा आता आ. अमित देशमुख यांच्या निर्णयाकडे लागल्या आहेत.



मनपाचे महापौर पद अनुसूचित जातीच्या महिला प्रवर्गासाठी आरक्षित झाल्याने आता त्या पदाबद्दलची उत्सुकता संपली आहे. तरीही महापौर कोणाला विराजमान केले जाणार ? याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे. मनपात पहिल्यांदा प्रवेश करणाऱ्या नगरसेविकेवर आ. अमित देशमुख एवढी मोठी जबाबदारी सोपविणार नाहीत, असा अनेकांचा होरा आहे. त्यामुळे दुसऱ्यांदा नगरसेविका म्हणून निवडून आलेल्या अजनीकर यांच्या गळ्यात महापौर पदाची माळ पडण्याची शक्यता अधिक दिसून येत असल्याचे बोलले जात आहे. या एकाच पदाबद्दल नागरिकात चर्चा नसून त्यासोबतच उपमहापौर, विविध विषय समित्यांचे सभापतीपदांवर कोणाची वर्णी लागणार ? याकडेही सामान्य लातूरवासियांचे लक्ष लागले आहे. राज्यात आणि केंद्रात भाजपचे सरकार असताना लातूरच्या मतदारांनी काँग्रेसला स्पष्ट बहुमत दिले आहे. लातूर शहराच्या विविध विकास कामांसाठी भविष्यात लागणाऱ्या शेकडो कोटींच्या निधीसाठी आ.अमित देशमुख यांना त्यांच्या राजकीय नातेसंबंधांचा अतिशय चौकसपणे वापर करावा लागणार आहे. आ. देशमुख आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे संबंध जवळीकतेचे असल्यामुळे लातूरच्या विकास कामांना निधीची कमतरता भासणार नाही, असाही अंदाज लावला जात आहे. आता निवडणुका संपल्या आहेत. त्यामुळे मुख्यमंत्री सुद्धा विकास कामांना प्राधान्य देण्याच्या दृष्टीने सर्वतोपरी उपाययोजना उपलब्ध करून देतील,असा विश्वासही नागरिकांना वाटत आहे.

या महिना अखेरीस महापौर पदाच्या निवडीचा कार्यक्रम जाहीर होईल. त्यानंतर उपमहापौर आणि विविध विषय समित्यांच्या सभापतींच्या निवडीचा कार्यक्रम लागेल. शहराच्या विकासाला खऱ्या अर्थाने गती देण्यासाठी पदाला न्याय देण्यास सक्षम असणाऱ्या चेहऱ्याच्या निवडी करण्यास आ. देशमुख प्राथमिकता देणार असल्याची चर्चा काँग्रेसच्या वर्तुळात चालू आहे. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी पुरेशा प्रमाणात निधी उपलब्ध करून घेताना खऱ्या अर्थाने आ. अमित देशमुखांच्या नेतृत्वाची कसोटी लागणार आहे. त्यांनीही राजकारणातील अनेक चढ उतार अनुभवले - पाहिले असल्याने यासंदर्भात ते उचित निर्णय घेतील असा अनेकांना विश्वास आहे.

मनपा पदाधिकाऱ्यांच्या निवडीमध्येही आ. देशमुख अनुभवी चेहऱ्यांना प्राधान्य देतील, अशी चर्चा काँग्रेस आणि मनपा वर्तुळात चालू आहे. मावळत्या पालिका पदाधिकाऱ्यांच्या तुलनेत अधिक चांगले काम करण्यासाठी आपल्या नगरसेवकांना आ. देशमुख योग्य ते निर्देश देणार आहेत, हे कोणालाही वेगळ्या शब्दात सांगण्याची आवश्यकता नाही. शहराच्या कोणत्या प्रभागातील कोणत्या नगरसेवकांवर विषय समितीची जबाबदारी सोपविली जाईल याकडेही लातूरवासियांचे लक्ष लागून राहिले आहे.

# लातूरचे ग्रामदैवत श्री सिध्देश्वर यात्रा महोत्सवानिमित्त आज बैठक

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २४ जानेवारी :** लातूरचे ग्रामदैवत श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर देवस्थानच्या वतीने प्रतिवर्षी महाशिवरात्रीचे औचित्य साधत यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. याही वर्षी १५ फेब्रुवारीपासून यात्रा महोत्सव सुरु होणार असून या महोत्सवाच्या पूर्व तयारीसाठी रविवार दि. २५ जानेवारी रोजी सकाळी ११.३० वाजता बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीला देवस्थानचे विश्वस्त, प्रतिष्ठीत नागरिक व शिवभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असेआवाहन देवस्थानचे प्रशासक सचिन जांबुतकर यांनी केले आहे.



महाशिवरात्रीचे औचित्य साधून लातूरचे ग्रामदैवत असलेल्या सिध्देश्वर व रत्नेश्वर देवस्थानच्या वतीने यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. गेल्या ७२ वर्षापासून या महोत्सवाचे आयोजन होत असून याही वर्षी १५ फेब्रुवारीपासून ७३ वा यात्रा महोत्सव सुरु होणार आहे. या यात्रा महोत्सवात लातूर जिल्ह्यासह पर जिल्ह्यातील व कर्नाटक राज्यातील नागरिक व भाविक भक्त मोठ्या संख्येने सहभागी होतात. हा यात्रा महोत्सव शांततेत पार पडावा यासाठी प्रतिवर्षी विविध समित्या गठीत करण्यात येतात. सदर यात्रा महोत्सवाच्या पूर्वतयारीच्या अनुषंगाने देवस्थानचे प्रशासक सचिन जांबुतकर यांनी रविवार दि. २५ जानेवारी रोजी सकाळी ११.३० वाजता सिध्देश्वर व रत्नेश्वर देवस्थान येथे बैठकीचे आयोजन केले आहे. या बैठकीला देवस्थानचे विश्वस्त, शहरातील प्रतिष्ठीत नागरिक व शहर परिसरातील शिवभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन प्रशासक सचिन जांबुतकर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# विवेकी विचारांचे रणसिंग फुंकण्याची समाज जागृतीसाठी गरज : अ‍ॅड. पगार गवांदे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २४ जानेवारी :** समाजात बोकाळलेली अंधश्रद्धा, अनिष्ट रूढी, प्रथा, परंपरा आणि चालीरीतींच्या विरोधात विवेकी विचारांचे रणसिंग फुंकण्याची गरज आहे असे प्रतिपादन सुप्रसिद्ध सामाजिक कार्यकर्त्या अ‍ॅड. रंजना पगार गावंदे यांनी केले.

महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालयात आयोजित महात्मा बसवेश्र्वर व्याख्यानमालेच्या समारोप व तिसऱ्या पुष्पाच्या प्रसंगी समाज वास्तवाला भिडताना या विषयावर विचार मांडत होत्या.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा बसवेश्र्वर शिक्षण संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर हे होते. तर विचारमंचावर सहसचिव सुनील मिटकरी, कार्यकारी संचालक प्रदीपकुमार दिंडेगावे, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. आनंद शेवाळे, मुख्य समन्वयक डॉ. नल्ला भास्कर रेड्डी, कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. नितीन वाणी, संयोजक डॉ. रत्नाकर बेडगे आदीची उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी जगतज्योती महात्मा बसवेश्र्वरच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

पुढे बोलताना अ‍ॅड. पगार गवांदे म्हणाल्या की, आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या कृत्रिम बुद्धिमत्तेच्या आयोगातही समाजामध्ये कर्मकांड मोठ्या प्रमाणात पसरवले जात आहेत. चेटूक, डाकिन, अघोरी उपाय करणारे भोंदू बाबा, मांत्रिक, तांत्रिक यांनी समाज नासवला आहे. तथागत गौतम बुद्ध, महात्मा बसवण्णा आणि महाराष्ट्रातील संत सुधारकांनी या सर्व वाईट चालीरीती, रूढी परंपरा यांच्या विरुद्ध परखड शब्दांत ताशेरे ओढले आहेत. अंधश्रद्धेच्या नावाखाली समाजाचे शोषण करणाऱ्या भोंदू बाबांवर गुन्हे दाखल झाले पाहिजे. स्त्रियांच्या बाबतीत स्त्री भ्रूणहत्या मुलींची कौमार्य चाचणी, चारित्र्य परीक्षा, देवदासी आणि बालविवाह प्रथा देखील विज्ञाननिष्ठ समाजाने उखडून फेकल्या पाहिजेत. जातपंचायतीमध्ये अडकलेल्या कुटुंबांना या जोखडातून मुक्त केले पाहिजे असेही त्या म्हणाल्या.

अध्यक्षीय समारोपात शिक्षण संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर म्हणा-ले की, महात्मा बसवण्णा हे क्रांतिकारी समाज सुधारक होते त्यांच्या आंतरराष्ट्रीय कल्पना केवळ संघटित कार्याद्वारेच मूर्त होऊ शकते ही गोष्ट लक्षात घेऊन त्यांनी शरण यांना एकत्र करून समताधिष्ठित समाजाची निर्मिती केली. आजच्या लोकशाही शासन व्यवहारात देखील महात्मा बसवन्नाचे विचार तत्त्वज्ञान कार्य समाज उन्नती करिता मोलाचे आहेत असेही ते म्हणाले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. रत्नाकर बेडगे यांनी केले, पाहुण्याचा परिचय डॉ. अश्र्विनी रोडे यांनी तर सूत्रसंचालन प्रा. किसनाथ कुडके यांनी केले आणि आभार डॉ. मनोहर चपळे यांनी मानले.

# प्रशासक काळ संपूनही मनपाची अनागोंदी थांबेना

**माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे यांची मनपा आयुक्तांकडे मागणी**

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २४ जानेवारी :** लातूर शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूका नुकत्याच पार पडल्या असून महापौर, उपमहापौर निवडी बाबत राज्य शासनाने कार्यक्रम जा-हीर केलेला आहे. अशा परिस्थितीत व्यक्ती विशेष यांचे हित जोपासत नियम धाब्यावर बसवीत निविदा प्रक्रिया पूर्ण करण्याची घाई मनपा प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे. याबाबत माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे यांनी मनपा आयुक्तांकडे पारदर्शकता पाळण्याची विनंती केली आहे.



मागील ३ वर्षापेक्षा अधिक काळ ला-तूर महानगरपालिकेत प्रशासक राज्य हो-ते. याकाळात झा-लेला अनागोंदी कारभार लातूरकरांनी अनुभवला आहे. आता निवडणूक संपन्न झाल्या तरी यात बदल होताना दिसून येत नाही. नूतन कार्यमंडळ अस्तित्वात आले असूनही सर्व साधारण सभा तथा स्थायी समिती यांच्या मंजुरी न घेता राबविण्यात येत अस-लेली प्रक्रिया कायदेशीर नसल्यानं यावर स्थगिती देण्याची मागणी त्यांनी केली आहे.

# विवेक सौताडेकर यांना पीएच.डी.पदवी प्रदान

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २४ जानेवारी :** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या मानव्य विद्या शाखा अंतर्गत लातूरचे साहित्यिक व इतिहास संशोधक विवेक सयाजीराव सौताडेकर यांनी हिंदी और मराठी उपन्यासों में छत्रपती शिव-ाजी : एक तुलनात्मक अध्ययन या विषयावर संशोधन पूर्ण करुन प्रबंध सादर केला.त्यामुळे विद्यापीठामार्फत अनेक तज्ज्ञांच्या उपस्थितीमध्ये त्यांची मौखिक परिक्षा घेऊन स्वा. रा.ती.म.विद्यापीठाने त्यांना पीएच.डी. पदवी प्रदान केली आहे.त्यांचे पीएच. डी.चे मार्गदर्शक म्हणून किल्लारी येथील शहीद भगतसिंग महाविद्यालयाचे हिंदी विभाग प्रमुख प्रोफेसर डॉ. हणमंत पवार यांनी काम पाहिले.



मौखिक परीक्षेसाठी बहिस्थ परी-क्षक म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर मार्फत प्रतिष्ठान महाविद्यालय, पैठण येथील हिंदी विभाग प्रमुख डॉ. अपर्णा पाटील,मौखिक परिक्षेच्या अध्यक्षस्थानी स्वा.रा.ती.म.नांदेड येथील भाषा विभागाचे संचालक डॉ.दिलीप चव्हाण, मार्गदर्शक प्रोफेसर डॉ. हणमंत पवार तसेच माजी अधिष्ठता प्राचार्य डॉ .नाग-ोराव कुंभार, डॉ .रणजीत जाधव,प्राचार्य डॉ.संग्राम मोरे, डॉ. ज्ञानदेव राऊत, डॉ.गणपतराव माने, डॉ.देवकांत गुरव, डॉ.ज्ञानेश्र्वर देशमुख, डॉ. रामभाऊ मुटकुळे, डॉ.नयन राजेमाने ,प्रा.जयश्री भताने,आदी मान्यवर उपस्थित होते.

# केशवराजमध्ये बोस-ठाकरे जयंती साजरी



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २४ जानेवारी :** येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयात नेताजी सुभाषचंद्र बोस व हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी मंचावर प्रमुख वक्ते विद्यालयातील इतिहास विषयाचे तज्ञ शिक्षक प्रल्हाद माले, पर्यवेक्षक राजश्री कुलकर्णी, इंदू ठाकूर, धनंजय कुलकर्णी, अभ्यासपूरक मंडळ प्रमुख रेणुका गिरी यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजनाने करण्यात आली.

याप्रसंगी प्रमुख वक्ते प्रल्हाद माले यांनी महाराष्ट्राची अस्मिता जपणारे, महाराष्ट्रातील लोकांची वैचारिक जडणघडण करणारे, शिवसेना या राजकीय पक्षा-चे संस्थापक बाळासाहेब ठाकरे यांच्या जीवन कार्याचा परिचय करून दिला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रम प्रमुख प्रयागराज गरुड यांनी केले. याप्रसंगी आठवी ते दहावी विभागातील सर्व शिक्षक व विद्यार्थी यांची उपस्थिती होती.

# विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय रुग्णालयाचा बाह्यरुग्ण विभाग २६ जानेवारी रोजी बंद राहणार


**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २४ जानेवारी :** प्रजासत्ताक दिनानिमित्त सार्वजनिक सुट्टी असल्याने विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय रुग्णालयातील बाह्यरुग्ण विभाग सोमवार, २६ जानेवारी २०२६ रोजी बंद राहील. तसेच मंगळवार, २७ जानेव-ारी २०२६ पासून बाह्यरुग्ण विभाग (ओ.पी.डी.) नियमित वेळेप्रमाणे सुरु रा-हील, असे विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. सचिन जाधव यांनी कळविले आहे. तसेच रुग्णालयाची आपत्कालीन सेवा २४ तास सुरु राहील.

# संतुलित जीवनशैली मानसिक आरोग्यासाठी उपयुक्त : डॉ. आनंद रेड्डी यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २४ जानेवारी :** आजच्या धकाधकीच्या जीवनात मानसिक आरोग्याकडे दुर्लक्ष होत असून तणाव, चिंता व नैराश्य यांसारख्या समस्या वाढत आहेत. अशा परिस्थितीत संतुलित जीवनशैली अंगीकारणे मानसिक आरोग्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरते, असे प्रतिपादन मानसोपचार तज्ज्ञ तथा व्यक्तिमत्त्व विकास प्रशिक्षक डॉ. आनंद रेड्डी यांनी केले.



एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील कृत्रिम दंत रोपण विभागाच्या वतीने कृत्रिम दंत रोपण दिनानिमित्त आयोजित 'मानसिक आर-ोग्य व ताण व्यवस्थापन' या विषयावरील व्याख्यानात डॉ. आनंद रेड्डी बोलत होते. यावेळी उप प्राचार्य डॉ. यतीशकुमार जोशी, विभाग प्रमुख डॉ. सुषेन गांजरे, डॉ. भूषण बांगर, डॉ. शशी पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना डॉ. आनंद रेड्डी म्हणाले की, नियमित व्यायाम, योग व ध्यान यामुळे मन शांत राहते. दररोज किमान सात ते आठ तासांची पुरेशी झोप, संतुलित आहार, पाण्याचे योग्य सेवन, छंद जोप-ासणे, संगीत ऐकणे तसेच आवडत्या व्यक्तींसोबत वेळ घालवणे हे मानसिक आरोग्यासाठी महत्त्वाचे घटक आहेत. वेळेचे योग्य नियोजन, काम व वैयक्तिक आयुष्यात समतोल राखणे आणि सोशल मीडियापासून वेळोवेळी विश्रांती घेणे ही संतुलित जीवनशैली मानसिक आरोग्यास पोषक ठरते.सूत्रसंचालन डॉ. समर्थ रेवडकर, डॉ. वेदिका देशमुख, डॉ. श्रेयस मगर यांनी केले तर आभार डॉ. सुषेन गांजरे यांनी मानले. या कार्यक्रमास एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील विभाग प्रमुख डॉ. सिराज बादल, डॉ. अश्विनी बिरादार, डॉ. विजयालक्ष्मी माले, डॉ. प्रविण मरुरे, डॉ. राघवेंद्र मेत्री, डॉ. अमोल बडगीरे, व डॉ. शितल वाघ, डॉ. बालाजी मुंडे, डॉ. यो-गेश नागरगोजे, डॉ. प्रण-ोती चिंचनसुरे, डॉ. शारदा झाडके, डॉ. प्रतिक्षा सोमवंशी यांच्यासह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच बी.डी.एस. व एम.डी.एस. पदवी व पदव्युत्तर विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भाजपातर्फे पानगावातून सतीश आंबेकर यांची उमेदवारी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २४ जानेवारी :** पानगाव जिल्हा परिषद मतदार संघातील गावागावातून वाडीवस्तीतून ऋषिकेशदादा कराड यांच्या ना-वाला पसंती होती मात्र पक्षाच्या निर्णयानुसार त्यांना उमेदवारी देणे शक्य नसल्याने भाजपाच्या वतीने सतीश आंबेकर हे अधिकृत उमेदवार असतील तेंव्हा सर्वांनी जिद्दीने जोमाने काम करून बहूमताने विजयी करावे आणि पानगाव हा लोकनेते स्व. गोपिनाथराव मुंडे साहेब यांचा भाजपाचा बालेकिल्ला असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध करून दाखवावे असे आवाहन भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी केले.




पानगाव जिल्हा परिषद मतदार संघातील भारतीय जनता पार्टीच्या प्रमुख पदाधिकारी लोकप्रतिनिधीची बैठक भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत शनिवारी सकाळी लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात झाली याप्रसंगी माजी आमदार त्र्यंबकनाना भिसे, ज्येष्ठ मार्गदर्शक व्यंकटराव आनामे मामा यांच्यासह इतर अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत आमदार आणि खासदार यांच्या कुटुंबातील सदस्यांना उमेदवारी दिली जाणार नाही असा निर्णय भाजपाच्या केंद्रीय कार्यकारिणीच्या बैठकीत झाला असल्याचे सांगून आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, या निर्णयामुळे पानगाव जिल्हा परिषद मतदार संघातून ऋषिकेश कराड यांना उमेदवारी देण्यात यावी अशी मागणी गावागावातून वाडी वस्तीतून अनेकांनी मोठ्या प्रमाणात केली होती. पक्षाच्या निर्णयानुसार आणि आदेशान्वये ऋषिकेश कराड यांची उमेदवारी मागे घेण्यात येत असून सतीश आंबेकर यांना भाजपा-चे अधिकृत उमेदवार म्हणून जाहीर केले.

आमदार खासदार यांच्या कुटुंबातील सदस्यांना उमेदवारी नाही हा पक्षाचा निर्णय रमेशआप्पा कराड यांच्या पर्यंत मर्यादित नसून राज्यातील जवळपास चाळीस जागेसाठी बंधनकारक आहे. याबाबतीत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब आणि निवडणूक प्रमुख चंद्रशेखरजी बावनकुळे साहेब यांच्यासोबत माझी चर्चा झाली असल्याचे सांगून पानगाव जिल्हा परिषद मतदार संघातील भाजपाच्या सर्व लोकप्रतिनिधी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी आत्तापासून जिद्दी-ने जोमाने कामाला लागावे आणि पुन्हा एकदा पानगाव हा भाजपाचा बालेकिल्ला असल्याचे सिद्ध करावे असेही आ. कराड यांनी बोलून दाखवले.

# निळकंठेश्वर साखर कारखान्याने दिड लाखांचा टप्पा ओलांडला

**तभा वृत्तसेवा**
**औसा दि. २४ जानेवारी :** अनेक वर्षापासून बंद असलेल्या तालुक्यातील किल्लारी येथील श्री निळकंठेश्वर शेतकरी सहकारी साखर कारखान्याने चालू हंगामात दीड लाख मेट्रिक टनाचे गाळप करुन उद्दिष्ट यशस्वीपणे पूर्ण करून विक्रमी कामगिरी नोंदवली आहे. काटेकोर नियोजन, आधुनिक यंत्रसामग्रीचा प्रभावी वापर आणि शेतकरी व कारखाना प्रशासन यांच्यातील उत्तम समन्वय यामुळे हे उद्दिष्ट वेळेत साध्य झाले असून संपूर्ण परिसरातील शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.



कारखान्यात दररोज सरासरी २८०० ते २९०० मेट्रिक टन प्रति दिन इतक्या क्षमतेने अखंड गाळप सुरू आहे. विशेष म्हणजे यंदा साखर उताराही समाधानकारक आणि चांगला मिळत असल्याने कारखान्याच्या आर्थिक स्थितीला भक्कम आधार मिळाला आहे. आमदार अभिमन्यू पवार यांच्या सक्षम नेतृत्वाखाली कामगार, अधिकारी आणि संचालक मंडळ यांनी एकसंघपणे केलेल्या प्रयत्नांचे यश असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.ज्या शेतकऱ्यांचा ऊस अद्याप शिल्लक आहे त्यांनी कोणतीही चिंता करू नये. शेवटच्या शेतकऱ्याचा ऊस गाळप होईपर्यंत कारखाना पूर्ण क्षमतेने सुरू ठेवण्यात येणार आहे. या आश्वासनामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

निळकंठेश्वर साखर कारखाना परिसरातील शेतकऱ्यांचा खऱ्या अर्थाने आधारस्तंभ ठरत आहे. वेळेवर गाळप, चांगला उतारा आणि शेतकरी हिताला सर्वोच्च प्राधान्य देर्णाय़ा धोरणामुळे कारखान्याने आपली विश्वासार्हता पुन्हा एकदा सिद्ध केली आहे. आगामी काळातही शेतकरी, कामगार आणि व्यवस्थापन यांच्या सहकार्याने आणखी मोठी उद्दिष्टे गाठली जातील, असा ठाम विश्वास व्यक्त केला जात आहे.

# महाराष्ट्र महाविद्यालयात राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त विविध स्पर्धा संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि. २४ जानेवारी :** येथील महाराष्ट्र महाविद्यालय निलंगा राज्यशास्त्र,लोकप्रशासन व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त मतदार जनजागृतीच्या अनुषंगाने विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे उद्घाटन निलंगा तहसीलचे तहसीलदार प्रसाद कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के एन कदम, उप प्राचार्य डॉ.बी एस गायकवाड, प्रा. पी पी गायकवाड हे उपस्थित होते. महाविद्यालयामार्फत घेण्यात आलेल्या भितीपत्रक, घोषवाक्य, निबंध, रांगोळी, वकृत्व, वादविवाद स्पर्धेची पाहणी करून त्यांनी समाधान व्यक्त केले तसेच विद्यार्थ्यांना येणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांमध्ये मोठ्या प्रमाणात सहभागी होण्याचे आवाहन केले. या स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी लोकप्रशासन व राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ व्ही पी सांडूर प्रा बदनाळे एस एस, प्रा माने पौर्णिमा, प्रा सातपुते पूनम आदींनी प्रयत्न केले.

# अखिल भारतीय शिवा संघटनेच्या चाकूर तालुकाध्यक्षपदी सचिन शेटे तर तालुका संघटकपदी ज्ञानेश्वर सांगवे यांची निवड

**तभा वृत्तसेवा**
**चाकूर, दि. २४ जानेवारी :** अखिल भारतीय शिवा संघटनेच्या चाकूर तालुका पदाधिकाऱ्यांच्या निवडी ता.२२ जानेवारी रोजी शहरातील शिवकुमार सोनटक्के यांच्या माय मंदिर येथे ही निवड करण्यात आली.

यावेळी अखिल भारतीय शिवा संघटनेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष दत्ताभाऊ खंकरे,राष्ट्रीय सरचिटणीस उमाकांत शेटे,लातूर जिल्हा अध्यक्ष ड.विलास खिंडे, जिल्हाध्यक्ष चंद्रकांत कोरे, संपर्कप्रमुख सचिन मंगनाळे,धार्मिक आघाडी जिल्हा उपाध्यक्ष निळकंठ शिवणे सह विविध मान्यवर उपस्थित होते.सर्व उपस्थित मान्यवरांच्या वतीने अखिल भारतीय शिवा संघटनेच्या चाकूर तालुका कार्यकारिणीची निवड करण्यात आली.यामध्ये तालुका अध्यक्ष पदी सचिन शेटे,तालुका संघटक पदी ज्ञानेश्र्वर सांगवे,तालुका कमिटी सदस्यामध्ये शिवराज काळगे,संगम हवा, चंद्रकांत पाटील,श्रीराम धनशेट्टे,राजेश्र्वर पाटील, गणेश मोरगे आदींची निवड करण्यात आली.



यावेळी उपस्थित मान्यवरांकडून नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे सत्कार करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.तसेच सचिव शेटे व ज्ञानेश्र्वर सांगवे यांच्या निवडीबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे.

# कॉपी आढळल्यास परीक्षा केंदाचा परवाना होणार रद्द

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. २४ जानेवारी :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने इयत्ता दहावी व बारावीच्या परीक्षांदरम्यान, कॉपीमुक्तीसाठी प्रयत्न जारी ठेवले असून, लातूर विभागीय परीक्षा मंडळा अंतर्गत नांदेड, धाराशिव आणि लातूर जिल्ह्यातील दहावी, बारावीच्या बोर्ड परीक्षा घेतल्या जाणार आहेत. यावर्षीही परीक्षा केंद्रावर कॉपी आढळल्यास केंद्र रद्दची कारवाई होणार आहे.

गतवर्षी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शंभर दिवसांच्या कार्यक्रमात दहावी, बारावी बोर्ड परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात पार पडण्यासाठी ज्या केंद्रावर कॉपी आढळेल, ती परीक्षा केंद्र रद्द करण्याचे जाहीर केले होते. हा निर्णय यावर्षीच्या परीक्षेवेळी कायम ठेवला जाणार आहे. लातूर विभागीय परीक्षा मंडळाअंतर्गत येणाऱ्या नांदेड, धाराशिव व लातूर जिल्ह्यांतून इयत्ता दहावीची बोर्ड परीक्षा एक लाख ११ हजार २८७ विद्यार्थी देणार आहेत. ही दहावीची परीक्षा तीन जिल्ह्यांच्या ४१८ केंद्रांवर होणार आहे. इयत्ता बारावीची बोर्ड परीक्षा तीन जिल्ह्यांतून ९६ हजार ४९६ विद्यार्थी देणार आहेत. कॉपी करून विद्यार्थी पार करणाऱ्या रॅकेटला यामुळे पायबंद बसणार आहे. दहावी, बारावी बोर्ड परीक्षेवेळी होणारा कॉपी प्रकार थांबायचे नाव घेत नसल्याने राज्य सरकारने आणखी एक फंडा आणला, तो म्हणजे लातूर विभागीय परीक्षा मंडळाने दहावी (केंद्र ४१८) व बारा

# उड्डाणपुलावरुन पडून एकाचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. २४ जानेवारी :** लातूर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील उड्डाणपुलावरूनपडल्याने एका अनोळखी व्यक्तीचा मृत्यू झाल्याची घटना शुक्रवारी सकाळी घडली आहे. शुक्रवारी सकाळी दहाच्या सुमारास एका चाळीस वर्षीय व्यक्तीने उड्डाणपुलावरुन उडी घेत आत्महत्या केली.उंचावरुन खाली पडल्याने तो गंभीर जखमी झाला होता. डोक्याला, पायाला, छातीला मार लागला होता. चौकातील नागरिकांनी त्यास उपचारासाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात दाखल केले होते. मात्र, गंभीररित्या जखमी झाल्याने सदरील व्यक्तीचा उपचारासाठी दाखल होताच मृत्यू झाला. मयताची ओळख रात्री उशिरापर्यंत पटलेली नव्हती. शिवाजी नगर पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद झाली असून पो. हे. रामराव जाधव हे करीत आहेत.

# महाराष्ट्र महाविद्यालयात विद्यार्थिनी व्याख्यानमाला संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि. २४ जानेवारी :** सावित्रीबाई फुले आणि राजमाता जिजाऊ साहेब यांच्या जयंतीचे औचित्य साधून येथील महाराष्ट्र महाविद्यालयात विशेष विद्यार्थिनी व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. या व्याख्यानमालेचा विषय सावित्रीबाई फुले आणि राजमाता जिजाऊ: जीवनपट असा होता. यात २० विद्यार्थिनींनी सहभाग नोंदविला.

प्रत्येक विद्यार्थिनीने विषयाचा अनुषंगाने अभ्यास करून आपली मते मांडली, व दोन्ही महान व्यक्तिमत्त्वांच्या जीवन आणि कार्यावर प्रकाश टाकला. त्यांनी आजच्या काळातील त्यांच्या कार्याची प्रस्तुतता विषद करून त्यांच्याकडून तरुणींनी कोणती प्रेरणा घ्यायला हवी हे सांगितले. व्याख्यान सादर करणाऱ्या सर्वोत्कृष्ट व्याख्यात्या विद्यार्थिनीला या प्रसंगी सन्मानित करण्यात आले. यात गुणानुक्रमे प्रथम कु. प्रणिता तांबाळे, द्वितीय कु. सोमवंशी मोनिका आणि तृतीय कु. आलिया सुमय्या तर उत्तेजनार्थ कु. मुळे अंकिता यांनी स्थान पटकावले.

यावेळी विचारपिठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. एन. कदम, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. डी.एस.चौधरी, महिला सक्षमीकरण कक्षाच्या समन्वयक प्रा. मनीषा घोगरे आदी उपस्थित होते. याप्रसंगी डॉ.डी.एस.चौधरी यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

# गुरू तेगबहादूर यांच्या जीवन कार्याचा सर्वांनी बोध घ्यावा : ॲड. बेंडकुळे

**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि. २४ जानेवारी :** शीख धर्माचे ९ वे गुरू श्री गुरू तेगबहादुर यांनी आपल्या आयुष्यामध्ये अत्यंत महत्त्वाचे कार्य केले आहे. त्यांनी धर्मासाठी केलेले कार्य प्रचार, प्रसार व त्यांचे बलिदान याचा सर्वांनी बोध घ्यावा, असे मत अँड किशनराव बेंडकुळे यांनी व्यक्त केले.




श्री तेगबहादुर यांचे सन २०२५ हे ३५० वे शहिदी समागम शताब्दी वर्ष असल्याने शासनाच्या परिपत्रकानुसार हिंद-की-चादर श्री गुरू तेगबहादुर साहिबजी यांच्या ३५० वा शहिदी समागम शताब्दी वर्षा निमित्त त्यांचा गौरवशाली इतिहास सर्वांना माहिती व्हावा तसेच त्यांनी केलेला धर्मप्रचार, प्रसार व त्यांचे बलिदान याचे स्मरण होण्याकरिता त्यांच्या जीवन चरित्रावरील डॉक्युमेंट्री दाखविणे, वक्तृत्व स्पर्धा, गटचर्चा, जनजागृती, प्रभात फेरी, निबंध लेखण, चित्रकला, व्याख्यान अशा विविध स्पर्धा व कार्यक्रमांच्या आयोजन करण्यात येत आहे.

महात्मा गांधी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने प्रा डॉ प्रकाश देशमुख यांच्या व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष अँड किशनराव बेंडकुळे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये श्री गुरु तेगबहादूर यांच्या कार्यावर यथोचित प्रकाश टाकला व त्यांच्या कार्याचा बोध सर्वांनी घेतला पाहिजे असे मत व्यक्त केले. प्रकाश देशमुख यांनी गुरू तेगबहादूर यांच्या कार्याचा परिचय करून दिला. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. पी. पवार, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ बालाजी पाटील डॉ यादव सूर्यवंशी प्रा. प्रकाश डवरे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ बालाजी पाटील यांनी केले आभार नागेश पवार यांनी मानले.

# अरविंद सोनवणे यांचे निधन

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. २४ जानेवारी :** येथील कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती अरविंद माणिकराव सोनवणे (वय ८०) यांचे अल्पशा आजाराने शुक्रवारी (दि. २३) सकाळी ८.५० च्या सुमारास शहरातील एका खाजगी रूग्णालयात निधन झाले. त्यांच्यापश्र्चातदोनमुले,एकमुलगी,असापरिवारआहे. त्यांच्या पार्थिवावर शुक्रवारी सायंकाळी ५ वाजता मारवाडी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. अंत्यविधीस विविध क्षेत्रातील मंडळी उपस्थित होती. अरविंद सोनवणे ते २००५ दरम्यान, लातूर उच्चत्तम कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती होते. तसेच दयानंद शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष, वाले इंग्लिश स्कूलचे अध्यक्ष, व्यापारी धर्मशाळेचे अध्यक्ष, सिद्धेश्र्वर देवस्थानचे सदस्य, गोरक्षण संस्थेचे सदस्य, अडत व्यापारी असोसिएशनचे माजी अध्यक्ष, राष्ट्रीय गुमास्ता मंडळाचे सल्लागार म्हणून त्यांनी काम पाहिले. राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात त्यांचा सातत्याने वावर होता. वेगळे, नवीन काही तरी करण्याचा त्यांचा प्रयत्न असायचा. त्यांच्या जाण्याने हळहळ व्यक्त होत आहे.

# हरिकिशन लोया यांचे निधन

**तभा वृत्तसेवा**
**चाकूर, दि. २४ जानेवारी :** चाकूर येथील प्रतिष्ठित व्यापारी हरिकिशन मोतीलाल लोया यांचे वयाच्या ८० व्या वर्षी लातूर येथील खाजगी रूग्णालयात गुरूवारी दिनाक २२ जानेवारी रोजी उपचारा दरम्यान दुखद निधन झाले.त्यांच्यावर चाकूर येथील मारवाडी स्मशानभुमी येथे शुक्रवारी दिनांक २३ जानेवारी रोजी दुपारी १२.३० वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्र्चात पत्नी शंकुतलाबाई,तीन मुले,दोन मुली,सुना,नातवंडे असा मोठा परीवार आहे.ते पत्रकार ओम लोया यांचे वडील होते. अंत्यसंस्कारास चाकूर शहर आणि परिसरातील नागरिक,नातेवाईक,मित्रमंडळी उपस्थित होते.



# रेणापूरच्या आश्रम शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**रेणापूर, दि. २४ जानेवारी :** येथील रूपचंद नगर मधील प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक आश्रम शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न झाले. विद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलन व विविध गुणदर्शन कार्यक्रमांचे उद्घाटन रेणापूरचे पोलीस निरीक्षक सुधाकर देडे यांच्या हस्ते सरस्वती पूजन व स्वर्गीय कै. मिठाराम रूपचंद राठोड यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले.



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या सचिव श्रीमती उषाताई मिठाराम राठोड या होत्या. कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना पोलीस निरीक्षक देडे यांनी विद्यार्थ्यांना कौशल्यपूर्ण ,कलागुण विकसित पूर्ण शिक्षण मिळणे महत्वाचे असल्याचे सांगितले. या आश्रमशाळेच्या माध्यमातून रेणापूरच्या विद्यार्थ्यांना अत्यंत दर्जेदार शिक्षण आणि शिक्षण विषयक सुविधा पुरविल्या जात असल्याबद्दल समाधान व्यक्त केले. उच्च माध्यमिक शाळेचे प्राचार्य प्रदीप राठोड यांनी उपस्थित पालकांशी संवाद साधताना विद्यालयाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच त्यांच्या कलागुणांना विकसित करण्यासही प्राधान्य दिले जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाची सुरुवात श्रीगणेश वंदनाच्या नृत्याने करण्यात आली. कार्यक्रमात शालेय विद्यार्थांनी विविध हिंदी, मराठी,भारुड, देशभक्ती गाण्यावर नृत्य सादर केले व त्यानंतर नाटकाचे सादरीकरण केले. विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांनी उपस्थितांची मने जिंकली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सांस्कृतिक विभाग प्रमुख राठोड बी. एन. सौ. सुरेखा मॅडम, सौ. चव्हाण मॅडम, तुरुप मॅडम, बोने, मालुसरे,चव्हाण, कासले, वडवले, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राथमिकचे मुख्याध्यापक लव्हेकर यांनी केले तर आभार प्रा. खाडप यांनी मानले. यावेळी सर्व विद्यार्थी - पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अहमदपुरात मन्मथ स्वामी जन्मोत्सव सोहळा साजरा

**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि. २४ जानेवारी :** वीरशैवांचे महान संत शिरोमणी मन्मथ स्वामी महाराज यांचा जन्मोत्सव सोहळा वीरमठ संस्थांन अहमदपूर येथे उत्साहात साजरा करण्यात आला.

प्रति वर्षाप्रमाणे यावर्षीही मन्मथ स्वामी यांच्या जयंती उत्सवानिमित्त शिभप संतोषी मिटकरी अंधोरीकर यांचे कीर्तनाचा कार्यक्रम झाला. यावेळी आचार्य गुरुराज स्वामी महाराज आशिर्वचनात म्हणाले, मन्मथ माऊली यांनी वीरशैव लिंगायत धर्मात कीर्तन, प्रवचन, करत परंपरेचे पुनर्जीवन केले. १६ व्या शतकात त्यांनी केलेले महान कार्य पुढे विसाव्या शतकात राष्ट्रसंत डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज यांनी पुढे चालवले. या महान विभूतींचा जन्मोत्सव आपण सर्वांनी साजरा केलात, त्यांचे विचार आचार आत्मसात करणे गरजेचे आहे. तसेच परमरहस्य ग्रंथाचे पठण करुन त्याचे आचरण करणे तितकेच गरजेचे असल्याचेही त्यांनी सांगितले.

# 'जागृती' च्या ७,२१,००१ साखर ५० किलोचे पोत्याचे पूजन माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या हस्ते पूजन

**तभा वृत्तसेवा**
**वलांडी, दि. २४ जानेवारी :** राज्यातील खाजगी साखर कारखान दारीत नावलौकिक असलेल्या देवणी तालुक्यातील तळेगाव येथील जागृती शुगर अँड अलाईड इंडस्ट्रिजच्या २०२५-२६ च्या चालू गळीत हंगामात ३ लाख ६३ हजार ४६० मे.टन ऊसाचे गाळप करुन ११.५७ उताऱ्यासह १ कोटी ६ लाख ८४ हजार ८०० युनिट विज निर्यात केली आहे. उत्पादीत केलेल्या ७ लाख २१ हजार १ साखर पोत्याचे पूजन राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी तथा साखर काखान्याचे संस्थापक दिलीपराव देशमुख यांच्या हस्ते शुक्रवारी करण्यात आले.

यावेळी जागृती शुगरचे उपाध्यक्ष लक्ष्मणराव मोरे, राम भंडारे, धनाजी कोटे, जनरल मॅनेजर गणेश येवले, मुख्य शेती अधिकारी रामानंद कदम, मुख्य अभियंता अतुल दरेकर, आसवणी प्रमुख विलास पाटील, फायनान्स अधिकारी ए.व्ही.सुर्यवंशी, उपमुख्य अभियंता अक्षय सुर्यवंशी, ऊस पुरवठा अधिकारी लक्ष्मण बिरादार, चिफ अकौटंट सर्जेराव पाटील जागृती शुगरचे विविध खाते प्रमुख अधिकारी कर्मचारी आदी उपस्थित होते.




# मांजरा महिला अर्बन को -ऑप. सोसायटीत हळदी -कुंकू समारंभ

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. २४ जानेवारी :** मकर संक्रांती निमित्त मांजरा महिला अर्बन कॉ-ऑपरेटिव्ह सोसायटीच्या कार्यालयात २४ जानेवारी रोजी महिलांसाठी हळदी -कुंकवाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. या सोसायटीच्या चेअरमन तथा सामाजिक कार्यकर्त्यां, उद्योजक प्रियांका सुरवसे आणि त्यांच्या महिला कर्मचाऱ्यांनी सर्व महिलांचे कुंकू लावून आणि वाणाची स्नेहभेट देऊन स्वागत केले. त्यानंतर जमलेल्या प्रत्येक महिलांनी उखाणे घेतले. उखान्याचा कार्यक्रम चांगलाच रंगला. उपस्थित महिलांसाठी स्वादिष्ट अल्पोपहाराची सोय करण्यात आली होती. हळदी कुंकूवा निमित्त मांजरा महिला क्रेडिट सोसायटीतर्फे १३ महिन्याच्या ठेवीवर १२ टक्के व्याजदर देण्यात येणार आहे. या संधीचा महिलांनी लाभ घेण्याचे आवाहन चेअरमन प्रियांका सुरवसे यांनी यावेळी केले. अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात हा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सोसायटीच्या चेअरमन प्रियांका सुरवसे, सचिव रोहिणी धायगुडे, व्यवस्थापक आदर्श कांबळे आणि कर्मचारी, अभिजीत कांबळे, सोहेल पठाण, सुरज उदारे, दुर्गेश डूमने, ऐश्र्वर्या पाटील, धनश्री अडसूळ, अनिता गोडपटले व इतर कर्मचारी महिलांनी परिश्रम घेतले.

# धाराशिव जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

## शेतकऱ्याला धमकी, बोरवेलचे नुकसान; गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.२५ जानेवारी -**

भुम येथील शेतकरी लहु तुकाराम कांबळे (वय ४०, रा. बावी, ता. भुम) यांच्यावर आरोपी अंकुश बाबा कांबळे व हरी अंकुश कांबळे (रा. बावी, ता. भुम) यांनी गंभीर प्रकार घडवून आणल्याची तक्रार नोंदली आहे.

पोलीस चौकशीतून मिळालेल्या माहितीनुसार, या वादाचे कारण बोराचे झाड व बोअरवेल पाणीसंबंधी मतभेद असल्याचे दिसून आले.

आरोपींनी शेतकऱ्यावर शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप फिर्यादी लहु कांबळे यांनी केला आहे.

यावेळी आरोपींनी शेतगट क्र.९२ मधील बोरवेलचे वायर व पाईप जाळून अंदाजे १,२०,००० रुपये हून अधिक मूल्याचे नुकसान केले. या घटनांमुळे शेतकऱ्यांना मोठा आर्थिक आणि मानसिक त्रास सहन करावा लागला.

भुम पोलीस ठाण्यात नोंदलेल्या प्राथमिक तक्रारीवरून भा.दं.वि. कलम ३२६ (एफ), धमकी, ३५२ शारीरिक त्रास, ३५१(३) मारहाणी तसेच ३ (५) - मालमत्तेची हानी या कलमांन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

## पाच महिन्यांत नळदुर्गकरांना दररोज पाणीपुरवठा : नगराध्यक्ष धरणे

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२५ जानेवारी -**

येत्या पाच महिन्यांत नळदुर्ग शहरवासीयांना दररोज पाणीपुरवठा करण्यात येईल, असा विश्वास नगराध्यक्ष बसवराज धरणे यांनी व्यक्त केला. नळदुर्ग शहर भोई समाजाच्या वतीने आयोजित सत्कार समारंभात ते बोलत होते.



दि.२२ जानेवारी रोजी श्री गणेश जयंतीचे औचित्य साधून नळदुर्ग शहर भोई समाजाच्या वतीने लोकनियुक्त नगराध्यक्ष, सर्व नगरसेवक, पत्रकार तसेच समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. प्रारंभी नगराध्यक्ष बसवराज धरणे व सर्व नगरसेवकांच्या हस्ते श्री गणपती देवाची पूजा करण्यात आली.

या कार्यक्रमात नगराध्यक्ष बसवराज धरणे, उपनगराध्यक्ष नय्यर जहागीरदार, भाजपचे गटनेते दत्तात्रय दासकर, उपगटनेते तानाजी जाधव, काँग्रेसचे गटनेते मारुती खारवे, उपगटनेते आकाश कुलकर्णी, नगरसेवक पांडुरंग पुदाले, सुधीर पोतदार, इमाम शेख, रीजवान काझी, प्रविण गायकवाड, नगरसेविका मिनाक्षी काळे, छमाबाई राठोड, राणी सुरवसे, कमलबाई गायकवाड, लास येडगे, अमर भाळे, किशोर नळदुर्गकर, स्वप्नील काळे यांचा शहर भोई समाजाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

याचप्रसंगी हिंदवी संतोष पुदाले, ऋग्वेद भानुदास पुदाले, सई स्वप्नील डुकरे व साधना जितेंद्र गवळी या गुणवंत विद्यार्थ्यांचा त्यांच्या पालकांसह सत्कार करून गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शहर भोई समाजाचे अध्यक्ष सुनील उकंडे यांनी केले.

सूत्रसंचालन प्रा. संतोष पवार यांनी केले तर आभार वैशाली उकंडे यांनी मानले.

हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शहर भोई समाजाच्या सर्व युवा कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास भोई समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जिल्हास्तरीय आश्रम शाळा क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२५ जानेवारी -**

सुदृढ आरोग्यासाठी मैदानी खेळ अत्यंत महत्त्वाचे असून क्रीडा स्पर्धांचे योगदान मोठे आहे, असे प्रतिपादन इतर मागास बहुजन कल्याण विभाग, धाराशिव येथील सहाय्यक संचालक अमोल ताकभाते यांनी केले. शिंगोली (ता. जि. धाराशिव) येथील आदर्श आश्रम शाळेच्या प्रांगणात १९ ते २१ जानेवारीदरम्यान सुरू असलेल्या जिल्हास्तरीय आश्रम शाळा क्रीडा स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी प्रादेशिक उपसंचालक तेजस माळवदकर, निरीक्षक युवराज भोसले, शिक्षण विस्तार अधिकारी प्रकाश पारवे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. स्पर्धेदरम्यान नियमबाह्य प्रकार आढळल्यास संबंधित शाळांवर दहा हजार रुपयांचा दंड आकारण्यात येईल, असा इशाराही ताकभाते यांनी दिला.

तीन दिवस चालणाऱ्या या स्पर्धेत प्राथमिक १९, माध्यमिक १२ व उच्च माध्यमिक ७ अशा एकूण ३८ आश्रम शाळांनी सहभाग नोंदवला आहे.

## निवडणुकीनंतर स्वच्छतेला पहिले प्राधान्य; स्वच्छ शहर, सुंदर शहर प्रत्यक्ष कृतीत : नगराध्यक्षा सुनंदा कापसे

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२५ जानेवारी -**

निवडणुकीनंतर शहराच्या विकासाला गती देताना नगरपरिषदेने सर्वप्रथम स्वच्छतेला प्राधान्य दिले असून, नगराध्यक्षा सुनंदा कापसे यांनी स्वच्छ शहर, सुंदर शहर ही घोषणा केवळ निवडणुकीपुरती मर्यादित न ठेवता ती प्रत्यक्ष कृतीत उतरवण्याचा निर्धार केला आहे.

नगराध्यक्षा कापसे या स्वतः शहरातील प्रत्येक प्रभागातील स्वच्छतेकडे जातीने लक्ष देत आहेत. ज्या भागांमध्ये यापूर्वी घंटागाडी जात नव्हती, त्या ठिकाणी आता नियमितपणे कचरा संकलन सुरू झाल्याने महिलांचा कचरा कुठे टाकायचा हा प्रश्न मार्गी लागला आहे. दररोज सकाळी शहरातील मुख्य रस्त्यांवरील कचरा व घाण साफ केली जात असून, दीर्घकाळापासून बकाल झालेल्या शहराकडे विशेष लक्ष दिले जात आहे.

रोगराई पसरू नये, यासाठी परिसर स्वच्छ ठेवण्यावर भर देण्यात येत असून, स्वच्छतेप्रमाणेच पाणीपुरवठा व विद्युत या मूलभूत सुविधांकडेही विशेष लक्ष दिले जाणार आहे. हे प्रश्न युद्धपातळीवर सोडवले जातील, असे नगराध्यक्षा सुनंदा कापसे यांनी स्पष्ट केले.

शहरात वर्षानुवर्षे साचलेले कचऱ्याचे ढिगारे जेसीबीच्या सहाय्याने हटवण्याच्या कामाची सुरुवात करण्यात आली आहे. या कामावेळी नगराध्यक्षा स्वतः उपस्थित राहून स्वच्छता ठेकेदार व जेसीबी चालकांना स्पष्ट सूचना देत आहेत. ज्या प्रामाणिकपणे आणि काळजीपूर्वक आपण आपल्या घराची स्वच्छता करतो, त्याच जबाबदारीने शहराची स्वच्छता केली जाईल. स्वच्छतेच्या बाबतीत कोणतीही तडजोड खपवून घेतली जाणार नाही, असा इशाराही त्यांनी स्वच्छता विभागाला दिला आहे.

स्वच्छ, सुंदर आणि आरोग्यदायी कळंब घडवण्यासाठी नगरपरिषद कटिबद्ध असून, या उपक्रमात नागरिकांनी सक्रिय सहकार्य करावे, असे आवाहन नगराध्यक्षा सुनंदाकापसे यांनी केले आहे.

## शिक्षकांना स्वायत्तता, सृजनशीलता व प्रतिष्ठा मिळाली तरच देशाचा विकास : शेषाद्री अण्णा डांगे

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२५ जानेवारी -**

शिक्षक हा शिक्षण क्षेत्राचा कणा असून त्यांनी आपल्या मूळ ध्येयाची सुस्पष्ट जाणीव ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. संस्था व शासनाच्या दृष्टिकोनाची अंमलबजावणी शिक्षकच करीत असतो.

समाज व देशाला पुढे घेऊन जायचे असेल तर शिक्षकांना स्वायत्तता, सृजनशीलता आणि प्रतिष्ठा मिळालीच पाहिजे. तरच देशाचा खऱ्या अर्थाने विकास होऊ शकतो, असे प्रतिपादन शेषाद्री अण्णा डांगे यांनी केले.



श्री राष्ट्रीय शिक्षण प्रसारक संस्था संचलित स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिर व महात्मा बसवेश्वर माध्यमिक विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित बौद्धिक व्याख्यानात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष मल्लिकार्जुन आप्पा दंडगे होते.

यावेळी मार्गदर्शन करताना शेषाद्री अण्णा डांगे म्हणाले की, शिक्षण संस्था ही पैसे कमावण्याचे साधन नसून उदात्त हेतूने सुरू केलेले कार्य आहे. मात्र संकुचित वृत्ती ठेवली गेली तर प्रगती खालावते. याप्रसंगी डॉ. चंद्रकांत महाजन यांनीही विचार मांडताना सांगितले की, ममत्वाची भावना निर्माण झाली की प्रगती साधता येते. आपल्या कार्याबद्दल ओढ निर्माण झाली पाहिजे.

विद्यार्थ्यांच्या मनात आपले विचार व भाव उतरवणारा हा गुरु असतो.

कार्यक्रमास डॉ. अजित नायगावकर, कार्यवाह डॉ. कपिल महाजन, कोषाध्यक्ष प्रमोद कुलकर्णी, प्रभाकर कुलकर्णी, रजनी महाजन, विजयकुमार पाटील, अशोक जोशी, उमाकांत कुलकर्णी, प्रकाश शास्त्री, अविनाश देशमुख, विजया जोशी, गीता ताई शास्त्री, डॉ. शुभांगिनी महाजन, प्रवीण अनुदुरकर, राजाभाऊ देशट्टी, मुख्याध्यापिका सविता लोहार, मुख्याध्यापक नेताजी गायकवाड तसेच दोन्ही शाळांतील शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यवाह डॉ. कपिल महाजन यांनी केले. सूत्रसंचालन संजय कोथळीकर यांनी केले.

## रामकृष्ण परमहंस महाविद्यालयात ग्राहक संरक्षण कायदा विषयावर कार्यशाळा



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२५ जानेवारी -**

ग्राहक संरक्षण कायद्याबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागृती निर्माण व्हावी, या उद्देशाने दि.२३ जानेवारी रोजी रामकृष्ण परमहंस महाविद्यालय, धाराशिव येथे वाणिज्य विभागाच्या वतीने ग्राहक संरक्षण कायदा-२०१९ या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेत मेधा कुलकर्णी यांनी ग्राहक संरक्षण कायदा आणि विद्यार्थी या विषयावर मार्गदर्शन करताना कायद्याची मूलभूत माहिती, ग्राहकांचे हक्क व कर्तव्ये याबाबत सविस्तर माहिती दिली. त्यानंतर पूनम तापडिया यांनी ग्राहक पंचायतीची स्थापना व उद्दिष्टे या विषयावर मार्गदर्शन केले. विद्यार्थीदशेतच कायद्याची माहिती व जाणीव निर्माण झाली पाहिजे, असे प्रतिपादन त्यांनी केले.

शरद वडगावकर यांनी ग्राहक तक्रार निवारण यंत्रणा या विषयावर मार्गदर्शन करताना तक्रार दाखल करण्याची प्रक्रिया, विविध आयोगांची कार्यपद्धती याविषयी माहिती दिली. या एकदिवसीय कार्यशाळेतून मिळालेले ग्राहक संरक्षण कायद्याचे ज्ञान विद्यार्थी प्रत्यक्ष व्यवहारात वापरतील, अशी अपेक्षा अध्यक्षीय मनोगतात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संदीप देशमुख यांनी व्यक्त केली. कार्यशाळेचे प्रास्ताविक प्रा. बालाजी नगरे यांनी केले. सूत्रसंचालन सुप्रिया शेटे यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. अवधूत नवले यांनी मानले.

या कार्यशाळेस डॉ. अमर निंबाळकर, डॉ. दत्ता साखरे, प्रा. माधव उगीले यांच्यासह शिक्षकवृंद उपस्थित होते. वरिष्ठ महाविद्यालयातील वाणिज्य शाखेचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मलकापूर येथे शिवसेना (उबाठा) ला मोठा धक्का

### अनेक कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये जाहीर प्रवेश

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.२५ जानेवारी -**

कळंब तालुक्यातील मलकापूर येथे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाला मोठा धक्का बसला असून, पक्षातील शाखाप्रमुखांसह अनेक कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला आहे. हा प्रवेश भाजपचे युवा नेते मल्हार पाटील यांच्या हस्ते पार पडला.



येरमाळा जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणात समाविष्ट असलेल्या मलकापूर येथे रविवार, दि. २५ रोजी आयोजित कार्यक्रमात शिवसेना (उबाठा) पक्षाचे अनेक तरुण कार्यकर्ते भाजपमध्ये दाखल झाले. भाजपच्या विकासाभिमुख धोरणांवर तसेच आमदार राणाजगजितसिंह पाटील व विकास बारकुल यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून पक्ष संघटन मजबूत करण्याच्या उद्देशाने हा प्रवेश झाल्याची माहिती दत्तात्रय लोमटे यांनी दिली.

यावेळी भाजपचे युवा नेते मल्हार पाटील यांनी अनिल लोमटे, किरण लोमटे, स्वप्नील घोळवे, अभिषेक उमेश लोमटे, पाशाभाई सय्यद, सौरभ लोमटे, विकास लोमटे, तृनाल काकडे, सैलानी शेख, निलेश सोनवणे, वैभव काकडे, अमोल ओव्हाळ, नामदेव जमाले, भवन लोमटे, आकाश काकडे, विजय वणवे, उमेश लोमटे, अभिषेक लोमटे, रणजीत लोमटे, संदीप लोमटे, अमोल वणवे, मोहित जगताप, संतोष लोमटे, अजय लेकुरवाळे व बापू काकडे आदी कार्यकर्त्यांचे स्वागत करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

भारतीय जनता पक्ष हा सर्वसामान्यांच्या विकासासाठी कटिबद्ध आहे. गावपातळीवर संघटन अधिक मजबूत करण्यासाठी तरुणांनी पुढे येणे गरजेचे आहे, असे आवाहन मल्हार पाटील यांनी केले.

कार्यक्रमास भाजपचे सतिष लोमटे, धर्मराज लोमटे, फुलचंद लोमटे, राजेंद्र लोमटे, तात्याराव काकडे, मदन बारकुल, रामकिसन कोकाटे, दयानंद खुने, विठ्ठल मुंढे, शिवाजी बाराते, बप्पा बारकुल यांच्यासह कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते. सूत्रसंचालन गणेश बारकुल यांनी केले.

## इंदिरा गांधी विद्यालयात माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२५ जानेवारी -**

तुळजापूर तालुक्यातील गंधोरा येथील इंदिरा गांधी विद्यालयातील माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा शनिवार, दि.२४ जानेवारी रोजी विद्यालयाच्या प्रांगणात मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

सन १९९८-१९९९ या शैक्षणिक वर्षातील विद्यार्थी तब्बल २८ वर्षांनंतर एकत्र आले होते. यावेळी सर्व माजी विद्यार्थ्यांनी शाळेतील जुन्या आठवणींना उजाळा देत आपली सध्याची वाटचाल, अनुभव व जीवनप्रवास यावर मनमोकळा संवाद साधला.

मेळाव्यात माजी विद्यार्थ्यांसाठी संगीत खुर्ची, प्रश्नमंजुषा तसेच विविध मैदानी खेळांचे आयोजन करण्यात आले होते. तब्बल २८ वर्षांनंतर शालेय वातावरणात खेळांचा आनंद घेत माजी विद्यार्थ्यांनी कार्यक्रमात उत्साह व चैतन्य निर्माण केले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक राम बनसोडे हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्रभाकर भोसले, धनाजी जांभळे, कोंडिबा भोसले, संतोष मुसळे, शिक्षक श्रीनिवास भोसले, महादेव तुप्पे, रविंद्र भोसले, उमाकांत मोरे, बलभीम कांबळे, नंदिनी आलुरे, गोदावरी डांगे, यशवंत कोरे, योगिता बाळुरकर, उत्तम बनजगोळे, गुलाब राठोड, सगुणा राठोड यांची उपस्थिती होती.

यावेळी माजी विद्यार्थी रमेश जांभळे, उमेश भोसले, नागनाथ कुंभार, सिराज लकडवाले, महादेव एकंडे, प्रतिभा भोसले, रहिना मुल्ला, सावित्री डांगे, महादेवी भोसले, आशा भोसले, लक्ष्मी राठोड, पार्वती राठोड, वंदना देसाई, मैना देसाई, अर्चना भोसले, सरोजा भोसले, अमरजा जांभळे, सोनिया कुलकर्णी, शामल भोसले, अर्चना खबुले आदी माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक रमेश जांभळे यांनी केले. सूत्रसंचालन शिक्षक श्रीनिवास भोसले यांनी केले तर आभार प्रतिभा भोसले यांनी मानले.

## बेकायदेशीर वाहतुकीत गोवंशीय गायी जप्त

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२५ जानेवारी -**

दि.२३ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ३.२० वाजता एनएच ५२ रोडवरील आळणी पाटी जवळ धाराशिव ग्रामीण पोलीसांना एका बेकायदेशीर वाहतूक प्रकरणाची माहिती मिळाली.

पोलीसांनी तपासून पाहिले असता पिकअप क्र. एमएच ११ बीएल ९८४० मध्ये गोवंशीय जातीच्या ५ जर्शी गायी वाहून नेल्या जात असल्याचे आढळले. या जनावरांची एकूण किंमत अंदाजे १ लाख ६५ हजार रूपये आहे. आरोपी वाहन चालकाने जनावरांना चारा-पाणी देण्याची व्यवस्था न करता, निर्दयतेने कत्तलीसाठी वाहतूक केली होती.

या प्रकरणावरून पोलीसांनी सरकारतर्फे नमूद व्यक्तींविरुद्ध प्राण्यास क्रुरतेने वागण्यास प्रतिबंध अधिनियम अन्वये गुन्हा नोंदवला असून, पुढील तपास सुरू आहे. कोणतीही बेकायदेशीर वाहतूक आढळल्यास त्वरित पोलीस ठाण्यात माहिती द्यावी, असे आवाहन पोलीसांनी केले आहे.

## नळदुर्ग येथे महिलांसाठी हळदी-कुंकू व 'होम मिनिस्टर' कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२५ जानेवारी -**

मकर संक्रांतीच्या सणाचे औचित्य साधून नळदुर्गचे नगराध्यक्ष बसवराज धरणे यांच्या वतीने शहरातील महिलांसाठी हळदी-कुंकू कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास शहरातील एक हजारांहून अधिक महिलांनी मोठ्या उत्साहात उपस्थिती लावली.

या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे महिलांसाठी आयोजित करण्यात आलेला लोकप्रिय 'होम मिनिस्टर' कार्यक्रम होय. हा उपक्रम प्रा. संतोष पवार यांच्या संकल्पनेतून साकार झाला. कार्यक्रमादरम्यान महिलांनी उत्स्फूर्त सहभाग घेत भरभरून आनंद लुटला. संपूर्ण कार्यक्रम अतिशय बहारदार ठरला असून अनेकांनी या उपक्रमाचे कौतुक केले.



या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा परिषदेच्या माजी उपाध्यक्षा अर्चनाताई पाटील, डॉ. साक्षी मल्हार पाटील यांची उपस्थिती होती. याशिवाय नगराध्यक्ष बसवराज धरणे, नगरसेविका सुमनबाई ठाकुर, मिनाक्षी काळे, राणी सुरवसे, साक्षी बनसोडे, छमाबाई राठोड, कमलबाई कांबळे, कविता पुदाले आदी मान्यवर उपस्थित होते.

आयोजित 'होम मिनिस्टर' स्पर्धेमध्ये पाच महिला विजयी ठरल्या. यामध्ये प्रथम क्रमांक पूजा सुरवसे यांनी, तर द्वितीय क्रमांक अंकिता डुकरे यांनी पटकावला. तसेच ज्योती सुरवसे, प्रीती जाधव आणि स्नेहा कांबळे या महिलाही विजयी ठरल्या.

विजेत्या महिलांना जिल्हा परिषदेच्या माजी उपाध्यक्षा अर्चनाताई पाटील यांच्या हस्ते बक्षिसे देऊन गौरविण्यात आले.

या कार्यक्रमास नगरसेवक दत्तात्रय दासकर, शशिकांत पुदाले, भाजप नेते सुशांत भुमकर, भाजयुमोचे जिल्हा सरचिटणीस श्रमिक पोतदार, शहर भाजपचे माजी अध्यक्ष पद्माकर घोडके, धीमाजी घुगे, मुरमे, माने, अनिल पाटील, बलदेवसिंग ठाकुर, ज्योती बचाटे, बंडप्पा कसेकर, संदीप गायकवाड यांच्यासह धरणे परिवारातील सर्व महिला व हजारो महिला उपस्थित होत्या.

CMYK

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## विवाहीतेस आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी चौघांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२५ जानेवारी -**
दि २१ जानेवारी २०२६ रोजी मयत मुस्कान उर्फ पायल सुशील भालेराव (वय १९ वर्षे, रा. देवसिंगा, तुळजापूर) यांनी आपल्या राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. याप्रकरणी सासरच्या चौघांविरूद्ध तुळजापूर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस चौकशीतून मिळालेल्या माहितीनुसार, मयत मुस्कानवर आरोपी सुशील हनुमंत भालेराव (पति), हनुमंत भालेराव (सासरे), जयश्री भालेराव (सासु), स्वप्नील हनुमंत भालेराव (दिर), पंचशीला स्वप्नील भालेराव व मयुरी हनुमंत भालेराव यांनी किरकोळ कारणावरून शिवीगाळ, लाथाबुक्यांनी मारहाण आणि शारीरिक व मानसिक त्रास दिल्याचा आरोप आहे.




याबाबत फिर्यादी रहेमान मोहम्मद शेख (वय ३१, रा. जयभवानी चौक, ईस्लामपूरा, धारुर) यांनी दि. २४ जानेवारी रोजी तुळजापूर पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली.

पोलिसांनी भा.न्या. सं. कलम १०८ व ३(५) अन्वये गुन्हा नोंदविला असून, पुढील तपास सुरू आहे.



### संक्षिप्त वृत्त...



### मंगरुळ येथील जि.प. शाळेत मातापालक हळदी-कुंकू समारंभ संपन्न

**मंगरूळ, दि.२५ जानेवारी -**
तुळजापूर तालुक्यातील मंगरुळ येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत मकर संक्रांतीचे औचित्य साधून मातापालक हळदी-कुंकू समारंभाचे आयोजन शनिवार, दि.२४ जानेवारी रोजी करण्यात आले होते. शाळा, शिक्षक, विद्यार्थी व माता-पालक यांच्यात सुसंवाद व समन्वय वाढावा, पालकांचा मुलांच्या शिक्षणात सक्रिय सहभाग व योगदान अधोरेखित व्हावे, तसेच शिक्षण, आरोग्य व सामाजिक जाणीवेबाबत जनजागृती निर्माण व्हावी या उद्देशाने शाळेच्या वतीने या समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. सहभागी महिलांना प्रोत्साहनपर बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमास सुवर्णा लबडे, शहनाज शेख, स्वाती जेटीथोर, स्वाती गरगडे, प्रमिला कानडे, शामल जाधव, मोनिका जांभळे, अश्विनी जांभळे, नीता बचाटे, बबिता कोरेकर, राधा सरडे, अंजली पारधे, पूजा जांभळे, महानंदा उळेकर, सुनिता लबडे, सरोजा स्वामी, रसना जेटीथोर यांच्यासह मंगरुळ व परिसरातील असंख्य महिला भगिनी, विद्यार्थिनी व युवती उपस्थित होत्या.



### अणदूर येथे श्रीराम प्रतिष्ठानतर्फे सामुदायिक हळदी-कुंकू कार्यक्रम उत्साहात

**अणदूर, दि.२५ जानेवारी -**
येथील शिक्षक कॉलनीमध्ये श्रीराम प्रतिष्ठान या महिलांच्या ग्रुपच्या वतीने सामुदायिक हळदी-कुंकू कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या उपक्रमाअंतर्गत अणदूर गावातील सुमारे ६०० महिलांना वाण देऊन सन्मानित करण्यात आले. वेळेअभावी प्रत्येकाच्या घरी जाऊन हळदी-कुंकू देणे शक्य नसल्याने जवळपास १८ महिलांनी एकत्र येत एकाच ठिकाणी हा कार्यक्रम आयोजित केला. सर्व महिलांनी एकाच रंगाच्या साड्या परिधान करून एकात्मतेचा संदेश दिला. कार्यक्रमात महिलांना गुळाच्या ढेपीचे वाण देण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ललिता हिप्परगे, सोजर कबाडे, प्रणिता कबाडे, रोहिणी कराळे, गुरुदेवी मुळे, ताय्यमा मुळे, प्रिया राठोड, भाग्यश्री पोतदार, अर्चना जिडगे, ज्योती सारणे, प्रभावती तिरगुळे, राजेश्री कबाडे, सुप्रिया मुळे, सुरेखा घोडके, प्रिया पाटील, अनुराधा पापडे, सुनंदा नाईक आदी महिलांनी विशेष परिश्रम घेतले.

### नामदेव वाघमारे यांचे निधन

**धाराशिव, दि.२५ जानेवारी -**
धाराशिव शहरातील नामदेव अंबादास वाघमारे यांचे रविवार, २५ जानेवारी रोजी सकाळी हृदयविकाराच्या तीव्र धक्क्याने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर शहरातील कपिलधार स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुली, एक मुलगा, असा परिवार आहे. ते शहरातील प्रसिध्द चर्मकार होते. मागील ५० वर्षांपासून शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे त्यांचा चप्पल, बुट तयार करणे व विक्रीचा व्यवसाय आहे.



## श्रीपतराव भोसले हायस्कूलमध्ये विद्यार्थ्यांसाठी आनंदमेळावा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२५ जानेवारी -**
श्रीपतराव भोसले हायस्कूलमध्ये दरवर्षीप्रमाणे यावर्षीही विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी व शालेय जीवनात व्यावसायिक शिक्षणाचे धडे मिळावेत, यासाठी आनंदमेळाव्याचे आयोजन करण्यात आले.

मेळाव्याचे उद्घाटन आदर्श शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सुधीर पाटील, उपशिक्षणाधिकारी दत्तात्रय लांडगे आणि जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. दयानंद जटनुरे यांनी केले. यावेळी दैनिक आरंभचे मुख्यसंपादक चंद्रसेन देशमुख, मुख्य कार्यकारी क्रीडा अधिकारी निकिता पवार, शहरातील वसतिगृहांचे प्रमुख, प्रशासकीय अधिकारी तसेच शाळेचे प्राचारक, उपप्राचारक, पर्यवेक्षक आणि विविध विभाग प्रमुख उपस्थित होते.

विद्यार्थ्यांच्या मोठ्या सहभागामुळे आनंदमेळावा सकाळ व दुपारच्या सत्रात पार पडला. गुरुवर्य के.टी. पाटील फाऊंडेशनच्या २५ स्टॉल्सच्या माध्यमातून व्यवसायाचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना देण्यात आले. ६०० हून अधिक खाद्य पदार्थ व इतर साहित्याचे स्टॉल विद्यार्थ्यांनी लावले, ज्या माध्यमातून उत्पादन, विक्री, नफा-तोटा यांचे अनुभव मिळाले. या आनंदमेळाव्यामुळे लाखो रुपयांची उलाढाल झाली.

या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सर्व शिक्षक-शिक्षिका, सेवक सुहास ताटे व इतर शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

### अध्यात्माचे दाखले देणाऱ्यांनी ते आधी आचारणात आणावेत...

# कोल्हे, कुत्रे, लांडगे यांनी आमदाराचे कान भरले : धनंजय सावंत

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२५ जानेवारी -**
स्थानिक स्वराज्य संस्थांच्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत निष्ठावान शिवसैनिकांना डावलल्याच्या रागातून अपक्ष पॅनल उभारण्याचा निर्णय घेतल्याचे स्पष्टीकरण शिवसेनेतून अपक्ष पॅनल उभे करणारे प्रा. डॉ. तानाजीराव सावंत यांचे पुतणे तथा धाराशिव जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष धनंजय सावंत यांनी दिले.

एकनाथ शिंदे यांच्यासोबत बंड झालेल्या काळात जे शिवसैनिक प्रा. डॉ. तानाजीराव सावंत यांच्यासोबत एकनिष्ठ राहिले, पक्षासाठी झटले, त्यांनाच या निवडणुकीत वाऱ्यावर सोडण्यात आले. हे कुणाच्या सांगण्यावरून झाले, असा सवाल धनंजय सावंत यांनी उपस्थित केला. महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष अर्चनाताई दराडे तसेच परंडा, भूम-वाशी मतदारसंघातील अनेक निष्ठावान शिवसैनिकांनी आपल्यावर आणि पक्षावर विश्वास ठेवून काम केले; मात्र त्यांनाच जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत डावलण्यात आले, असा आरोप त्यांनी केला.


निष्ठावान शिवसैनिकांना डावलल्याने अपक्ष पॅनल उभारले

आपण पुण्याला गेल्यानंतर परंडा तालुक्यातील सर्व कार्यकर्ते व संघटनात्मक कामकाज मी सांभाळले. शिवसैनिकांना न्याय देण्याचे काम केले. मात्र आमचे काहीही न ऐकता काही मोजक्या लोकांचेच ऐकले गेले. त्यामुळे हा निर्णय घ्यावा लागला, असेही ते म्हणाले.

यावेळी त्यांनी पक्षातील काही पदाधिकाऱ्यांवर नाव न घेता टीका करत, अध्यात्माचे दाखले देणाऱ्यांनी ते आधी आचरणात आणावेत. काही लोक आमदारांचे कान भरत आहेत, अशी जहरी टीका केली.

दरम्यान, जिल्हा परिषद व पंचायत समितीसाठी उभा केलेल्या सर्व उमेदवारांचा व कार्यकर्त्यांचा मेळावा घेऊन चुलते-पुतणे वादाचा खुलासा करण्यात आला. याप्रसंगी राजाभाऊ देवकते, धनंजय पाटील, दत्ताभाऊ मोहिते, गौतम लटके यांनीही आपली भूमिका मांडत सावंत घराण्यातील फूट का पडली याचा खुलासा केला.

माझे चुलते डॉ. तानाजीराव सावंत हे भोळे असून, जर ते चुकीच्या सल्लागारांना दूर करून निष्ठावान शिवसैनिकांना न्याय देणार असतील तर मी माघार घेण्यास तयार आहे.

अन्यथा ही लढाई आम्ही लढणार आणि जिंकणार, असा ठाम निर्धार धनंजय सावंत यांनी या मेळाव्यात व्यक्त केला.

## तेरखेडा जि.प. गटात ठाकरे गटात नाराजी; बंडखोरी आणि शिंदे गटाला पाठिंब्याची चर्चा

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.२५ जानेवारी -**
जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर वाशी तालुक्यातील राजकीय वातावरण तापलेले आहे. उमेदवारी अर्ज माघार घेण्याची अंतिम तारीख २७ जानेवारी असल्याने पक्षांतर्गत हालचालींना वेग आला आहे. तिकीट वाटपावरून नाराजीचे सूर उमटत असून, काही ठिकाणी बंडखोरीची शक्यता निर्माण झाली आहे.




तेरखेडा जि.प. गटातील ठाकरे गटामध्ये नाराजी उफाळून येत असल्याचे राजकीय वर्तुळात चर्चेचा रंगत आहे. निष्ठावंत कार्यकर्त्यांना तिकिट न दिल्याने काही स्थानिक नेते आणि कार्यकर्ते अस्वस्थ आहेत. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, काही कार्यकर्ते उघड बंड करण्याच्या तयारीत असल्याचे चित्र दिसते.

राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय आहे की बंडखोरी झाल्यास कार्यकर्ते कोणत्या पक्षाकडे वळतील, की आपल्या पूर्वीच्या सहकाऱ्यांच्या शिंदे गटाला पाठिंबा देतील. स्थानिक समीकरणे आणि पूर्वीचे संबंध लक्षात घेता, शिंदे गटाकडे झुकण्याची शक्यता अधिक असल्याचे बोलले जात आहे.

उमेदवारी अर्ज माघार घेण्याच्या अंतिम तारखेपूर्वी वरिष्ठ पातळीवर हस्तक्षेप करून नाराज कार्यकर्त्यांची मनधरणी केली जाईल की नाही, हे पाहणे महत्त्वाचे ठरत आहे. तेरखेडा गटातील ही नाराजी आणि बंडखोरी आगामी निवडणूक समीकरणांवर निश्चितच प्रभाव टाकेल हे मात्र नाकारता येणार नाही.

## जवाहर महाविद्यालयात उद्योजकता विकास कार्यशाळा उत्साहात संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.२५ जानेवारी -**
येथील जवाहर महाविद्यालयात वाणिज्य विभाग व विद्यार्थी विकास विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने उद्योजकता विकास कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यशाळेचे उद्घाटन ज्येष्ठ पत्रकार अरविंद जोशी यांच्या हस्ते झाले. यावेळी मार्गदर्शन करताना त्यांनी सांगितले की, उद्योग, व्यापार, व्यवसाय व सेवा क्षेत्रात लघुउद्योगासाठी भरपूर संधी उपलब्ध आहेत. केवळ नोकरीच्या मागे न लागता स्वतःचा लघुउद्योग सुरू करून नोकरी मागणाऱ्यांपेक्षा नोकरी देणारे बनावे. अनेक भांडवलविरहित उद्योग करता येतात. शिकवणी वर्ग, व्याख्याने देणे यासारख्या सेवा क्षेत्रात मोठ्या संधी आहेत.

शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांसाठी डाळ उद्योग, हळद पावडर, रसवंतीगृह तसेच कच्च्या मालापासून पक्क्या मालाचे उत्पादन या उद्योगांत संधी आहेत. मुलींसाठी बचत गटांच्या माध्यमातून गृहउद्योग उभारता येतात. शासनाकडून विविध अनुदान योजना व कर्ज सुविधा उपलब्ध असून विद्यार्थ्यांनी त्याचा लाभ घ्यावा, असेही त्यांनी नमूद केले.

दुसऱ्या सत्रात जिल्हा उद्योग केंद्र, धाराशिवचे व्यवस्थापक अनिलकुमार साळुंखे यांनी जिल्हा उद्योग केंद्रामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती देत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

तिसऱ्या सत्रात रुद्रवाडी येथील महिला उद्योजक कविता शिंदे-भोसले यांनी आपल्या अनुभवांचा आढावा घेत गावपातळीवरही पाच दाळ मिल, ऑइल मिल व अनेक गृहउद्योग बचत गटांच्या माध्यमातून यशस्वीपणे सुरू असल्याचे सांगितले. तसेच गृहउद्योग करताना येणाऱ्या अडचणींवर प्रकट मुलाखतीच्या माध्यमातून चर्चा करून विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना त्यांनी उत्तरे दिली.

कार्यक्रमाची प्रस्तावना डॉ.एस.जी. बिराजदार यांनी केली, तर सूत्रसंचालन डॉ.एम.बी. बिराजदार यांनी केले. समारोपप्रसंगी प्राचार्य डॉ. चनशेट्टी यांनी विद्यार्थ्यांना उद्योग व व्यवसायासाठी महाविद्यालयाकडून सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

या कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ.एम.एम. लंगडे, विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. अंकुश कदम, वाणिज्य विभागप्रमुख डॉ.डी.डी. कदम, तसेच शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व महाविद्यालयीन विद्यार्थी उपस्थित होते.

## उमरगा नगरपालिकेत विषय समित्यांची बिनविरोध निवड



### सत्ताधारी गटाचे वर्चस्व कायम; पाच समित्या सत्ताधाऱ्यांकडे, एक विरोधकांकडे

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२५ जानेवारी -**
उमरगा नगरपरिषदेच्या सभागृहात झालेल्या विशेष सभेत अपेक्षेप्रमाणे सत्ताधारी गटाने आपले वर्चस्व कायम राखत विषय समित्यांची बिनविरोध निवड करण्यात आली. एकूण सहा विषय समित्यांपैकी पाच समित्यांचे सभापतीपद सत्ताधारी गटाकडे, तर एक समिती विरोधी गटाकडे देण्यात आली आहे.

रविवार (दि.२५) रोजी पार पडलेल्या या विशेष सभेला लोकनियुक्त नगराध्यक्ष किरण गायकवाड, निवडणूक प्रक्रिया पीठासीन अधिकारी तथा नगरपंचायत लोहारा मुख्याधिकारी लक्ष्मण कुंभार, प्रशिक्षणार्थी मुख्याधिकारी अक्षय पाटील तसेच उमरगा नगरपरिषदेचे मुख्याधिकारी रामकृष्ण जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

समितीनिहाय निवडमध्ये महिला व बालकल्याण समितीच्या सभापतीपदी शिवसेनेच्या नगरसेविका अश्विनी सोनकांबळे यांची निवड करण्यात आली. समिती सदस्य म्हणून यल्लमा विभुते, सुप्रिया घोडके, प्रिया पवार व फातिमाबी औटी यांची निवड झाली. पाणीपुरवठा व जलनिसारण समितीच्या सभापतीपदी धनंजय मुसांडे यांची निवड करण्यात आली.

समिती सदस्यपदी सुप्रिया घोडके, स्वाती स्वामी, बशीर शेख व अभिजीत मोरे यांना संधी देण्यात आली. सार्वजनिक बांधकाम समितीच्या सभापतीपदी उपनगराध्यक्ष विजय वाघमारे यांची निवड झाली. सदस्यपदी जमशेदाबी शेख, अभिजीत मोरे, बाबा मस्के व सचिन जाधव यांची निवड करण्यात आली.

स्वच्छता, वैद्यकीय व सार्वजनिक आरोग्य समितीच्या सभापतीपदी विशाल कानेकर यांची निवड झाली. समिती सदस्य म्हणून विजय दळगडे, फातिमाबी औटी, बाबा मस्के व पंढरीनाथ कोणे यांची निवड करण्यात आली. शिक्षण, क्रीडा व सांस्कृतिक कार्य समितीच्या सभापतीपदी मुस्तफा चौधरी यांची बिनविरोध निवड झाली. सदस्यपदी पंढरीनाथ कोणे, रत्नाकर सगर, आरती शिंदे व विजयकुमार दळगडे यांची निवड करण्यात आली.

विरोधी पक्षाच्या वतीने राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांच्या नगरसेविका ताराबाई दळगडे यांची नियोजन व विकास समितीच्या सभापतीपदी बिनविरोध निवड करण्यात आली. समिती सदस्यपदी नम्रता शिंदे, दुर्गा धोत्रे, दिपाली बिराजदार व राजेश्वरी स्वामी यांची निवड झाली.

सर्व सभापतीपदांसाठी प्राप्त नामनिर्देशन पत्रे वैध ठरल्याने पीठासीन अधिकाऱ्यांनी सर्व सभापतींची निवड बिनविरोध जाहीर केली.

## साबळेवाडीत सोन्याच्या दागिन्यांची चोरी

**धाराशिव, दि.२५ जानेवारी -**
भुम तालुक्यातील साबळेवाडी येथील कुसुम हरीदास साबळे (वय ५४) यांच्या घरासमोर कपडे धुत असताना घरातील जिना व पोर्चमध्ये बसविण्यात आलेल्या ग्रीलमधून सोन्याचे दागिने चोरीला गेले.

पोलीसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी वसीउद्दीन आलम व कैन्हय्या सहाणी (दोघे रा. भुम) यांनी घरातील १८ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने चोरी करून नेल्याचे आढळले. या चोरीमुळे अंदाजे ९१ हजार रुपये मूल्याचे नुकसान झाल्याचे नोंदवण्यात आले आहे. फिर्यादी कुसुम साबळे यांनी दि.२४ जानेवारी रोजी तुळजापूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

## परंडा न.प. विषय समित्यांवर जनशक्ती नगर विकास आघाडीचे वर्चस्व कायम



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२५ जानेवारी -**
परंडा नगरपरिषदेच्या विविध विषय समित्यांच्या झालेल्या निवडणुकीत जनशक्ती नगर विकास आघाडीचे वर्चस्व कायम राहिले आहे. या निवडणुकीत सर्व सभापतींची बिनविरोध निवड झाली.

वाचनालय, आरोग्य व स्वच्छता समितीच्या सभापतीपदी उपनगराध्यक्ष समरजीतसिंह सुजितसिंह ठाकूर, सार्वजनिक बांधकाम व मागासवर्गीय कल्याण समितीच्या सभापतीपदी रत्नमाला राहुल बनसोडे, पाणीपुरवठा, अर्थ व नियोजन समितीच्या सभापतीपदी रमेशसिंह गोकुळसिंह परदेशी, तर महिला व बालविकास समितीच्या सभापतीपदी परविन मन्नान बासले यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

या नवनियुक्त सभापतींचा पिठासीन अधिकाऱ्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या निवडीमुळे नगरपरिषदेत जनशक्ती नगर विकास आघाडीची पकड अधिक मजबूत झाल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

## सुमो नाका-बाबा नगर-तांदूळवाडी रस्त्यावरील पाईपलाईनला गळती

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२५ जानेवारी -**
शहरातील सुमो नाका ते बाबा नगर रोड ते तांदूळवाडी रस्त्यावरील पिण्याच्या पाण्याच्या पाईपलाईनमधील गळती तात्काळ दुरुस्त करण्यात यावी, जेणेकरून वाया जाणारे पाणी नागरिकांना उपलब्ध होईल, अशी मागणी प्रभाग क्रमांक ६ मधील काँग्रेसच्या नगरसेविका अर्चना मोरे यांनी नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

### दुरुस्ती करण्याची नगरसेविका मोरे यांची मागणी



निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, सुमो नाका ते बाबा नगर ते तांदूळवाडी या मुख्य रस्त्यावरील पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन गेल्या काही दिवसांपासून मोठ्या प्रमाणात लिकेज होत आहे. या गळतीमुळे दररोज हजारो लिटर शुद्ध पिण्याचे पाणी वाया जात असून पाण्याची नासाडी होत आहे.

सतत पाणी साचत असल्याने रस्त्याची दुरवस्था झाली असून ठिकठिकाणी खड्डे पडत आहेत. त्यामुळे वाहतुकीस अडथळे निर्माण होत असून अपघाताचा धोका वाढला आहे. तसेच पाईपलाईन फुटल्यामुळे बाबा नगर परिसरातील नागरिकांना अत्यंत कमी दाबाने व अपुरा पाणीपुरवठा होत आहे.

याशिवाय रस्त्यावरील सांडपाणी अथवा माती फुटलेल्या पाईपमधून आत शिरून पाणी दूषित होण्याची शक्यता असून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होऊ शकतो, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

सदर ठिकाणाची पाहणी करण्यात आली असून ही गळती तातडीने दुरुस्त करणे अत्यावश्यक आहे. संबंधित पाणीपुरवठा विभागाच्या अभियंत्यांना त्वरित सूचना देऊन पाईपलाईनची दुरुस्ती करण्यात यावी, अशी ठाम मागणी नगरसेविका अर्चना मोरे यांनी केली आहे.